## एअर इंडियाला बॉम्बस्फोटाची धमकी

■ वृत्तसंस्था, अमृतसर, दि. २१:
अमेरिकास्थित शीख फॉर जस्टिस दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नू याने एअर इंडियाला बॉम्बस्फोट करण्याची धमकी दिली आहे. दहशतवादी पन्नूने व्हिडीओ जारी केला आणि १९८४ शीख दंगलीचा बदला घेण्याचे सांगितले. त्याने लोकांना एअर इंडियाने प्रवास न करण्याचा सल्ला दिला.

पन्नूने म्हटले की, नोव्हेंबर १९८४ शीख दंगलीचा ४० वा स्मृतिदिन आहे. १९८४ मध्ये १३ हजारांहून अधिक शीख, महिला आणि मुले मारली गेली. ही संपूर्ण घटना भारत सरकारने घडवून आणली. परदेशात प्रवास करणाऱ्यांनी १ ते १९ नोव्हेंबरपर्यंत एअर इंडियावर बहिष्कार टाकावा. विमानात संशयित बॉम्ब असण्याची धमकी वैमानिकांना दिली आहे.


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक १९५ * * नागपूर *
मंगळवार, दिनांक २२ ऑक्टोबर २०२४
पुरवणीसह पाने ८
किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


## अग्रग्रलेख — खरीखरी...

### बाप ठाणेदार, मुलगा फौजदार आणि भाऊ जमादार

आपल्या महाराष्ट्राचे एके काळचे अल्पकालीन मुख्यमंत्री नारायण राणे साहेब आणि त्यांचे कुटुंब सध्या भलतेच फार्मात आहे. मोठे म्हणजेच नारायण राणेसाहेब शिवसेना ते भाजप व्हाया काँग्रेस असा प्रवास करत करत सध्या भाजपचे खासदार आहेत. म्हणजे ते ठाणेदार आहेत. त्यांचे दुसरे महान पुत्र आमदार असून सर्वाधिक उग्र हिंदुत्ववादी आहेत. त्यांच्या जिभेला तलवारीची धार आहे आणि त्यांच्या स्वतः विषयी अपेक्षा फार आहे. म्हणजेच ते फौजदार आहेत. त्यांचेच दुसरे पुत्र माजी खासदार भाजपमधून जमत नाही. असे दिसून आल्यामुळे आपल्या वडिलांचे जुने घर जे सध्या शिंदे साहेबांकडे आहे. त्यात प्रवेशकर्ते झालेले आहेत. त्यांना आपण जमादार म्हणू. असे एका घरात तीन तीन मोठे सरदार आपापला आब राखून आहेत. मोठ्या म्हणजे नारायणराव राणे यांना मोदी साहेबांनी केंद्रात ना अवजड मंत्रीपद दिले, ना हलके मंत्रीपद दिले. त्यामुळे त्यांना नारायण,नारायण करीत दोन्ही पुत्रांच्या भवितव्याची तरतूद करायला भरपूर वेळ मिळत आहे. सध्या एका घरातून दोन लोकप्रतिनिधी आहेत. तिस?या व्यक्तीलाही तिकीट मिळेल याची नक्की खात्री आहे. त्यामुळे आता तिसरे निवडून आले. म्हणजे इजा, बिजा आणि तिजा असे करीत संपूर्ण कणकवलीच्या जनतेकडून राणे कुटुंबाला भरभरून आशीर्वाद मिळणार आहेत. साहेबांच्या दोन्ही पुत्रांना आमदारकी मिळो, म्हणून आम्ही लालबागच्या राजासमोर नवस बोलणार आहोत. आपल्या महाराष्ट्रात अनेक राजकीय पक्षांनी 'एका कुटुंबात एक पद' असा अव्यवहारी सिद्धांत मांडलेला आहे. काँग्रेस पक्ष म्हणजे नेहरू, गांधी परिवाराची खाजगी मालमत्ता आहे. अशाच तो?यात वावरत असतो. त्या पक्षातही सोनिया गांधी राज्यसभेच्या खासदार, राहुल गांधी लोकसभेचे खासदार आणि आता प्रियंका गांधी वायनाडच्या खासदार असे त्रिकूट संसदेत दिसणार आहे. कोणे एके काळी नारायणराव काँग्रेसचे सरकार असताना महसूल मंत्री होते. आता जरी काँग्रेसच्या नावाने ते आणि त्यांचे दोन्ही सुपुत्र बोंबाबोंब करीत असले. तरी काँग्रेसचा परिवारवाद त्यांच्या शिवसेनी रक्तात भिनलेला असावा, असे समजण्यास हरकत नाही. नारायणराव सध्या भारतीय जनता पक्षात असले तरी ते मूळचे शिवसैनिक आहेत, हे विसरता येणार नाही. उद्धवरावांनी त्यांची कदर केली नाही. तसेच इतर अनेकांनीही कदर केली नाही. म्हणून शिवसेना त्यांच्याकडून हिसकावून घेण्याचा पराक्रम राणे पिता-पुत्र ज्या पक्षात आहेत. त्या पक्षाने केलेला आहे. आता महाराष्ट्र विधानसभेच्या अटीतटीच्या निवडणुकीत राणे कुटुंबीय जबरदस्त उत्साहाने आणि जोमाने कामास लागले आहे. शेवटी सत्तेशिवाय पान हलत नाही. हे आमच्या राणे कुटुंबाला शंभर टक्के ठाऊक आहे. गेल्या दहा वर्षापासून देशावर मोदी साहेबांचेच राज्य आहे. राणे साहेबांच्या सारखा खंदा सहकारी मिळाल्यावर गेल्या लोकसभेच्या निवडणुकीनंतर सुद्धा मोदी सत्तारूढ होऊ शकले आहेत. काँग्रेस पक्षाने अभिवचन देऊनही नारायण रावांना मुख्यमंत्रीपद दिले नव्हते. तसेही काँग्रेसवाले शब्द देतात. पण तो पाळत नाहीत. असा काँग्रेसचा दुर्लौकिक आहे. काँग्रेस पक्षात मुख्यमंत्रीपदासाठी अनेक जुने वरिष्ठ नेते बाशिंग बांधून तयार असल्यावर आयात केलेल्या राणे साहेबांना मुख्यमंत्री पद मिळेल अशी आशा करणे. हाच मुळात मोठ्या रहस्यमय नाटकाचा प्रयोग होता. आधीच घरचे झाले थोडे आणि व्याह्याने धाडले घोडे, अशी अवस्था झाल्यावर महाभिलाषी नारायणराव काँग्रेस पक्ष गाडला जात असताना त्या पक्षात राहतील. अशी कल्पनाच करणे गैर होते. तेव्हा आता नारायण रावांनी सहकुटुंब, सहपरिवार सत्तेच्या खुर्च्यांवर विराजमान होण्याचे ठरवलेले असेल. तर त्यांना बिचा?यांना दोष देण्यात काय अर्थ आहे? त्यांच्या कुटुंबातील एखाद्या महिला उमेदवारालाही कोणत्याही पक्षाकडून उभे केले. तर नारायण रावांच्या पुण्याईने त्या निवडून येऊ शकतात. आपण स्त्री दाक्षिण्य दाखवावे असा उदात्त विचार अगदी मनोमन करून आम्ही ही सूचना करीत आहोत. त्याचा राणे कुटुंबाने विचार करावा, अशी आमची विनंती आहे. सध्या तरी दोन्ही राणे बंधूंना आपल्या आमच्या लक्ष लक्ष शुभेच्छा आहेतच. आगामी दीपावली त्यांच्या घरात सत्ता समृद्धी घेऊन येवो आणि त्यांना ज्यांच्या ज्यांच्यावर प्रहार करायचा असेल. तो त्यांना करता येवो. हीच आमची भक्तीभावाने प्रार्थना आहे.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## मविआचं अखेर ठरलं! जागावाटपाचा मुहूर्त निघाला

# आज येणार पहिली यादी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१:
महायुतीचे जागावाटप जाहीर झाले नसताना भाजपाने ९९ उमेदवारांची पहिली यादी आधीच जाहीर केल्यामुळे तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीमध्ये अद्याप जागावाटप किंवा उमेदवार यादी हे काहीच जाहीर झाले नाही. चर्चेला सुरुवात झाली असताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी जागावाटपाबाबत मोठे विधान केलं आहे.



महाविकास आघाडीकडूनही जागावाटप अंतिम झालं असून ते जाहीर करण्याबाबत माहिती देण्यात आली आहे.

काँग्रेसच्या निवडणूक समितीची बैठक होत असून मंगळवार २२ ऑक्टोबर रोजी जागावाटप जाहीर केले जाईल, असे नाना पटोले यांनी माध्यमांसमोर सांगितले. महाविकास आघाडीचं ठरलं आहे, उद्या पहिली यादी येईल, आम्ही तिघे मिळून मंगळवारी संध्याकाळी यादी जाहीर करू, असे नाना पटोले यावेळी म्हणाले.

गेल्या काही दिवसांपासून नाना पटोले व संजय राऊत यांच्यात उमेदवारी व जागावाटपावरून वाकयुद्ध रंगले होते. पण दोन्ही पक्षांमध्ये कोणत्याही जागेवरून कोणतेही वाद नसल्याचा दावा आता नाना पटोलेंनी केला आहे.

काँग्रेस व शिवसेनेत कोणतेही वाद नाहीत. कशाला उगाच आमच्यात भांडणं लावताय? आम्ही नसीम खान यांना शरद पवारांकडे पाठवलं होतं. आमची यादी त्यांच्याकडे होती. ते उद्धव ठाकरेंच्याही संपर्कात होते.

विदर्भातील १२ जागांबाबतही महाविकास आघाडीत वाद नाहीत. शिवसेना आमच्याच जागा मागते वगैरे कोणतीही चर्चा झालेली नाही. मेरिटवर उमेदवारी देण्याबाबत चर्चा झाली, असं नाना पटोलेंनी यावेळी स्पष्ट केलं. त्यामुळे, मविआमधील तिढा सुटल्याचे बोलले जाते.

## पाच नक्षल्यांना कंठस्नान

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. २१:
विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नक्षल्यांचा घातपाताचा डाव उधळून लावण्यात गडचिरोली पोलिसांना २१ ऑक्टोबरला यश आले.

छत्तीसगड सीमेवरील कोपर्शी जंगलात नक्षलवादी व जवानांत झालेल्या जोरदार चकमकीत पाच नक्षल्यांना पोलिसांनी कंठस्नान घातले. चकमकीत एक जवान जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत.

छत्तीसगड सीमेवरील भामरागड तालुक्यातील कोपर्शी जंगलात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये २१ ऑक्टोबरला पहाटे चकमक सुरु झाली. नक्षलविरोधी अभियान राबवित असताना नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. यात पाच नक्षल्यांचा खात्मा करण्यात जवानांना यश आले.

दोन वेगवेगळ्या ठिकाणी ही चकमक झाली. यावेळी एक जवानही जखमी झाला आहे. जखमी जवानाला हेलिकॉप्टरने गडचिरोलीत आणले. त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, मृत पाच नक्षलवाद्यांचे मृतदेह देखील गडचिरोली येथे आणले आहेत. त्यांची ओळख पटविण्याचे काम उशिरापर्यंत सुरु होते.

गडचिरोली पोलिसांनी नक्षलवादविरोधी अभियान प्रभावीपणे राबविल्यामुळे नक्षल्यांना जबर हादरा बसला आहे. अनेक जहाल नक्षलवादी चकमकीत ठार झाले तर काहींनी शरणागती पत्करली. त्यामुळे माओवादी चळवळ खिळखिळी झाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नक्षलवादी घातपात करु शकतात, ही शक्यता गृहित धरुन पोलीस सतर्क आहेत.

नक्षलवाद्यांविरुध्द महाराष्ट्रासह छत्तीसगड पोलिसांनीही आक्रमकपणे मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नक्षली सैरभैर झाले आहेत. संघटनेचे नेतृत्व करणाऱ्या काहींना अटक झाली तर काही चकमकीत ठार झाले. त्यामुळे ही चळवळ आता नेतृत्वहीन होत आहे. या पार्श्वभूमीवर छत्तीसगडमधील नक्षली सीमावर्ती भागातील घनदाट जंगलाचा आश्रय घेऊन गडचिरोलीत घुसखोरी करत असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

कोपर्शी जंगलात पहाटे सहा वाजेपासून जवान व नक्षल्यांत चकमक सुरु झाली. दुपारी ४ वाजेपर्यंत ही चकमक सुरुच होती. त्यानंतर पोलिसांनी शोधमोहीम सुरु केली आहे. परिसरात झडती घेतल्यानंतर आतापर्यंत पाच नक्षल्यांचे मृतदेह आढळून आले आहेत. यात मृत नक्षल्यांची संख्या वाढू शकते, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

या घटनेनंतर पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी अपर अधीक्षक यतीश देशमुख , एम .रमेश यांच्या नेतृत्वात सी -६० पथकाच्या २२ तुकड्या व सीआरपीएफ च्या शीघ्रकृती दलाच्या दोन तुकड्या या कोपर्शी जंगलात पाठविण्यात आल्या.

## अजित पवार गटाकडून एबी फॉर्म वाटपास सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१:
भापजची पहिली यादी रविवारी जाहीर करण्यात आली. आज शिंदे गट आणि अजित पवार गटाची उमेदवार यादी जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मात्र, यादी जाहीर होण्याआधीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाकडून सोमवारी १७ जणांना एबी फॉर्मचे वाटप करण्यात आले. यामध्ये भरत गावित, सुनिल टिंगरे, संजय बनसोडे, चेतन तुपे यांसह १३ जणांना अर्ज देण्यात आले.

एबी फॉर्म मिळणाऱ्यांमध्ये राजेश विटेकर - परिषद आमदार (इच्छुक), संजय बनसोडे, चेतन तुपे, सुनील टिंगरे, दिलीप वळसे पाटील, दौलत दरोडा, राजेश पाटील, दत्तात्रय भरणे, आशुतोष काळे, हिरामण खोसकर, नरहरी झिरवळ, छगन भुजबळ, भरत गावित, बाबासाहेब पाटील, अतुल बेनके आदींचा समावेश आहे.

भरत गावित हे आधी भाजपमध्ये होते. काही दिवसांपूर्वीच त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश केला होता. आता त्यांना उमेदवारी जाहीर करण्यात आल्याने विविध चर्चांना उधाण आले आहे. भरत गावित यांनी 2019 ची विधानसभा निवडणूक भाजपकडून लढवली होती. त्यावेळी त्यांचा काँग्रेसचे शिरीष कुमार नाईक यांनी पराभव केला होता. आता भरत गावित यंदाची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून लढणार आहेत.

उमेदवारी अर्ज भरण्याची तारीख जवळ येत असल्यामुळे अजित पवार यांनी ए बी फॉर्मचे वाटप सुरू केल्याचे दिसत आहे. अजित पवार यांच्या मुंबईतील देवगिरी निवासस्थानी विद्यमान आमदार एबी फॉर्म घेऊन जात आहेत.

### प्रदेश उपाध्यक्षांचा धक्का

अजित पवार गटाच्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अनुराधा नागवडे व प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी त्यांच्या पक्षाच्या सर्व पदे व सदस्यांचा राजीनामा दिला आहे. यामुळे अजित पवार यांना मोठा धक्का बसला आहे.

## न्यायाधीशांनी नेत्याची स्तुती करू नये

### न्यायमूर्ती गवई यांचे परखड मत

■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. २१:
सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी.आर.गवई म्हणाले की, न्यायमूर्तींचे वर्तन न्यायिक नैतिकतेच्या उच्च मानकांनुसार असावे.



ते म्हणाले की, न्यायाधीशांनी पदावर असताना आणि शिष्टाचाराच्या मर्यादेपलीकडे राजकारणी किंवा नोकरशहाची स्तुती केल्याने संपूर्ण न्यायव्यवस्थेवरील जनतेच्या विश्वासावर परिणाम होऊ शकतो.

निवडणूक लढवण्यासाठी न्यायाधीशाचा राजीनामा दिल्याने लोकांच्या निःपक्षपातीपणाच्या समजावर परिणाम होऊ शकतो. न्यायिक नैतिकता आणि अखंडता हे मूलभूत स्तंभ आहेत जे कायदेशीर व्यवस्थेची विश्वासार्हता टिकवून ठेवतात.

न्यायव्यवस्थेवर जनतेचा विश्वास टिकवणे महत्त्वाचे आहे. याचे सैद्धांतिक कारण असे की लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी झाला तर ते न्यायव्यवस्थेच्या बाहेर न्याय मागतील, असेही ते म्हणाले.

## भाजपाबरोबर जाण्याचा प्रश्नच नाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१:



उद्धव ठाकरे देवेंद्र फडणवीसांना भेटले आणि संजय राऊत यांनी अमित शाह यांना फोन केला अशी माहिती काही वेळापूर्वी व्हायरल झाली होती. ज्याबाबत विजय वडेट्टीवार यांनीही स्पष्टीकरण दिलं. त्यानंतर या पाठोपाठ शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनीही याबाबत प्रतिक्रिया दिली. भाजपाशी हातमिळवणी करण्याबाबत त्यांनी महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे.

शिवसेनेने फक्त संघर्ष केलेला नाही, तर आमच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आलं होतं. आमचा पक्ष फोडला, आमचं सरकार पाडलं. आमचं चिन्ह त्यांनी चोरलं. त्याही पेक्षा हा महाराष्ट्र त्यांनी गद्दारांच्या हातात दिला. या वेदना घेऊन आम्ही संघर्ष केला. कोणी आमच्यावर कोणी शंका घेत असतील, तर ते एका बापाची औलाद नाहीत. त्यांनी त्यांचा बाप दाखवावा अन्यथा श्राद्ध घालावं, असं संजय राऊत म्हणाले. भाजपाशी हातमिळवणी म्हणजे औरंगजेब किंवा अफझल खानाशी हात मिळवणी होय, असे सांगत संजय राऊत यांनी या सर्व अफवा असल्याचे सांगितले.

## स्कॉर्पिओने ४ तरुणांना उडविले

### एक ठार तीन गंभीर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :
एका स्कॉर्पिओ चालकाने बेदरकारपणे वाहन चालवून दुचाकीस्वार ४ तरुणांना जबर धडक दिली. यात एका तरुणाचा मृत्यू झाला, तर इतर तिघे गंभीर जखमी झाले.

अमन नियाजुद्दिन शेख (२५) रा. आदर्शनगर, मोठा ताजबाग असे मृताचे नाव आहे. जखमी आतिफ रहीन खान पठाण (१८), अरमान शेख जावेद कुरेशी (१७) आणि इनायत शहादत पठाण (१८) यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी इनायतच्या तक्रारीवरून आरोपी वाहन चालक रामेंद्रसिंग दौलत परिहार रा. वाडी विरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक केली आहे.

मृतक अमन हा मजुरी करीत होता. आरोपी रामेंद्र हा ट्रांसपोर्ट व्यवसायी आहे. अमन आणि जखमी तरुण जरीपटकाच्या नुरी मशिदीजवळ राहणारे मामा इमरान कुरेशी यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी आले होते.

चौघेही इनायतच्या दुचाकीने घरी जाण्यासाठी निघाले. वाहन अमन चालवत होता. खोब्रागडे चौक ओलांडताना रिंगरोडकडून वाडीकडे भरधाव जात असलेल्या स्कॉर्पिओ चालक रामेंद्रने त्यांना जबर धडक दिली.

चारही जखमींना उपचारार्थ मेयो रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासून अमनला मृत घोषित केले. इतर तिघांवर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी वाहन क्रमांकाच्या आधारावर रामेंद्रचा शोध घेऊन त्याला अटक केली.

## दहशतवादी हल्ला ६ ठार : ५ जखमी

■ वृत्तसंस्था, अमृतसर, दि. २१:
जम्मू-काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यातील गगनगीर भागात रविवारी रात्री दहशतवाद्यांनी स्थानिक नसलेल्यांवर हल्ला केला. या हल्ल्यात डॉक्टरसह ६ जणांचा मृत्यू झाला. तथापि, अधिकृतपणे केवळ ३ मृत्यूची माहिती देण्यात आली आहे.

या हल्ल्यात ५ मजूर जखमी झाल्याची माहिती आहे. त्यांना श्रीनगर मेडिकल कॉलेजमध्ये रेफर करण्यात आले आहे. केंद्र सरकारतर्फे चालविण्यात येणाऱ्या बोगदा प्रकल्पात सर्व कामगार काम करत होते. हल्ल्यानंतर लगेचच सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला. हल्लेखोरांना लवकरात लवकर पकडण्यासाठी शोधमोहीम सुरू आहे. काश्मीरचे आयजीपी व्हीके बिर्डीही घटनास्थळी पोहोचले. ज्या भागात दहशतवादी हल्ला झाला तो सीएम ओमर अब्दुल्ला यांचा मतदारसंघ असलेल्या गांदरबल विधानसभेत आहे.

### गस्तीच्या नवीन प्रणालीवर भारत-चीन सहमत

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ब्रिक्स परिषदेत सहभागी होण्यापूर्वी भारत आणि चीनमध्ये मोठा करार झाला आहे. दोन्ही देशांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर गस्त घालण्याचे मान्य केले आहे. याद्वारे पूर्व लडाखमधील दोन्ही देशांमधील सीमावाद सोडवला जाऊ शकतो आणि संघर्ष कमी होईल. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी सोमवारी सांगितले की, भारत आणि चीनमध्ये सीमेवर गस्त व्यवस्थेबाबत करार झाला आहे.

### २५० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त

**अंकलेश्वर :** गुजरातच्या अंकलेश्वर मधून पुन्हा एकदा अमली पदार्थांचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. सुरत आणि भरूच पोलिसांनी संयुक्त कारवाईत सोमवारी रात्री उशिरा अंकलेश्वरमधील अवसार एंटरप्रायझेस नावाच्या कारखान्यावर छापा टाकून २५० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले. ७ दिवसांपूर्वीही एका कारखान्यातून ५ हजार कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले होते.

## आठवले यांचे आर्जव सुरूच

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१:
केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी विधानसभा निवडणुकीसाठी जागांची मागणी केली आहे. यासाठी त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना संपर्क साधला आहे. मात्र मला एकट्याला भेटून उपयोग नाही, असे अजित पवारांनी स्पष्टच सांगितले आहे. जागांच्या मागणीबद्दल आठवलेंची फिरस्ती सुरूच आहे.

## मजुराकडून सुरक्षा रक्षकाची हत्या

### कंपनी संचालकांनी दाबले प्रकरण, तिघांवर गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :
कंपनीचे प्रवेशद्वार लवकर उघडले नाही या संतापातून दारूच्या नशेत असलेल्या मजुराने सुरक्षा रक्षकाची लोखंडी रॉड डोक्यावर मारून हत्या केली. कंपनीच्या मालकांनी त्यांच्या परिसरात झालेली ही हत्या मोठ्या शिताफिने दाबली.

कंपनीत खुनाची घटना घडल्याचा कोणताही पुरावा पोलिसांना मिळाला नाही आणि मृताला पुरण्यात आले. कुटुंबीय मृताचा शोध घेत नागपुरात पोहोचले असता पोलिसांनी तपास सुरू केला आणि खुनाची घटना उघडकीस आली. या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी मजुराविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदवून त्याला अटक केली आहे. तसेच पुरावा नष्ट करणाऱ्या कंपनी मालकांनाही या प्रकरणात आरोपी केले आहे. मनोहर उर्फ मनोज बबन शेंडे (४२) रा. बाभुळगाव, यवतमाळ, सुरेश चंदानी आणि धर्मेश सुरेश चंदानी अशी आरोपींची नावे आहेत.

मृतक कमलेश रामसुजन पटेल (५०) हा मुळचा मध्यप्रदेशातील रीवा येथील रहिवासी होता. सुरेश आणि धर्मेश यांची हिंगणाच्या एमआयडीसीत उज्वल इस्पात प्रा. लि. कंपनी आहे.

मृतक कमलेश कंपनीत सुरक्षा रक्षक होता, तर आरोपी मनोहर हा मजूर आहे. गत ८ ऑक्टोबरच्या रात्री १०.३० वाजताच्या सुमारास कमलेश कंपनीच्या प्रवेशद्वारावर कर्तव्य बजावत होता. या दरम्यान मनोहर वाहनाने तेथे आला.

तो मद्यधुंद अवस्थेत होता. त्याने हॉर्न वाजवून कमलेशला गेट उघडण्यास सांगितले. कमलेशला गेट उघडण्यास थोडा विलंब झाला. यामुळे चिडून मनोहरने त्याला शिविगाळ सुरू केली. यावरून दोघांमध्ये वाद झाला. मनोहरने तेथे पडलेली लोखंडी रॉड उचलून कमलेशच्या डोक्यावर मारली. तो रक्तबंबाळ होऊन जागीच कोसळला.

कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी घटनेची माहिती मालकांना दिली. सुरेश आणि धर्मेशही कंपनीत आले. गंभीर जखमी कमलेशला ऑटोत टाकून मनोहरसोबत मेडिकल रुग्णालयात रवाना करण्यात आले. सुरेश आणि धर्मेशने मनोहरला रुग्णालयात अपघात झाल्याची माहिती देण्यास आणि त्याचे नावही बनावट सांगण्यास सांगितले.

योजनेंतर्गत मनोहरने कमलेशचे नाव अनिल यादव असे सांगितले. अज्ञात वाहनाच्या धडकेत जखमी झाल्याची माहिती दिली. सुरेश आणि धर्मेशने काही पैसे देऊन मनोहरला तेथून रवाना केले. उपचारादरम्यान दोन दिवसानंतर कमलेशचा मृत्यू झाला.

### असे फुटले बिंग

एमआयडीसी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली. कुटुंबीयांबाबत कुठलीय माहिती न मिळाल्याने त्याचा मृतदेह पुरण्यात आला. १६ ऑक्टोबरला कमलेशचा मुलगा विजय पटेल एमआयडीसी पोलिसात पोहोचला आणि वडील बेपत्ता असल्याची तक्रार नोंदविली. पोलिसांनी कागदपत्रांची पडताळणी करून मेडिकलमध्ये मरणाऱ्या व्यक्तीचा फोटो दाखवला आणि कमलेशची ओळख पटली. तपासादरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की, ८ ऑक्टोबर रोजी कंपनीत मनोहर आणि कमलेश यांच्यात वाद झाला होता. चौकशीत संपूर्ण प्रकरण पुढे आले. पोलिसांनी मनोहरला यवतमाळ येथून अटक केली. सुरेश आणि धर्मेश फरार आहेत. पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

## हा तर बाबासाहेबांच्या संविधानावर हल्ला

### वंचितच्या गोंधळानंतर योगेंद्र यादवांची प्रतिक्रिया

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २१ :
अकोला : लोकशाहीचे रक्षण करण्याच्या चर्चेमध्ये सुद्धा लोकशाहीचे रक्षण होऊ शकत नसल्याची सद्यस्थिती आहे. हा आमच्यावर नव्हे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानावर हल्ला केला आहे, अशी टीका भारत जोडो अभियानाचे संयोजक योगेंद्र यादव यांनी केली. वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी कुणाच्या सांगण्यावरून हा प्रकार केला असेल तर त्यांनी ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यावर लाजिरवाणी वेळ आणली, असे देखील ते म्हणाले.



अकोल्यात वंचित आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी योगेंद्र यादव यांच्या सभेत गोंधळ घातला. यादव यांचे भाषण रोखण्याचा प्रयत्न केला.त्यानंतर योगेंद्र यादव यांनी माध्यमांशी संवाद साधला.

ते म्हणाले, अशी घटना कधीही घडली नव्हती. निर्भयता आमचा संकल्प आहे. अकोल्यात पुन्हा भाषण देण्यासाठी निश्चित येईल.

## महाविकास आघाडी आणि महायुती तुटणार..

### बच्चू कडू यांचा दावा परिवर्तन महाशक्ती आघाडीची पहिली यादी जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :
परिवर्तन महाशक्तीची पहिली यादी आज जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये ८ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. परिवर्तन महाशक्ती आघाडीची पत्रकार परिषद सोमवारी पार पडली. यावेळी तिसऱ्या आघाडीच्या वतीने पहिली यादी जाहीर करण्यात आली. महायुती आणि महाविकास आघाडी तुटणार, असा दावा बच्चू कडू यांनी यावेळी केला.

परिवर्तन महाशक्ती आघाडी विधानसभा निवडणूक लढवणार ही नाही, असे अनेकांना वाटत होते. पण आता आम्ही नावे जाहीर करत आहोत. आम्ही इतर पक्षांसारखे वेगवेगळे नावे जाहीर न करता एकत्र करत आहोत. भविष्यात आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता आहे. त्यातील एक पक्ष फुटून बाहेर निघणार आहे. तर महायुतीतील एक मित्र बाहेर जाणार असल्याचे आमच्या कानापर्यंत आले आहे, असा दावा आमदार बच्चू कडू यांनी केला.



आमच्या आघाडीला तिसरी म्हणणारे आता तिसऱ्यात जाण्याची शक्यता आहे आणि आम्ही पहिल्यात राहणार आहोत, असाही दावा बच्चू कडू यांनी केला.

परिवर्तन महाशक्तीच्या माध्यमातून एक सशक्त आणि दणकट पर्याय महाराष्ट्रातील जनतेसमोर ठेवत आहोत. महाराष्ट्रात आज राजकारण नाही तर राजकारणातील टोळी युद्ध सुरू आहे. आम्हाला हा महाराष्ट्र स्वच्छ करायचा आहे. महाराष्ट्राची लयाला गेलेली राजकीय संस्कृती, राजकीय प्रगल्भता ती पुन्हा आणण्याचा निर्धार परिवर्तन महाशक्तीने केला आहे.

# बँक व्यवहारांवर निवडणूक विभागाची नजर !
## जिल्हास्तरीय बँक समन्वयकाची नियुक्ती

**ठाणे, दि. २१ : प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार ठाणे जिल्हयातील सर्व बँकाकडून होणाऱ्या व्यवहारांची माहिती आयोगाकडे सादर करणे बंधनकारक आहे. यासाठी जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक अभिषेक पवार यांची जिल्हास्तरीय बँक समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.तर जिल्ह्यातील सर्व बँकांनी त्यांच्याकडील समन्वय अधिकारी यांची नियुक्ती करून जिल्हाधिकारी कार्यालयास माहिती देण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले आहेत. तसेच तर बँकेकडून पैशांची वाहतूक करताना क्युआर कोड बंधनकारक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.



संपूर्ण राज्यभरात विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले असून निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून विविध खबरदारीच्या उपायोजना राबविण्यास सुरुवात करण्यात आली. शहरात विविध ठिकाणी लागलेले प्रचाराचे फलक देखील स्थानिक प्रशासनाकडून हटविण्याची मोहीम देखील जोमाने राबविण्यात येत आहे. राष्ट्रीयकृत बँका, को-ऑपरेटिव्ह बँका व खासगी बँकांकडून रोख रक्कम रेमिटन्स द्वारे आणावयाची असेल किंवा पाठवायची असेल तसेच रोखीचे मोठे व्यवहार होत असतील तर त्याकरिता संबंधित बँकेच्या प्रत्येक शाखेच्या शाखा प्रबंधकाना एक क्यूआर कोड देण्यात येणार आहे. त्याकरिता प्रत्येक बँकेने त्यांच्या मुख्य शाखेतून एक नोडल ऑफिसरची नेमणूक करणे आवश्यक असल्याचे आदेश निवडणूक विभागाने दिले आहे. याच पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हयातील सर्व बँकाकडून होणाऱ्या व्यवहारांची माहिती आयोगाकडे सादर करणे बंधनकार आहे.

यासाठी जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक अभिषेक पवार यांची जिल्हास्तरीय बँक समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.तर जिल्ह्यातील सर्व बँकांनी त्यांच्याकडील समन्वय अधिकारी यांची नियुक्ती करून जिल्हाधिकारी कार्यालयास माहिती देण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले आहेत. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार मुख्य बँकेतील नोडल ऑफिसरचे युजर आयडी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तयार करून दिले जाईल आणि त्या नोडल अधिकाऱ्यांनी त्यांच्या बँकेच्या सर्व शाखा प्रबंधकाचे यूजर आयडी तयार करणे आवश्यक आहे. कारण प्रत्येक बँक शाखेतुन दुसरीकडे रोख रक्कम जात असताना शाखेकडून क्यूआर कोड तयार होणे अत्यावश्यक आहे. क्यूआर कोड नसताना जर रोख रक्कम नेली आणि ती रक्कम निवडणूक अधिकाऱ्याकडून पकडण्यात आली, तर त्याच्यावर आयोगाकडील मार्गदर्शक सूचनांनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे ही जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आली आहे.

# भ्रष्टाचार रोखण्यासाठी आयुक्तांचे बदलीशस्त्र

**पनवेल, दि. २१ : प्रतिनिधी**

नवी मुंबई पोलीसांना प्रामाणिक दलाचा दर्जा मिळावा यासाठी नवी मुंबईचे पोलीस आयुक्तांनी पदभार घेतल्यानंतर पहिल्यांदा मलईदार बदल्यांमधील भ्रष्टाचार थांबवून सगळ्याच पोलीस निरिक्षकांना सूखद आश्चर्याचा धक्का दिला. अधिकाऱ्यांना मलईदार पदांसाठी एकही रुपया मोजावा लागला नाही तर ते भ्रष्टाचार करणार नाहीत अशी मनिषा आयुक्तांची होती. परंतू मागील दोन आठवड्यात घडलेल्या भ्रष्टाचाराच्या विविध घटनांमुळे आयुक्तांनी पुन्हा एकदा बदलीचे शस्त्र उघारले आहे.

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी पोलीस दलातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी सफाईची मोहीम हाती घेतली. मात्र मोफत मलाईदार पद मिळवूनही अधिकारी व कर्मचा-यांकडून भ्रष्टाचार थांबत नसल्याने आयुक्तांनी एका बैठकीत वरिष्ठ पोलीस अधिका-यांसमोर संताप व्यक्त केला. ५ ऑक्टोबरला कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र कदम यांची तडकाफडकी पोलीस ठाण्यातून बदली करुन त्यांना पोलीस नियंत्रण कक्षात जमा करण्यात आले. राजेंद्र कदम यांच्या जागी वाहतूक विभागात काम करणारे श्रीकांत धरणे यांची नेमणूक करण्यात आली. यापूर्वी ९ ऑक्टोबरला एनआरआय पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक सतीश कदम यांना मध्यरात्री ५० लाख रुपयांच्या मागणी केल्याप्रकरणी लाचेच्या प्रकरणात अटक करण्यात आली होती.



ईमारतीच्या दुर्घटना प्रकरणात गुंतवणूकदाराकडून पोलीस निरिक्षक सतीश कदम याने १४ लाख रुपये स्विकारल्यानंतर अजून त्याला १२ लाख रुपये पाहीजे होते. हीच रक्कम घेताना पोलीस निरिक्षक कदमला पोलीसांनी पकडले. कळंबोली पोलीसांचा लोखंड बाजार व परिसरात चालणा-या काळ्या धंद्याची लेखी माहिती एका भंगार व्यवसायीकाने पोलीस आयुक्तांकडे दिली. महिन्याला या पोलीस ठाण्याच्या प्रभारींना ४५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. यामध्ये विना कागदपत्रांची वाहने विल्हेवाट करणारी मोठी टोळी लोखंड पोलाद बाजारातील २२ गाळ्यांमध्ये सक्रीय आहे. या मोठ्या दुकानदारांकडून वाहनांचे सुटे भाग विकणारी ३५ दुकाने या परिसरात आहेत. यांना पोलीसांचा आशिर्वाद लागतो. जुन्या लोखंडाला नवीन कलई लावून बनावट विक्री करणारे लोखंड व पोलादाचा बेकायदा व्यापार कळंबोली लोखंड बाजारात चालतो. त्यालाही पोलीस आशिर्वाद देत असल्याचे बोलले जाते. पोलीस आयुक्त भारंबे यांच्या आदेशाने लोखंडी सळई व इतर साहीत्य वाहतूकदारांकडून खरेदी करणारा इम्तिहाज नावाच्या भंगार माफीयावर कारवाई केली होती. हा व्यवसाय पुन्हा सूरु झाल्याचे येथील व्यापारी सांगतात. या बाजारात दिडहजाराहून अधिक गोदाम आहेत. येथील माल आठवड्यातून दोन वेळा चोरी करणारी चोरट्यांच्या टोळीचे व पोलीसांचे साटेलोटे असल्याची चर्चा आहे.

बेकायदा वाहनतळ चालविणे आणि सरकारी अन्न गोदामातून रेशनींगचा माल अवैधरित्या कळंबोलीतून पास करणे यासाठी पोलीसांचा आशिर्वाद घ्यावा लागतो. दोन लेडीज सर्व्हीसबार यांच्यासह अनेक काळेधंदे कळंबोली पोलीस ठाण्याच्या परिसरात असल्याने या प्रभारीला माफीयांचा सलाम मिळाल्याशिवाय या परिसरात काहीच हालचाली होत नाहीत. कळंबोलीप्रमाणे पनवेलमध्ये रात्री उशीरा चालणारे लेडीज सर्व्हीसबारमध्ये डान्सबार आणि शेडुंग फाट्याजवळील तेल, गॅस, चोरीचा माल खरेदी करणा-या अवैध धंद्यांमुळे पोलीस आयुक्तांचा धाक पनवेलमध्ये शिल्लक नसल्याची चर्चा आहे. पोलीस आयुक्त भारंबे यांनी हीच काळ्याधंद्यांची प्रथा बदलण्यासाठी पोलीस ठाण्याला श्रीकांत धरणे यांच्यासारख्या अधिका-याची नेमणूक केली.

पोलीस आयुक्तांनी प्रामाणिक व आधुनिक पोलीस दल बनविण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न केले. नियंत्रण कक्षासोबत अत्याधुनिक फॉरेन्सीक तपास यंत्रणेसह, सायबर सेल व पेपरलेस कार्यपद्धत आणली. भ्रष्टाचार रोखण्यासाठी मीही घेत नाही, तूम्हीही घेऊ नका, असा संदेश पहिल्या दिवसापासून प्रभारींना दिला. पोलीसांच्या मुलांना नोकरी मिळावी यासाठी आयुक्तांनी औद्योगिक वसाहतीमध्ये कारखानदारांसोबत समन्वय साधले. पोलीस पत्नींना उद्योग व व्यवसायात पुढे यावे यासाठी पोलीस दलात विविध प्रयोग सूरु आहेत. तरी पोलीसांच्या भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस येत आहेत. पोलीस निरिक्षक राजेंद्र कदम यांच्यासोबत त्यांचे पैसे गोळा करण्यासाठी नेमलेले तीन पोलीस कर्मचाऱ्यांचीसुद्धा बदली करुन पोलीस आयुक्तांनी कलेक्टर संस्कृती नष्ट करण्याचे संकेत दिले आहेत.

# 'चिंचवड'ची जागा शिवसेना ठाकरे पक्षाला ?

**पिंपरी, दि. २१ : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांनी शिवसेनेत (ठाकरे) प्रवेश केल्याने महाविकास आघाडीत चिंचवडची जागा शिवसेनेला सुटण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे पिंपरी आणि भोसरीतील शिवसेनेतील इच्छुकांनी चिंचवडची पडणारी जागा नको, आयात उमेदवाराचे काम करणार नसल्याची भूमिका घेतली आहे. भोंडवे यांच्या प्रवेशामुळे कोंडी झालेले शिवसेनेचे (ठाकरे) पदाधिकारी उद्धव ठाकरे यांची भेट घेणार आहेत.

शहरात पिंपरी, चिंचवड आणि भोसरी असे तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी (शरद पवार) आणि शिवसेना (ठाकरे) हे दोन्ही पक्ष पिंपरी आणि भोसरीच्या जागेसाठी आग्रही आहेत. दोन्ही पक्षाकडे सक्षम उमेदवार आहेत. पिंपरीतून शिवसेनेचे (ठाकरे) जिल्हाप्रमुख, माजी आमदार गौतम चाबुकस्वार, शहरप्रमुख सचिन भोसले, राष्ट्रवादीकडून माजी नगरसेविका सुलक्षणा धर इच्छुक आहेत. विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षातून राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात आलेले अजित गव्हाणे यांनी भोसरीत प्रचाराला सुरुवात केली आहे. भाजपमधून शिवसेनेत (ठाकरे) आलेले माजी नगरसेवक रवी लांडगे, जिल्हा संघटिका सुलभा उबाळे हेही भोसरीतून इच्छुक आहेत.

पिंपरी आणि भोसरीच्या जागेवरून दोन्ही पक्षात रस्सीखेच सुरू असतानाच माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांनी शिवसेनेत (ठाकरे) प्रवेश केला. भोंडवे विधानसभा निवडणूक लढविण्यावर ठाम असून राष्ट्रवादी (अजित पवार) आणि भाजपचे नाराज माजी नगरसेवक आपल्यासोबत असल्याचा त्यांचा दावा आहे. महाविकास आघाडीतील एकाही पक्षाकडे तुल्यबळ उमेदवार नव्हता. त्यामुळे भोंडवे यांना पक्षात घेऊन उमेदवारी देण्याचे निश्चित झाल्याचे सांगितले जाते. परंतु, चिंचवड मतदारसंघात भाजपची मोठी ताकद असून बालेकिल्ला मानला जातो. तीनवेळा भाजपच्या चिन्हावर लढलेला उमेदवार निवडून आला आहे. त्यामुळे चिंचवडची पडेल जागा पक्षाला नको अशी भूमिका शिवसेना (ठाकरे) पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. चिंचवडपेक्षा पिंपरी, भोसरीत पक्षाचे संघटन आहे. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघांवरील दावा सोडण्यास पदाधिकाऱ्यांनी नकार दिला. भोंडवे यांच्या प्रवेशामुळे कोंडी झालेल्या पदाधिकाऱ्यांनी आयात उमेदवाराचे काम करणार नसल्याचा ठरावही केला आहे.

याबाबत शिवसेना (ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख सचिन भोसले म्हणाले, की कोणालाही विश्वासात न घेता भोंडवे यांचा पक्ष प्रवेश झाला आहे. संघटना वाढीसाठी पक्षात येणाऱ्यांचे स्वागत करतो. परंतु, उमेदवारीसाठी प्रवेश करत असेल तर आम्ही त्या व्यक्तीचे काम करणार नाही. निवडून येण्याची शक्यता कमी असलेली चिंचवडची जागा आम्ही मागितली नाही. चिंचवडची जागा नको आहे, पक्षश्रेष्ठींनी याचा विचार करावा.

# 'बोपदेव घाट' प्रकरणातील पीडित तरुणीला पाच लाखांची नुकसान भरपाई
## विधी सेवा प्राधिकरणाकडून 'मनोधैर्य योजने'अंतर्गत मदत

**पुणे, दि. २१ : प्रतिनिधी**

बोपदेव घाट सामूहिक बलात्कार प्रकरणातील पीडित तरुणीला विधी सेवा प्राधिकरणाकडून 'मनोधैर्य' योजने अंतर्गत पाच लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. विधी सेवा प्राधिकरणाकडून याबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

विधी सेवा प्राधिकरणाच्या 'मनोधैर्य' योजनेअंतर्गत अत्याचार प्रकरणातील पीडितांना मदत करण्यात येते. बोपदेव घाटात ३ ऑक्टोबर रोजी मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीला कोयत्याचा धाक दाखवून तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याबरोबर असलेल्या साथीदाराचा शोध घेण्यात येत आहे. 'मनोधैर्य' योजने अंतर्गत नुकसान भरपाई मिळवण्यासाठी पीडित तरुणीने विधी सेवा प्राधिकरणाकडे अर्ज केला होता. अर्ज आल्यानंतर नऊ दिवसांत संबंधित अर्ज मंजूर करून पीडित तरुणीला दिलासा देण्यात आला.

नुकसान भरपाईपोटी मिळणारी २५ टक्के रक्कम तरुणीला रोख स्वरूपात देण्यात येणार आहे. उर्वरित ७५ टक्के रक्कम दहा वर्षांसाठी पीडित तरुणींच्या नावे बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात येणार आहे. या रकमेतून मिळणाऱ्या व्याजातून ती उपचार घेऊ शकते, तसेच दैनंदिन खर्च भागविण्यासाठी मदत होणार आहे.

**मनोधैर्य योजना म्हणजे काय?**

पीडित बालक किंवा महिलेचे पुनर्वसन करण्यासाठी 'मनोधैर्य' योजना सुरू करण्यात आली आहे. विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून या योजनेची अंमलबजावणी होत असते. पीडित महिलेला कमीत कमी ३० हजार रुपयांपासून जास्तीत जास्त दहा लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळते. पीडित महिलांना आधार आणि धैर्य देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनानुसार त्वरित अर्ज निकाली काढण्यात आला. पीडित तरुणीने ११ ऑक्टोबर रोजी नुकसान भरपाई मिळवण्यासाठी अर्ज केला होता. तो १९ ऑक्टोबर रोजी निकाली काढण्यात आला, असे पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांनी नमूद केले.

# बदलापूरमध्ये कुटुंबीयांनी वेडी ठरविल्यामुळे विवाहितेची आत्महत्या

**कल्याण, दि. २१ : प्रतिनिधी**

सासरच्या मंडळींनी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करून तिला वेड लागले आहे, असा देखावा निर्माण केला. विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला घरात कोंडून ठेवले. या सगळ्या प्रकाराने आलेल्या नैराश्यातून बदलापूरमधील कात्रप भागातील एका विवाहितेने राहत्या घरात बुधवारी आत्महत्या केली. या प्रकरणात बदलापूर पोलिसांनी पती, दीर आणि सासरा यांना अटक केली आहे. रोहित सतिश पवार (३०, पती), दीर धनंजय पवार (३६), सासरा सतिश पवार (६२), सासु सुजाता (६०), जाऊ प्रियंका धनंजय पवार (३५) अशी गुन्हा दाखल आरोपींची नावे आहेत. बेळगाव जिल्ह्यातील आथणी तालुक्यातील एका गावातील प्रमिला चंद्रकांत निकम (४६) यांनी याप्रकरणी बदलापूर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे.

पोलिसांनी सांगितले, बेळगाव येथील तक्रारदार प्रमिला निकम यांची मुलगी सोनाली हिचे लग्न बदलापूर कात्रप भागातील रोहित पवार याच्या बरोबर झाले होते. लग्नानंतर सासरच्या मंडळींनी सोनाली हिचा हुंड्यासाठी छळ सुरू केला होता. पती रोहित याला अन्य ठिकाणी नोकरी लावायची आहे यासाठी पैसे हवे असल्याचे सांगून सासरच्या कुटुंबीयांनी सोनालीकडून तिचे सोन्याचे स्त्रीधन काढून घेतले. त्यानंतर सोनालीच्या चारित्र्यावर कुटुंबीयांनी संशय घेऊन तिचा शारीरिक व मानसिक छळ सुरू केला. सोनालीने घराबाहेर पडू नये आणि तिने माहेरी आई प्रमिला किंवा अन्य कोणाशी संपर्क करू नये म्हणून तिला घरातील खोलीत कोंडून ठेवण्यात आले. ती वेडी झाल्याच्या दृश्यध्वनी चित्रफिती तयार करून सासरच्या मंडळींनी त्या मयत सोनालीच्या आईला दाखविल्या.

या सगळ्या प्रकाराने नैराश्य आल्याने सोनाली पवार हिने बुधवारी राहत्या घरात आत्महत्या केली. ही माहिती समजताच सोनालीचे बेळगाव येथील कुटुंब बदलापूरमध्ये दाखल झाले. सासरच्या मंडळींनी केलेल्या छळामुळे सोनालीने आत्महत्या केल्याचा ठपका ठेवत सोनालीच्या आईने बदलापूर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण बालवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पी. डी. अमृतकर तपास करत आहेत.

# वाघोलीतील कंपनीच्या गोदामातून 244 लॅपटॉप चोरणारे गजाआड, 244 लॅपटॉप, दोन टेम्पो जप्त



**पुणे, दि. २१ : प्रतिनिधी**

वाघोलीतील एका नामांकित कंपनीच्या गोदामातून चोरीला गेलेल्या एक कोटी रुपयांच्या लॅपटॉप चोरी प्रकरणाचा छडा पोलिसांनी लावला. याप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली. त्यांच्याकडून २४४ लॅपटॉप आणि दोन टेम्पो जप्त करण्यात आले.

सुरेश महादेव कुमार (वय ३५, रा. वाघोली, मूळ उत्तर प्रदेश), शिवाजी जगन्नाथ वसू (वय २७, रा. धानेगाव, छत्रपती संभाजीनगर), कुमुद रंजन झा (वय ३२, रा. वाघोली ) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत. वाघोलीतील उबाळेनगर परिसरात आर्कलाईन लॉजिस्टीक्स अँड वेअरहाऊस प्रा. लि. गोदामातील कामगाराने एक कोटी नऊ लाख रुपयांचे २८० लॅपटॉप चोरून नेल्याची घटना नुकतीच घडली. याप्रकरणी वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. कंपनीतील कामगार सुरेश कुमारने साथीदारांच्या मदतीने लॅपटॉप चोरल्याची माहिती तपासात मिळाली होती. याप्रकरणी पोलीस कर्मचारी अजित फरांदे तांत्रिक तपास सुरु केला. तपासात मिळालेल्या माहितीनंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून तिघांना अटक केली. त्यांच्याकडून २४४ लॅपटॉप आणि दोन टेम्पो जप्त करण्यात आले.

गोदामातून चोरलेल्या लॅपटॉपची आरोपींनी नऊजणांना विक्री केल्याचे उघडकीस आले. आरोपींना तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालायने दिले. अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडीत रेजीतवाड, सहायक निरीक्षक शिरीष भालेराव, योगेश खटके, अजित फरांदे, स्वप्नील जाधव, अमोल ढोणे, संदीप तिकोणे, विशाल गायकवाड, बाळासाहेब हराळ, सागर कडू यांनी ही कारवाई केली.

# शिंदेसेनेला जिल्ह्यात हवाय 'दस का दम'
## मोठा भाऊ होण्यासाठी हवे कल्याण पूर्व, ऐरोली!



**ठाणे, दि. २१ : प्रतिनिधी**

राज्यात महायुतीचे जागा वाटप कसे होईल व भाजप व अजित पवार गटाच्या पदरात काय पडेल, हा भाग अलाहिदा! परंतु, ठाणे जिल्ह्यात जागा वाटपात शिंदेसेना हा मोठा भाऊ होता, आहे व राहणार, असाच आग्रह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धरला आहे.

जिल्ह्यात एकूण अठरा विधानसभा मतदारसंघ असून, जवळपास १० जागांवर शिंदेसेनेने दावा केला आहे. सहा जागांवर भाजप आणि दोन जागा अजित पवार गटाला दिल्या जातील, अशी शक्यता आहे. मात्र, भाजपचे तूर्तास ठाणे जिल्ह्यात आठ आमदार असल्याने विद्यमान आमदारांचे मतदारसंघ सोडण्यास भाजप तयार नाही. राज्यातील अन्य दोन जागा भाजपला देऊन ठाण्यात मोठा भाऊ बनण्याचा शिंदे यांचा आग्रह भाजप मान्य करणार का?, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे. ठाणे जिल्हा हा मुख्यमंत्री शिंदे यांचा बालेकिल्ला आहे. जागा वाटपात शिंदे यांना १८ पैकी १० जागा मिळाव्यात, या दृष्टीने ते प्रयत्नशील आहेत. सध्या भाजपचे आमदार अधिक असल्याने ते वारंवार शिंदेसेनेला डिवचण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे शिंदेसेनेत नाराजी आहे. शिंदेंना आपले वर्चस्व ठाणे जिल्ह्यावर ठेवायचे आहे. ठाणे जिल्ह्यात अधिक जागा लढवून जिंकून आणण्याची रणनीती शिंदेसेनेने आखली आहे.

**महायुतीतील पक्षांना हव्या असलेल्या जागा**

**शिंदेसेना:** भिवंडी ग्रामीण, शहापूर, कल्याण ग्रामीण, अंबरनाथ, कल्याण पूर्व, कल्याण पश्चिम, ओवळा माजिवडा, कोपरी पाचपाखाडी, मुंब्रा कळवा, ऐरोली

**भाजप:** ऐरोली, बेलापूर, ठाणे शहर, मीरा-भाईंदर, डोंबिवली, उल्हासनगर, मुरबाड, भिवंडी पश्चिम

**अजित पवार गट:** भिवंडी पूर्व, भिवंडी पश्चिम, उल्हासनगर, मुंब्रा-कळवा, मुरबाड, शहापूर या जागा हव्या आहेत. परंतु, त्यांच्या वाट्याला दोनच जागा जातील, असे सांगितले जाते.

# शिवसेना शिंदे गटाच्या आढावा बैठकीत उपतालुका प्रमुखाला मारहाण

**भिवंडी, दि. २१ : प्रतिनिधी**

विधानसभेच्या निवडणुकीचे बिगुल वाजले असून भिवंडीत विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भिवंडी पूर्व व भिवंडी ग्रामीण विधानसभा आढावा बैठकीचे आयोजन शनिवारी भिवंडीतील पद्मानगर परिसरातील एका हॉलमध्ये करण्यात आले होते.या बैठकीला मार्गदर्शन करण्यासाठी खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे हे उपस्थित असताना डॉ.शिंदे आढावा बैठक संपल्यानंतर पत्रकारांशी बोलत असताना आढावा बैठकीच्या हॉलमध्ये भिवंडी उप तालुका प्रमुखाला मारहाण करण्यात आली.दरम्यान या घटनेचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला आहे.तर भिवंडी पूर्व ग्रामीण भागातील कार्यकर्त्याला मारहाण झाल्याने हा चर्चेचा विषय ठरला आहे.दरम्यान या मारहाणीच्या घटनेमुळे शिवसेना ग्रामीण च्या कार्यकर्त्यांचे मतभेद समोर आले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार,दिलशाद शेख असे मारहाण झालेल्या उपतालुका प्रमुखाचे नाव आहे. तर योगेश उर्फ बंटी पाटील असे मारहाण करणाऱ्या माजी उपतालुका प्रमुखाचे नाव आहे.खासदार डॉ.शिंदे आढावा बैठक संपवून पत्रकारांशी संवाद साधत असतानाच अचानकपणे दिलशाद आणि योगेश या दोघांमध्ये वाद उफाळून आल्याने योगेशने दीलशादच्या कानशिलात मारल्याने एकच गोंधळ उडाला होता.

दरम्यान निष्ठेशी काम करत असताना सदर झालेली मारहाण नक्की कोणत्या कारणामुळे झाली याची काही कल्पना नसल्याची प्रतिक्रिया मारहाण झालेल्या दीलशाद शेखने प्रसार माध्यमांशी बोलताना दिली आहे.तर निवडणुकीच्या आढावा बैठकीमध्ये कार्यकर्त्याला मारहाण झाल्याने सदर घटना भिवंडी विधानसभा निवडणुकीत चर्चेचा विषय ठरला आहे.

# आरसीएफच्या थळ प्रकल्पात आता मिश्र खतांची निर्मिती

**अलिबाग, दि. २१ : प्रतिनिधी**

थळ येथे मिश्र खत निर्मिती प्रकल्प उभारण्याचा आरसीएफ कंपनीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने एल ॲण्ड टी कंपनीला हा प्रकल्प उभारण्याचे कंत्राट दिले असून, २७ महिन्यांत हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. हा विस्तार भूसंपादन न करता होणार आहे. या प्रकल्पात युरिया आणि अमोनिया खतांची निर्मिती होते. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे खताच्या आयातीचे प्रमाण कमी होणार असून मिश्र खताच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे. आरसीएफ खत निर्मिती प्रकल्पातून सध्या युरिया आणि अमोनिया खताची निर्मिती करण्यात येत आहे. आता प्रकल्पाचा विस्तार होणार असून युरिया आणि अमोनिया बरोबरच मिश्र खतांची निर्मिती करण्यात येणार आहे. यासाठी १००० कोटी रुपयांची गुंतवणूक कण्यात येणार असून, प्रकल्पातून दररोज १२०० मेट्रिक टन मिश्र खत तयार करण्याचा प्रयत्न असेल. कंपनीच्या संचालक मंडळाने एल ॲण्ड टी कंपनीला हा प्रकल्प उभारण्याचे कंत्राट दिले आहे. डीएपीसारख्या मिश्र खतांना बाजारात मोठी मागणी आहे. मात्र भारतात त्याचे फारसे उत्पादन होत नसल्याने त्याची आयात करावी लागते. मिश्र खतांची मागणी २०१८-१९ मध्ये साडेसहा हजार दशलक्ष टनावर पोहोचली होती. त्यानंतर रशिया-युक्रेनमधील युद्ध स्थितीमुळे त्याच्या आयातीवर परिणाम झाला होता. ही बाब लक्षात घेऊन आत्मनिर्भर भारत योजने अंतर्गत देशांतर्गत मिश्र खतांच्या निर्मितीवर भर देण्याचा निर्णय घेण्यात आला. याचाच एक भाग म्हणून केंद्र सरकारने मिश्र खत निर्मिती प्रकल्प उभारणीस मान्यता दिली असून, कंपनीच्या संचालक मंडळाने प्रकल्प उभारणीचे कंत्राट मंजूर केले आहे. त्यामुळे येत्या दोन महिन्यांत कामाला सुरुवात होणार आहे. देशांतर्गत मिश्र खतांचे उत्पादन सुरू झाल्यामुळे खतांच्या किमती कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# मैदानी स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांचा सुवर्ण, रजत व कांस्य पदकांनी गौरव

## विद्यापीठातील पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या मैदानी स्पर्धाचा समारोप

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २१ :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग व आर.डी.आय.के. बडनेरा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेमध्ये विजेत्या प्रथम, व्दितीय व तृतिय क्रमांक मिळविणा-या स्पर्धकांना सुवर्ण, रजत व कांस्य पदके देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.



पुरुष प्रथम चॅम्पियनशिप आर.डी.आय.के. बडनेरा, द्वितीय डी.सी.पी.ई. अमरावती, महिलांच्या स्पर्धेत प्रथम चॅम्पियनशिप डी.सी.पी.ई. अमरावती, द्वितीय श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांना प्राप्त झाली. उत्कृष्ट पुरुष खेळाडूचा पुरस्कार आर.डी.आय.के. बडनेरा महाविद्यालयाचा नितीन हिवराळे व बी.एस.पाटील महाविद्यालय, परतवाडाचा शंतनू डाहे यांना संयुक्तिक तर, उत्कृष्ट महिला खेळाडूचा पुरस्कार एस. आर. मोहता महिला महाविद्यालय, खामगांवची प्रणाली शेकोकार हिला मिळाला. डॉ. खुशाल अळसपुरे, डॉ. श्रीकांत माहुलकर, वैशाली पाटील, डॉ. विक्रांत वानखेडे, संतोष वानखेडे, डॉ. सुभाष गावंडे व डॉ. देवेंद्र गावंडे यांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या स्पर्धकांना पारितोषिके प्रदान करण्यात आलीत. विद्यापीठाच्या क्रीडा संकुलावर 18 ते 20 ऑक्टोबर दरम्यान या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

विद्यापीठाशी संलग्नित 136 महाविद्यालयांमधील 1112 स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेच्या दुस-या दिवशी 21 कि.मी. हाफ मॅराथॉन, तसेच 20 कि.मी. चालणे या स्पर्धा झाल्या. बक्षिस वितरण समारंभाला युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावतीचे सचिव श्री युवराजसिंह चौधरी, कार्यकारी सदस्य श्री पंकज देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, सौ. वैशाली पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र देशमुख उपस्थित होते. याप्रसंगी युवराजसिंह चौधरी, डॉ. राजेंद्र देशमुख, वैशाली पाटील, पंकज देशमुख यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. संचालन आदेश रक्षे, आभार डॉ. अतुल पाटील यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वीतेकरीता डॉ. हेमंतराज कावरे, डॉ. अतुल बिजवे, डॉ. विजय निमकर, कु. सविता बावनथडे, सौरभ त्रिपाठी,निलेश इंगोले, डॉ. चेतक शेंडे, रशिक व-हाडे, डॉ. सविता केणे, सुजीत सरडे, तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# वाहन परीक्षकाची चालकाला बेदम मारहाण

## साकोली डेपोत बसफेरीचे काम लावण्यावरून वाद

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. २१ :

साकोली बसस्थानकात बस क्रमांकानुसार लावण्याच्या कारणावरून अधिकाऱ्याने चालकाला बेदम मारहाण केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने खळबळ माजली आहे. हा वाहन अधिकारी एका चालकाच्या छातीवर बसून बेदम मारहाण करण्याचा विडीयो भंडारा जिल्ह्यातील साकोली व परिसरात सोशल मीडियात चांगलाच व्हायरल झाला आहे. याप्रकरणी कामात ढवळाढवळ करणाऱ्या व चालकाला बेदम मारहाण करणाऱ्या वाहन परीक्षक प्रदीप करंजेकर यांची बदली इतरत्र करावी, अशी मागणी केली जात आहे.



साकोली बसस्थानक येथे आगार प्रवेशद्वारा समोरच वाहन परीक्षक प्रदीप करंजेकर हे चालक पंकज काटनकर यांच्या छाताडावर बसून अश्लील शिव्या देत बेदम मारहाण करीत असल्याचे दिसत आहे. या व्हिडिओत स्वतः आगार व्यवस्थापक सचिन आगरकर तसेच एक महिला अधिकारी, वाहतुक नियंत्रक एकनाथ शहारे, कुणाल लिखार आणि सुरक्षा कर्मचारी सुद्धा दिसत आहेत. चालक पंकज काटनकर हे त्यांची बस फेरी कामगिरी व्यवस्थित का लावत नाही, म्हणून हा वाद विकोपाला गेला असल्याचे सांगितले जात आहे. अशा प्रकारचा वादविवाद या आगारात मागील दिड वर्षांपासून सुरू आहे.

या घटनेत चालक पंकज काटनकर यांच्या पार्श्वभागावर मार लागला असून हातापायाला दांडक्याने बेदम मारहाण झाली आहे. घटनेतील जखमी चालक पंकज काटनकर यांनी एक्सरे काढून पोलीस तक्रार केली असल्याची विश्वसनीय माहिती आहे. या गंभीर प्रकारानंतर वाहन परीक्षक प्रदीप करंजेकर यांची इतरत्र बदली करण्याची मागणी वाहन चालक वाहकांनी केली आहे.

# बाबूजी देशमुख वाचनालय व्याख्यानमालेचे सातवे पुष्प

## संविधानाची उद्देशिका हे राष्ट्राचे ओळखपत्र :आवटे



■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २१ :

देश काही वर्षांपासून एका स्थित्यंतरातून जात आहे. यामुळे राष्ट्राचा चेहरामोहरा बदलून गेला आहे. आज आपण जेथे उभे आहोत तेथे गतकाळच्या भारताची आपणास आठवण येते. राष्ट्र हे संविधानावर चालते. संविधानाची उद्देशिका हे राष्ट्राचे ओळखपत्र असून किंबहुना ते आपल्या सर्वांचेही ओळखपत्र असल्याचे मत श्रीरंजन आवटे यांनी व्यक्त केले.

बाबूजी देशमुख वाचनालयाच्या वतीने प्रमिलाताई ओक सभागृहात सुरू असलेल्या नवरात्र व्याख्यानात "संविधान आपले आय-कार्ड' या विषयावर पुणे येथील श्रीरंजन आवटे यांनी सातवे पुष्प गुंफले. ते म्हणाले, संविधान केवळ ओळखपत्र नसून ते राष्ट्राचे जीपीएसही आहे. या जीपीएसद्वारे आपणास आपल्या विकासात्मक मार्गाची माहिती मिळते. राष्ट्राचा नेमका पत्ता काय? नेमके हे संविधान सांगते. संविधानाने जगणं अनलॉक करून नवी ओळख दिली आहे.

आज या बहुआयामी संविधानाची मूल्ये पायदळी तुडवले जात आहेत. यावर चिंतन होणे काळाची गरज असल्याचे आवटे यांनी सांगितले. संविधान पूर्ण झाल्यावर ते कुणास अर्पण करावे हा वाद सुरू झाला. घटना समितीतील अनेक सदस्यांनी विविध प्रस्ताव ठेवले. कुणी म्हणे देवतेला अर्पण करा, कुणी म्हणले समाजाला द्या, मात्र शेवटी संविधान हे भारतातील प्रत्येक नागरिकांना अर्पण करण्यात आले. यानंतर राजमुद्रा कोणती करावी यावर चर्चा सुरू झाली. संविधान सभेतील सदस्य बदरुद्दीन तैयबजी यांनी इंग्रजांनी उत्खनात शोधून काढलेल्या सत्यमेव जयते लिखित अशोक स्तंभाची शिफारस सभेसमोर केली. माध्यमे हे समाजाचा आरसा होत. त्यांनी या संदर्भात जनजागृती केली पाहिजे, तसेच प्रत्येक नागरिकाने संविधानाचे वाचन केले पाहिजे, असे आवटे म्हणाले.

# दुबईत पहिले विश्व मुक्त सृजन मराठी साहित्य संमेलन

## अध्यक्षपदी साहित्यिका डॉ. मोना चिमोटे यांची निवड

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २१ :

दुबई येथे डिसेंबर महिन्यात भरणाऱ्या पहिल्या विश्व मुक्त सृजन मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अमरावतीच्या महिला साहित्यिकाची निवड झाली आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेच्या अधिष्ठाता तथा मराठी विभाग प्रमुख डॉ. मोना चिमोटे यांना हा मान मिळाला.



छत्रपती संभाजीनगर येथील मुक्त सृजन संस्था, मुक्त सृजन साहित्य पत्रिका आणि पुण्याच्या संस्कृती प्रकाशनाने या संमेलनाचे आयोजन केले आहे. दुबईत भरणारे हे पहिले संमेलन ५ ते १० डिसेंबर दरम्यान होईल, असे मुक्त सृजन साहित्य पत्रिकेचे संपादक डॉ. महेश खरात यांनी जाहीर केले. डॉ मोना मिलिंद चिमोटे या साहित्य समीक्षक व संशोधक असून लेखिका म्हणून त्यांची ओळख आहे. रहस्यकथा या कथाप्रकाराचा चिकित्सक अभ्यास या विषयावरील शोधप्रबंधासाठी डॉ. चिमोटे यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने आचार्य ही पदवी प्रदान केली आहे.

मराठी विज्ञान कथात्म साहित्याचा समाजावर होणारा परिणाम या विषयावर त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाचा पोस्ट डॉक्टरेट अवॉर्डही प्राप्त झाला आहे. अनुवादीत विज्ञान कथात्म साहित्याचा मराठी विज्ञान कथात्म साहित्यावर झालेला प्रभाव या विषयावर त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाचा मेजर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण केला. मराठी संकेतस्थळांची सूची, कवी अज्ञात यांची स्वच्छंद,अनुकंपा, डोहतळ, स्नेहदग्ध, ओघळांचे नकाशे, अनन्यशर आणि "अज्ञातवास : एक काव्यखंड" इत्यादी काव्यसंग्रहांचे संपादन त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या "पळसबंध" या ललित लेखसंग्रहास राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. शिवाय त्याचा हा संग्रह महाराजा सयाजीराव विद्यापीठातील बी.ए.भाग दोनसाठी मराठीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यांचे "कालखंडाचा साहित्याभ्यास" हे पुस्तक मुक्त विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी अभ्यासक्रमात समाविष्ट आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, विश्व मराठी साहित्य संमेलन, विदर्भ साहित्य संमेलन अशा विविध साहित्य संमेलनातील चर्चासत्रांमध्ये डॉ. मोना चिमोटे यांनी सहभाग नोंदवला आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयातील साठपेक्षा अधिक चर्चासत्र व परिसंवादांमध्ये त्यांनी शोधनिबंध सादर केले आहेत. नामवंत साहित्यिक व कलावंतांच्या प्रकट मुलाखती त्यांनी घेतल्या आहेत.

आकाशवाणी आणि दूरदर्शनवरील विविध चर्चांमध्ये त्या सहभागी झाल्या आहेत. विदर्भ साहित्य संघाच्या व अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या कार्यकारीणी सदस्य म्हणून त्यांनी योगदान दिले आहे.

# जिल्ह्यातील ९ विद्यार्थ्यांना १४ लाख रुपयांची मदत

**अमरावती :** अपंगत्व आणि मृत्यू या कारणांमुळे जिल्ह्यातील नऊ विद्यार्थ्यांना १४ लाख रुपयांची शासकीय मदत पुरवण्यात आली आहे. याशिवाय चालू आर्थिक वषार्तील विद्यार्थ्यांचे ८ प्रस्ताव निर्णयाधीन असून अंतीम निर्णयानंतर त्यांनाही मदत पुरवली जाणार आहे. दरम्यान या योजनेची व्याप्ती जिल्ह्यातील १ हजार ५७६ शाळांपर्यंत वाढविण्यात आली असून त्यामुळे ४० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीचे कवच प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत ही योजना राबविली जाते. पूर्वी ती विमा कंपन्यांमार्फत राबवली जायची. परंतु कंपन्यांद्वारे दावे मंजूर करण्याचे प्रमाण फारच कमी असल्याने राज्य शासनाने ती स्वतःकडे घेतली. त्यामुळे नव्या योजनेला राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना असे नाव देण्यात आले आहे. या योजनेचा लाभ पहिली ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना लागू असून त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. शिक्षणाधिकारी (योजना) हे या समितीचे सदस्य सचिव आहेत. या समितीपुढे गतवर्षी नऊ प्रस्ताव आले होते. यापैकी तीन प्रस्ताव विद्यार्थ्यांच्या अपघाती मृत्यूचे होते तर इतर प्रस्ताव हे विद्यार्थ्यांचा अपघात झाल्याचे होते.

# वीज कोसळल्याने सोयाबीन पिकाची सुडी जळून खाक

■ महासागर प्रतिनिधी
अंढेरा, दि. २१ :

परिसरातील एका शेतात वीज कोसळल्याने सोयाबीन सुडीला लागलेल्या आगीमुळे शेतकऱ्याचे अंदाजे ८० हजार रुपयांचे नुकसान झाले. ही घटना शनिवारी १९ ऑक्टोबर रोजी रात्री घडली.



अंढेरा येथील शेतकरी भगवान उमाजी कायंदे यांनी आपल्या शिवणी आरमाळ परिसरातील शेतात सोयाबीन पिकाची सोंगणी केल्यानंतर सुडी रचून ठेवली होती. पाऊस झाला. यावेळी भगवान कायंदे यांच्या शेतातील सोयाबीनच्या सुडीवर वीज कोसळली. त्यामुळे संपूर्ण सुडी जळून खाक झाली. यामध्ये कायंदे यांचे अंदाजे ७० ते ८० हजार रुपयांचे नुकसान झाले. २० ऑक्टोबर रोजी स. दहा वाजता शिवणी आरमाळच्या तलाठी रुपाली अनाळकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

# दिवाळीनिमित्त मेळघाटात जाणार १० हजार कपडे

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २१ :

गरज असेल त्या ठिकाणी मदतीसाठी सदैव तत्पर असणाऱ्या एमएच-२९ हेल्पिंग हँडच्या पुढाकाराने आणि यवतमाळकरांच्या सहकार्याने एमएच २९ हेल्पिंग हँडची टीम तब्बल दहा हजार कपडे व मिठाई पाकीट गरजूंसाठी मेळघाटातील नवलगाव भागात वाटप करणार आहे. हेल्पिंग हँडच्या वतीने घेण्यात आलेल्या या पुढाकाराने हजारो गरजूंना दिवाळीनिमित्त कपडे मिळणार असून त्यांची दिवाळी गोड होणार आहे.



मागील सहा वर्षांपासून एमएच २९ हेल्पिंग हँडच्या वतीने यवतमाळकरांना आवाहन करून, कपड्यांचे संकलन केल्या जाते. संकलित केलेले कपडे दिवाळीनिमित्त वितरित करण्यात येतात. मात्र, त्यासंदर्भात केलेल्या सर्वेक्षणाअंती असे लक्षात आले की, तेथील आदिवासी नागरिकांना कपडे घालायला तर दूरच बघायला सुद्धा नाही. त्यामुळे यंदाच्या दिवाळीला चांगल्या प्रतिचे कपडे या आदिवासींना घालता यावे व सामाजिक आनंद साजरा करता यावा, या जाणिवेतून दिवाळीनिमित्त एमएच २९ हेल्पिंग हँडच्या वतीने यवतमाळकरांना मेळघाटमधील नागरिकांना कपडे देण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यात मागील दिड महिन्यापासून दहा हजारांवर कपडे संकलित झाले आहेत. या सर्व कपड्यांचे संकलन स्थानिक बाजोरीया नगरातील शाळेत करण्यात आले होते. दिवाळीनिमित्त एमएच २९ हेल्पिंग हँडचे पदाधिकारी हे कपडे घेऊन मेळघाटकडे रवाना होणार आहे. तिथे नवलगाव गावामधील नागरिकांना हे कपडे व सोबत मिठाईचे वितरण वन विभाग कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनात करण्यात येणार आहे.

# शेतामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करणे काळसुसंगतः डॉ.आर.सी. अग्रवाल

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २१ :

आपल्या देशाची लोकसंख्या लक्षात घेता भविष्यात शेती क्षेत्रालाच अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होणार असून, पर्यायाने कृषी विद्यापीठांची व्याप्ती अधिकच वाढणार असल्याने शेती क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (ए.आय.) प्रभावी वापर अधिक लाभदायक ठरेल, असे प्रतिपादन भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्लीचे उपमहासंचालक डॉ. आर. सी. अग्रवाल यांनी केले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा ५६ वा स्थापना दिन रविवारी विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात उत्साहात झाला.




नवीन शैक्षणिक धोरणाने कृषी क्षेत्राला नव दिशा देण्याचा प्रयत्न केला असेही डॉ. अग्रवाल म्हणाले. आगामी काळात कृषी विद्यापीठाला देशभरातील अग्रगण्य दहा कृषी विद्यापीठांमध्ये स्थान मिळवण्यासाठी विद्यापीठातील सर्व घटक कृतिशील असल्याचे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी सांगितले.

याप्रसंगी विद्यापीठाचे संचालक संशोधन डॉ.विलास खर्चे, संचालक शिक्षण डॉ. श्यामसुंदर माने, संचालक विस्तार शिक्षण डॉ. धनराज उंदीरवाडे, अधिष्ठाता उद्यानविद्या डॉ. देवानंद पंचभाई, अधिष्ठाता कृषी अभियांत्रिकी डॉ. सुरेंद्र काळबांडे, नियंत्रक प्रमोद पाटील, कुलसचिव सुधीर राठोड, सहयोगी अधिष्ठाता डॉ.राजेंद्र गाडे, डॉ. राजेंद्र काटकर, डॉ. शैलेश हरणे, डॉ. प्रमोद वाकळे, डॉ. विलास अतकरे, नागपूर कृषी व्यवसाय व्यवस्थापन शाखेचे संचालक प्रा. डॉ. प्रकाश कडू, कुलसचिव डॉ. सतीश ठाकरे उपस्थिती होते. प्रास्ताविक विद्यापीठाचे कुलसचिव सुधीर राठोड यांनी केले. सूत्रसंचालन पीआरओ डॉ. किशोर बिडवे यांनी केले. डॉ. विलास खर्चे यांनी आभार मानले.

वैयक्तिक पुरस्कारांमध्ये पशुसंवर्धन व दुग्ध शास्त्र विभागाचे प्रा. डॉ. राजेश्वर शेळके यांना उत्कृष्ट शिक्षक, कापूस संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. संजय काकडे यांना उत्कृष्ट कृषी संशोधक, कृषी विज्ञान केंद्र सेलसुरा, जिल्हा वर्धाचे प्रमुख डॉ. जीवन कतोरे यांना उत्कृष्ट विस्तार संशोधक पुरस्कार व विभागीय फळ संशोधन केंद्र, काटोलचे डॉ. हितेंद्रसिंग गोरमनगर कृषी यांना उत्कृष्ट प्रक्षेत्र व्यवस्थापक तर मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला अंतर्गत वाशीम रोड फार्मचे शंकर देशमुख यांना उत्कृष्ट प्रक्षेत्र व्यस्थापन पुरस्कार देऊन गौरवले. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्कारांचे स्वरूप होते.

यंदाच्या विद्यापीठ स्थापना दिनाचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या सर्वोत्तम सेवांनी आणि परिश्रमाने विद्यापीठ पातळीवर सर्वोत्कृष्ट ठरलेल्या कृषी महाविद्यालय, कृषी तंत्र विद्यालय, कृषी विज्ञान केंद्र, कृषी संशोधन केंद्रासह उत्कृष्ट संशोधक, उत्कृष्ट विस्तार संशोधक, प्रक्षेत्र व्यवस्थापक यांना पुरस्कृत करण्यात आले. यामध्ये अकोल्याच्या कृषी महाविद्यालय सर्वोत्कृष्ट कृषी महाविद्यालयाचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले तर कृषी तंत्र विद्यालय, मुल मारोडा (जि. चंद्रपूर ) यांना उत्कृष्ट कृषी तंत्र विद्यालयाचा, विभागीय कृषी संशोधन केंद्र सिंदेवाही यांना उत्कृष्ट कृषी संशोधन प्रकल्प पुरस्कार तर कृषी विज्ञान केंद्र सेलसुरा (जि. वर्धा) यांना उत्कृष्ट कृषी विज्ञान केंद्र पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

# पोलिसांची २९ दुचाकींवर कारवाई

**अमरावती :** वाहतूक कोंडीच्या वेळीही पंचवटीसारख्या चौकात एक किंवा दोन वाहतूक पोलिस कार्यरत असतात. मात्र रविवारी वाहतूक कमी असतानाही दुपारी पूर्व वाहतूक शाखेचा मोठा ताफा तैनात होता. पोलिस आयुक्तांनी त्यांना कारवाईच्या सूचना दिल्या होत्या. त्या आदेशामुळेच ट्रिपल सीट जाणाऱ्या दुचाकीस्वारांची दुचाकी जप्त करण्यात आली. दिवसभरात वाहतूक विभागाने २९ दुचाकी जप्त केल्या. त्यामुळे दुचाकीने ट्रिपल सीट जाणाऱ्यांना पायी वारी करावी लागली किंवा प्रवासी ऑटोने समोरचा प्रवास करावा लागला.

पोलिस आयुक्तांनी नियमांची पायमल्ली करणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध कठोर कारवाईच्या सूचना केल्या. त्याचाच एक भाग म्हणून वाहतूक शाखा पूर्व विभागाच्या पीआय ज्योती विल्हेकर यांनी ताफ्यासह रविवारी दुपारी २ पर्यंत पंचवटी चौकात मोहीम राबवून ट्रिपल सीट जाणाऱ्यांच्या १६ दुचाकी जप्त केल्या.

# नूतन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड




■ महासागर प्रतिनिधी
मलकापूर, दि. २१ :

स्थानिक नूतन विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विभागीय सॉफ्ट टेनिस बॉल स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळविले असून, त्यांची राज्यस्तरासाठी निवड झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, अमरावती जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथील विभागीय क्रीडा संकुल येथे दि. १४ व १५ ऑक्टोबर रोजी ही विभागीय स्पर्धा पार पडली.

यामध्ये वैयक्तिक प्रकारात सोनल गणेश खर्चे हिने १७ वर्षे वयोगटात रौप्य पदक, मयंक विजय पळसकर १४ वर्षे वयोगटात रौप्य पदक, कार्तिक अजय कुदळे १७ वर्षे वयोगटात रौप्य पदक, ओम रामेश्वर मोरखडे १७ वर्षे वयोगटात रौप्य पदक व गुरुदत्त अश्विन यादव याने १९ वर्षे वयोगटात कांस्यपदक प्राप्त केले. या सर्वांनी सांघिक प्रकारात सुवर्ण पदक प्राप्त केले.

विद्यार्थ्यांनी या यशाचे श्रेय लोकसेवा बहुउद्देशीय शिक्षण मंडळाचे संचालक मंडळ, प्राचार्य ए. डी. बोरले, पर्यवेक्षक पी. एस. टेकाडे, क्रीडा शिक्षक डी. एस. राठोड, आर. पी. भारंबे, विजय पळसकर व गणेश खर्चे यांना दिले आहे.

# अवैध औषधविक्री करणाऱ्या मुंबईतील डॉक्टरला भंडाऱ्यात अटक

■ महासागर प्रतिनिधी,
भंडारा दि. २१ :

भंडारा पोलीस ठाण्यातील गुन्हे शाखेला एक गोपनीय कॉल आला, ह्लएका लॉजमध्ये शे-पाचेश माणसांची भली मोठी गर्दी झाली आहे, मात्र ही गर्दी लॉजमध्ये बुकिंग करणा?्यांची नव्हे तर रुग्णांची आहे. हे रुग्ण एका डॉक्टरकडे तपासणीसाठी आले आहेत. विशेष म्हणजे स्वत:ला मुंबईचा सुप्रसिध्द डॉक्टर म्हणविणाऱ्या या डॉक्टरने रुग्णांना देण्यासाठी एका पोतळीत औषध भरून आणली आहेत आणि तो आयुर्वेदिक, ॲलोपॅथी अशा विविध रोगांवर खात्रीलायक औषध देण्याचा दावा करीत आहे.ह्व अशी माहिती मिळताच पोलिसांनी लॉज गाठले आणि नियमबाह्य औषधिविक्री करणाऱ्या डॉक्टरला ताब्यात घेतले.

भंडारा बसस्थानकाजवळील रसना लॉजमध्ये हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आज सोमवारी सकाळी वाजता मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हे शाखेने धाड टाकताच येथे एक डॉक्टर रुग्णांना तपासात



असल्याचे आणि त्याच्या जवळ एका पोतळीत विविध प्रकारच्या औषधी वेगवेगळ्या पॉलीथिनमध्ये असल्याचे दिसून आहे. त्याचे सुमारे रुग्ण तपासून झालेले होते तर पाचशे रुग्ण तपासून घेण्यासाठी रांगेत होते. डॉ. राजेंद्र बाबुराव डाबरे असे या डॉक्टरचं नाव असून मुंबईतील सुप्रसिद्ध आयुर्वेदिक तज्ञ डॉक्टर असल्याचे त्यांनी त्यांच्या पत्रकात लिहिले आहे.

पासून भंडारा येथे येऊन डॉ. राजेंद्र डाबरे हा सर्व प्रकार करीत आहेत. दर महिन्याच्या सोमवारी ते या लॉजवर रुग्ण तपासणीसाठी येतात. यासंदर्भात त्यांनी एक पत्रक सुध्दा प्रकाशित केले असून ते सर्वत्र वाटले जाते.

डॉक्टरचे राहण्याचे ठिकाण नागपुर येथील पत्ता असून बीएएमएस, सीसीएच, सीजीओ अशा वैद्यकीय पदव्या प्राप्त केल्याचे डॉक्टर रुग्णांना सांगतो. दमा, संधीवात, आमवात, ठणक्यावात, आम्लपित्त, मुत्रविकार एवढेच नाही तर स्त्रियांचे आजार, मूलबाळ न होणे, गुप्तरोग, लैंगिक आजार, मधुमेह, अर्धांगवायु/ लकवा, इत्यादी आजारांवर खात्रीशिर औषध देवून मोफत तपासणी करून औषधीकरिता ३५० रुपये आकारले जात होते. याशिवाय मुतखडा, मुळव्याध, त्वचारोग, वजन कमी करणे या आजारांकरिता ७०० रुपये औषधी खर्च तर दारू सोडविण्याकरिता ५०० रुपये रुग्णांकडून घेतले जायचे. याशिवाय विविध रोगांसाठी ३०० ते ७०० रुपये औषधांचे घेतले जायचे. सकाळी ८ ते रात्री ८ असे १२ तास रुग्णाची रीघ लागलेली असायची.

धाड पडल्यानंतर डॉक्टरसह त्याच्या सोबत असलीस तरुणांनी पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. पोलिस गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शेवाळे, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालयात प्रशासन आणि अन्न व औषध प्रशासन यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली असून पुढील तपास सुरू आहे. किराणा भरून आणवा अशाप्रकारे औषध एका पोतलीत भरून आणली जातात. डॉक्टर वाबरे यांच्या हाताखाली ४ ते ५ तरुण पोरं असून ते औषधी वाटप करीत असतात. हे तरुण कोण याचाही तपास सुरू आहे.

# एकीकडे देवेंद्र फडणवीस यांचे निमंत्रण तर दुसरीकडे मेळाव्याचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
वर्धा दि. २१ :

भाजपच्या पहिल्या यादीत आवीर्चे आमदार दादाराव केचे यांचे नाव उमटले नाही. अन्य दोन विद्यमान आमदार डॉ. पंकज भोयर व समीर कुणावार यांना मात्र तिस-यांदा लढण्याची संधी मिळाली. केचे कां नाही, केचे काय करणार, असे प्रश्न चर्चेत आहे. याच अनुषंगाने आमदार केचे यांनी ऑक्टोबरला दुपारी आर्वीत मेळाव्याचे आयोजन केले आहे. तसे पत्रक काढले. त्यात ते म्हणतात की विधानसभा निवडणूक संदर्भात प्रमुख कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला आहे. त्यात विचारविनिमय होईल. आपण सर्व कार्यकर्त्यांच्या समक्ष निर्णय घेणे गरजेचे आहे. आपण उपस्थित रहावे, अशी आग्रहाची विनंती केचे करतात. मेळावा कश्यासाठी या थेट प्रश्नावर उत्तर देतांना ते म्हणाले, तिकीट जाहिर झाल्याने कार्यकर्त्यात असंतोष आहे. ते काय करतील नेम नाही, म्हणून मेळाव्यात चर्चा करणार. तसे आज मला डीसीएम ( उपमुख्यमंत्री फडणवीस) साहेबांनी बोलावले आहे. बघू. एकीकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भेटीस बोलावणे असल्याचे सांगणारे केचे हे मेळावा होणार असेही नमूद करतात. त्यामुळे पुढील दिवसात काय होणार, हा येथील राजकीय वर्तुळत कमालीचा उत्सुकतेचा भाग ठरत आहे. केचे पक्षश्रेष्ठिना आव्हान देण्याच्या भूमिकेत राहणार की तडजोड करणार, अशी उत्सुकता दिसून येते. या ठिकाणी फडणवीस यांचे विश्वासू सुमित वानखेडे यांचे नाव संभाव्य उमेदवार म्हणून घेतल्या जात आहे. वानखेडे यांनी गत दोन वर्षात विविध विकास कामांचा धडाका लावत उमेदवारीकडे पाऊल टाकले असे म्हटल्या जाते. या काळात केचे यांनी अप्रत्यक्षपणे वानखेडे यांच्यावर टिकाही केली होती. मात्र ते सतत मीच उमेदवार राहणार, अशी ग्वाही पण देत होते. पण पहिल्या यादीत त्यांचे नाव नं आल्याने वातावरण तापले. आता मेळावा घेत केचे यांनी आव्हानात्मक भूमिका घेतली आहे. फडणवीस यांचे बोलावणे असल्याचे ते म्हणत आहे. म्हणजे फडणवीस इ्र केचे बैठकीत काय मार्ग निघतो, ते महत्वाचे ठरणार. काही आश्वासन देऊन केचे यांना शांत करण्याचा प्रयत्न होणार की केचे तिसरी संधी घेतल्याशिवाय माघारी फिरणार नाही, असा तिढा आहे. तिकीट नं मिळाल्यास केचे बंडखोरी करणार, अशी पण चर्चा आर्वी परिसरात सूरू झाली आहे.

# स्टॅम्प पेपर शुल्कात चौपट वाढ

## सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री

■ महासागर प्रतिनिधी,
महागाव दि. २१ :

सामान्य नागरिकांना विविध कारणासाठी लागणारे तहसील कार्यालयातले प्रतिज्ञापत्र भलतेच महागले आहे. १०० रुपयांचा स्टॅम्प पेपर ऐवजी ५०० रुपयांचा स्टॅम्प पेपर नागरिकांना खरेदी करावा लागणार आहे. शासकीय शुल्कात चौपट वाढ केल्याने नागरिकांचे चांगले कंबरडे मोडले आहे. शासनाने त्वरित रेव्हेन्यू शुल्कात केलेली वाढ रद्द करावी अशी मागणी आता नागरिकाकडून होत आहे, ही वाढ १४ ऑक्टोबर पासून शासनाने राजपत्र प्रसिद्ध करून अंमलात आणल्याने शासनाकडून जाहीर करण्यात आले आहे.

आता १०० रुपयांचे प्रतिज्ञापत्र करण्यासाठी आता थेट चौपट म्हणजे रुपये मोजावे लागणार आहेत. , , रुपयांबाबत शासनाकडून करण्यात येणारे दस्त बंद करून थेट शंभर ऐवजी रुपयांचा स्टॅम्प पेपर आता सर्वसामान्य नागरिकांना खरेदी करावा लागणार आहे. याचा थेट परिणाम हा सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावणार आहे. सामान्य माणसाला उठले ही शासकीय निमशासकीय काम करीत असताना शंभर रुपयांचा स्टॅम्प पेपर हा प्रतिज्ञापत्र करारनामा होत असे. शंभर ऐवजी पाचशे रुपयांचा स्टॅम्प पेपर केल्याने विद्यार्थ्यांना याचा सर्वाधिक फटका आगामी काळात बसणार आहे. दहावी पासून पदवी,पदव्युतर घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वात प्रकारचे प्रतिज्ञापत्र हे शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपर वरती करावे लागत होते ते आता पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर करावे लागणार आहेत. भाडेकरार घटस्फोट अन्य प्रकारचे करारनामे व जे शासकीय दस्त पूर्वी शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर केले जात होते. त्यामध्ये शासनाने बदल करून थेट पाचशे



रुपयांचे पेपरवर सर्वसामान्य व सर्वच नागरिकांना करावे लागणार आहे. यामुळे तिजोरीतल्या खडखडाटचे रूपांतर खळखळाटामध्ये करण्यासाठी नागरिकांच्या खिश्याला चांगलीच कात्री लावली आहे. त्यामुळे शासनाने एकीकडून पैशाची खैरात केली असली तरी नागरिकांच्या आणि लाडक्या भावाच्या खिशाला मात्र चांगली कात्री लावली आहे. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी राजपत्र प्रसिद्ध करून सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावणाऱ्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू केली आहे. राजपत्र प्रसिद्ध केल्याने मतदारांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. तो निर्णय त्वरित रद्द करून दिलासा द्यावा शासनाने शंभर रुपयाचे ऐवजी ५०० रुपयांचा बाँड करण्याबाबतचा घेतलेला निर्णय त्वरित रद्द करावा अन्यथा आगामी येणाऱ्या निवडणुकीमध्ये त्याचा फटका बसल्याशिवाय राहणार नाही. असे मत मतदारराजा संतापातून व्यक्त करीत आहेत. लाडक्या बहिणींना पैसे वाटण्याबाबत कोणीच मागणी न करता मटपेतीकडे लक्ष देऊन घेतलेला घातकी निर्णय शासनाच्या तिजोरीच्या मुळावरती घाव घालणारा आहे.

# नवनीत राणा पुन्हा लोकसभेत जाणार ?

## नांदेड पोटनिवडणुकीत उमेदवारी देण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती दि. २१ :

केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यातील विधानसभा निवडणुकीसह नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीची घोषणा केली आहे. नवनीत राणा या नांदेड लोकसभा पोटनिवडणूक लढवणार असल्याची चर्चा सुरू आहे. नवनीत राणा यांना भाजपने नांदेड लोकसभेची उमेदवारी द्याची, अशी मागणी भाजपच्या एका गटाकडून करण्यात आल्याची माहिती आहे. कारण नांदेड येथे शीख धर्मियांचे तीर्थस्थळ आहे, तर नवनीत राणा यांचे वडील मूळ पंजाबचे आहेत, त्यामुळे त्या तिथे जिंकतील, असे या गटाचे म्हणणे आहे. २०२४ लोकसभा निवडणुकीत नवनीत कौर राणा यांचा पराभव झाला होता. काँग्रेसचे बळवंत



### भाजप कुणाला संधी देणार ?

भाजपने या पोटनिवडणुकीसाठी अद्याप आपल्या उमेदवाराच्या नावाची घोषणा केली नाही. त्यामुळे भाजप या ठिकाणी पुन्हा प्रतापराव चिखलीकर यांनाच संधी देते, की त्यांच्या जागी एखादा नवा चेहरा मैदानात उतरवते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. त्यातच भाजपच्या एका गटाने नवनीत राणा यांना उमेदवारी देण्याची मागणी केली आहे. आता या मागणीवर भाजप पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतात, नवनीत राणा यांचे पोटनिवडणुकीत पुनवर्सन करतील का ? हे पहावे लागणार आहे.

वानखेडे यांनी त्यांचा पराभव केला होता. त्यामुळे भाजपने नवनीत राणा यांना नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत उमेदवार द्यावी अशी मागणी होत आहे. भाजपच्या एका गटाकडून ही मागणी करण्यात आली. आता या मागणीवर भाजप पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतात, हे पहावे लागणार आहे.

### एमआयएमचे इम्तियाज जलील निवडणुकीच्या रिंगणात

एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी नांदेड लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या घोषणेमुळे त्यांचा सामना काँग्रेसचे येथील उमेदवार रवींद्र चव्हाण यांच्याशी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपने अद्याप येथून उमेदवार दिला नाही. दरम्यान, जलील यांनी छत्रपती संभाजीनगर येथून विधानसभा निवडणूक लढवण्याचेही संकेत दिलेत.

### काँग्रेसकडून रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी

नांदेड लोकसभेचे खासदार वसंत चव्हाण यांचे २६ ऑगस्ट रोजी निधन झाले होते. त्यामुळे त्यांची जागा रिक्त झाली होती. त्यानंतर नांदेड जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या बैठकीत वसंतराव चव्हाण यांचे चिरंजीव रवींद्र चव्हाण यांनाच उमेदवारी देण्याचा ठराव पारीत करण्यात आला होता.

# पीएमश्रीत ३४९ शाळा निकषात पात्र

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ दि. २१ :

जिल्ह्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक आणि माध्यमिकच्या शाळांची पीएमश्री योजनेत नोंदणी झाली होती. या शाळांची तपासणी जिल्हास्तरावर करून गुणांकन देण्यात आले. त्यानंतर शासनाकडे अहवाल सादर करण्यात आला होता. यात शाळा निकषात पात्र ठरल्या असून, त्यापैकी १४ शाळांच्या निवडीवर शिक्कामोर्तब झाले आहे. मागील वर्षी जिल्ह्याभरातील शाळांची निवड या योजनेतून करण्यात आली होती. यात प्रामुख्याने जिल्हा परिषदेसह नगर पालिका हद्दीतील शाळांचा समावेश आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या संयुक्त निधीतून पीएमश्री स्कूल योजना मागील वर्षांपासून राबवण्यास सुरूवात झाली आहे. या योजनेच्या माध्यमातून निवड झालेल्या शाळांमध्ये पायाभूत सुविधांसह नाविण्यपूर्ण शिक्षण, आणि तंत्रज्ञान, संसाधने, पाठ्यपुस्तके, गणवेश, टीचींग, लर्नीग, बांधकाम, ग्रंथालय अनुदान, सक्षमीकरण प्रशिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, दिव्यांग वाहतूक सुविधा, संयुक्त शाळा अनुदान यासह इतरही सोयीसुवीधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या सोयी सुविधातून आदर्श शाळा निर्मिती केली जाणार आहे. दरम्यान, जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासकीय प्राथमिक, उच्च प्राथमिक तसेच माध्यमिकच्या ५२४ शाळांची निवड शासनस्तरावरून करण्यात आली होती. त्यानंतर, जिल्हास्तरावर शाळांची तपासणी करण्यात आली. तपासणीअंती प्रत्येक शाळांना गुणांकन देण्यात आले. यात जास्त गुणांकन असलेल्या शाळा निकषात पात्र ठरल्या आहेत. पात्र ठरलेल्या या शाळांमधून पीएमश्री योजनेसाठी निवड होणार आहे. त्यापैकी १४ शाळांच्या निवडीवर शिक्कामोर्तब झाला आहे. निवड झालेल्या शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. शासनाकडे पाठवले २६ शाळांचे परिपूर्ण बजेट मागील वर्षी वाढोणा बाजार, बिटरगाव खू., जिल्हा परिषद मुलांची शाळा उमरखेड, ढाणकी अप्पर प्रायमरी ऊर्दू, वणी तालुक्यातील रासा, हिवरी, लोहारा, आर्णी नगर पालिका क्रमांक पाच ऊर्दू, लोणी, बाभुळगाव, मुकूटबन, राणी अमरावती, दारव्हा नगर पालिका क्रमांक तीन, करजगाव, डेहणी, दिग्रस नगर पालिका क्रमांक एक, सायतखर्डा, घाटंजी नगर पालिका क्रमांक दोन, मुडाणा, नवरगाव, जोडमोहा, बोरी पाटण, घाटोडी.

# पोलिस कस्टडीमधून आरोपी फरार

बुलढाणा

नांदुरा पोलिसांच्या पोलिस कस्टडीमध्ये असलेल्या एका सराईत गुन्हेगाराने रविवारी दुपारच्या सुमारास पोलिस स्टेशनमधून पळ काढल्याने पोलिस यंत्रणेत खळबळ उडाली आहे. याबाबत सविस्तर हकीकत अशी की हलखेडा तालुका मुक्ताईनगर येथील रहिवाशी आरोपी नामे प्रवीण बाबू भोसले वय २५ हा बुलढाणा जिल्हा कारागृहात असताना नांदुरा पोलिसांनी त्यांच्याकडे दाखल गुन्हा क्रमांक ४९५/२०२४ कलम ३१८(४),



३(५) भारतीय न्याय संहिता नुसार दाखल गुन्ह्याच्या तपासकामी नांदुरा पोलिस स्टेशनचे तपास अधिकाऱ्यांनी सदर आरोपीस बुलढाणा जिल्हा कारागृहातून

# जिल्ह्यातील ९ विद्यार्थ्यांना १४ लाख रुपयांची मदत

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती दि. २१ :

अपंगत्व आणि मृत्यू या कारणांमुळे जिल्ह्यातील नऊ विद्यार्थ्यांना १४ लाख रुपयांची शासकीय मदत पुरवण्यात आली आहे. याशिवाय चालू आर्थिक वर्षातील विद्यार्थ्यांचे ८ प्रस्ताव निर्णयाधीन असून अंतीम निर्णयानंतर त्यांनाही मदत पुरवली जाणार आहे. दरम्यान या योजनेची व्याप्ती जिल्ह्यातील १ हजार ५७६ शाळांपर्यंत वाढविण्यात आली असून त्यामुळे ४० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीचे कवच प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत ही योजना राबविली जाते. पूर्वी ती विमा कंपन्यांमार्फत राबवली जायची. परंतु कंपन्यांद्वारे दावे मंजूर करण्याचे प्रमाण फारच कमी असल्याने राज्य शासनाने ती स्वत:कडे घेतली. त्यामुळे नव्या योजनेला राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना असे नाव देण्यात आले आहे. या योजनेचा लाभ पहिली ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना लागू असून त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली



जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. शिक्षणाधिकारी (योजना) हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.

यापैकी तीन प्रस्ताव विद्यार्थ्यांच्या अपघाती मृत्यूचे होते तर इतर प्रस्ताव हे विद्यार्थ्यांचा अपघात झाल्याचे होते. सदर योजनेंतर्गत मृत्यू ओढवलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुबीयांना प्रत्येकी दीड लाख रुपये देण्यात आले. तर दोन अवयव निकामी झाल्याने कायमचे अपंगत्व आलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपये आणि एक डोळा किंवा एक अवयव निकामी झाल्यास हजार रुपयांची मदत करण्यात आली.

### आठ प्रस्ताव निर्णयाधीन

चालू आर्थिक वर्षात पुन्हा आठ विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या कारणांमुळे अपंगत्व आले आहे. जिल्ह्याच्या विविध भागांतील या प्रस्तावाची कागदपत्रे शाळांच्या माध्यमातून शिक्षणाधिकारी यांच्याकडे पोहोचली असून ती आगामी बैठकीत जिल्हाधिकारी यांच्यापुढे ठेवली जाणार असल्याचे शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले.

# सोयाबीनच्या नुकसानीने दिवाळीत आर्थिक गणित बिघडणार

## शेतकऱ्यांचा टाहो, परतीच्या पावसा बस्स करं रे बाबा, आता नको बरसू!

■ महासागर प्रतिनिधी,
महागाव दि. २१ :

खरीप हंगाम संपून रब्बीची मशागत सुरू होण्याची वेळ आली. मात्र, पाऊस काही थांबला नाही. सोयाबीनचे पिक चांगले होईल, या आशेने शेतकरी मेहनत घेत होता. सोयाबीन काढणीची वेळ आली मात्र पाऊस सुरूच असल्याने अनेक शेतकऱ्यांचे पावसातच सोयाबीन भिजले. शनिवारी ऑक्टोंबर रोजी दोन मंडळात अतिवृष्टी झाली. बहुतांश शेतकऱ्यांचे शेतातील सोयाबीन ओले झाले आहे. तसेच जिल्ह्यातील सात जनावरांचा मृत्यू झाला. तर दारव्हा तालुक्यात विज पडून एक जण जखमी झाला आहे. एकंदरित प्रचंड वेदनादायी ठरत असलेल्या या पावसाला बस्स करं रे बा, आता नको बरसू ! असे म्हणण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. जिल्ह्यात यंदा पावसाळ्यात प्रत्येक महिन्यात अतिवृष्टी झाली. त्याचा फटका शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसला. मात्र, चांगल्या पावसाने लहान मोठे प्रकल्प तुडुंब भरले आहे. असे असले तरी परतीच्या पावसाने जिल्ह्यात शुक्रवारपासून



थैमान घातले आहे. शेतात शिवारात सोयाबीनचे पीक काढण्याचा हंगाम सुरू आहे. यातच वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे. यामुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शनिवारी २३.३० मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली. जिल्ह्यातील दोन महसुली मंडळांत अतिवृष्टी झाली असून कळंब तालुक्यातील हेक्टरवरील सोयाबीन, कापूस पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तसेच केळापूर, दारव्हा, महागाव, यवतमाळ तालुक्यातील सात जनावरे दगावली आहे. शनिवारी दारव्हा तालुक्यातील मांगकिन्ही येथे शेतात काम करीत असलेल्या शेतकऱ्यांच्या अंगावर विज पडल्याने तो गंभीररीत्या जखमी झाला. सोबतच शेतामध्ये उभ्या असलेल्या कपाशी, तुरीच्या पिकासोबत काढणी सुरू असलेल्या सोयाबीनची चिंता शेतकऱ्यांना लागली आहे. असाच पाऊस राहिल्यास दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांची अडचण होणार आहे. सोंगणीआधीच परतीच्या पावसामुळे शेतात खिचपत पडलेले सोयाबीनचे पीक.

### चिलगव्हाण येथे वीज पडून दोन म्हशींचा मृत्यू


महागाव तालुक्यात विजेच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. याच दरम्यान रात्री साडेनऊ वाजताच्या तालुक्यातील चिलगव्हाण येथील अल्पभूधारक शेतकरी पंकज अवधुत लांडे यांच्या शेतात बांधून असलेल्या दोन म्हशींवर विज कोसळल्याने त्यांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे शेतकऱ्यांचे अंदाजे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. तलाठी रेवणकर यांनी पंचनामा केला.

# झाडीपट्टी रंगभूमीचे गद्दार' नाटक सादर

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला दि. २१ :

अखिल भारतीय नाट्य परिषदेचा शताब्दी नाट्याचे उद्घाटन पद्मश्री परशुराम खुणे यांच्या हस्ते करण्यात आले. शहरात प्रथमच रंगकर्मी - रंगभूमी प्रकारचे नाट्यप्रकार वडसा देसाईगंज येथील झाडी पट्टी रंगभूमीचे संगीत गद्दार' या दोन अंकी नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी अरूण घोटाळे, रमेश थोरात, अशोक ढेरे आदी उपस्थित होते.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील डॉ. के.सी. ठाकरे सभागृहात ऑक्टोबर रोजी आनंद



भिमटे लिखीत व नरेश गडेकर दिग्दर्शित झाडी पट्टी रंगभूमीचे संगीत गद्दार'' या नाटकचे सादरीकरण करण्यात आले. झाडीपट्टीतील कलावंत एखादा विषय कशाप्रकारे हाताळतात, याचीही प्रचिती यावेळी आली. विनोदातून तिडके यांची कणखर व भावनाप्रधान भूमिका व जगनशेट म्हणून नरेश गडेकर यांनी उभी केलेली अस्सल राजकारणी पुरुषाची भूमिका प्रेक्षकांना भावली. झाडीपट्टीतील बोलीभाषेत अरविंद झाडे यांनी रचलेली भूमिका दमदार ठरली. सुलोचना खोब्रागडे, करिष्मा मेश्राम, पौर्णिमा तायडे, शुभम मेश्राम यांनी आपल्या वेगळ्या अशा अभिनयाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शशिकांत जोशी यांनी केले.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **TOSHIBA TABASSUM KHAN.** NOW MY NEW NAME IS **TOSHIBA RIZWAN KHAN.**
ADD : PLOT NO. 49,KATOL ROAD, NEAR CID OFFICE, KAMGAR NAGAR, POLICE LINE TAKLI, NAGPUR 440013

MY OLD NAME WAS **SAJID SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **SAJID AHMAD SHAIKH.**
ADD : PLOT NO.107,DURGA NAGAR PARDI NAGPUR 440035

MY OLD NAME WAS **MAYURI MUKALAN BAGADE.** NOW MY NEW NAME IS **AYESHA BANO SHAIKH AZHAR.**
ADD : PARPETH MALKAPUR BULDHANA - 443101

MY OLD NAME WAS **SYEDA SALIHA MANZOOR.** NOW MY NEW NAME IS **SYEDA SALIHA MANZOOR ALI.**
ADD : TOPKHANA HINGOLI - 431513

RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# जोश

फंडू एसएमएस

इतना भी गुमान न कर अपनी
जीत पर ऐ बेखबर,
शहर में तेरी जीत से ज्यादा,
चर्चे मेरे हार के हैं।

खुद को खोने का पता नही चला,
किसी को पाने की यूँ इन्तहा
कर दी मैंने।

तुझे भुलना भी चाहूं तो भुलाऊँ कैसे,
तेरी याद से है अपना दामन
छुड़ाऊँ कैसे, मेरी हर खुशी हर मुस्कान
मोहताज है तेरी, मगर तुझको
इसका एहसास दिलाऊँ कैसे।



## सैर बांधवगडची

दोस्तांनो, तुम्हाला वन्यजीवन आवडत असेल किंवा यंदा जंगलसफारीची योजना आखत असाल तर मध्य प्रदेशमधलं बांधवगड राष्ट्रीय उद्यान खास आहे. बांधवगड राष्ट्रीय उद्यान वाघांसाठी प्रसिद्ध आहे. ४५० चौरस किलोमीटर परिसरात पसरलेलं हे राष्ट्रीय उद्यान जैवविविधता आणि निसर्गसौंदर्यासाठी ओळखलं जातं. बांधवगड राष्ट्रीय उद्यानात ३५० प्रजातींचे पक्षी पहायला मिळतात तर प्राण्यांच्या २२ प्रजाती इथे सुखाने नांदतात.

वाघांसह इथे चितळ, तरस, माकडं, हरणं, सांबर, चिंकारा, बिबट्या, रानमांजर हे प्राणी मुक्तपणे विहार करताना दिसतात. नोव्हेंबर ते मार्च या काळात इथे फिरता येईल. जबलपूरला उतरून बांधवगडला जाता येईल. विविध प्रकारची झाडं, झुडपंही इथे पहायला मिळतील. पक्षीप्रेमी, प्राणीप्रेमी, निसर्गप्रेमी प्रत्येकासाठीच इथे काही तरी खास आहे. साप, अजगर कासव असे प्राणीही इथे पहायला मिळतात. थंडीत इथलं तापमान काही अंशांपर्यंत जातं. त्यामुळे थंडीच्या दिवसात बांधवगडला जाणार असाल तर गरम कपडे न्यायला विसरू नका. मग निघताय ना, बांधवगडला मनसोक्त भटकंती करायला...

**भटकंती**



जस कालरा हा अवघ्या २५ वर्षांचा तरुण. आज तो निराधारांचा आधार झाला आहे. आपल्या संस्थेच्या माध्यमातून तो बेघरांना निवारा देतो आहे. जस सेवाभावी वृत्तीने काम करतो आहे. जसचे वडीलही गरजू माणसं, प्राणी आणि पर्यावरणासाठी काम करायचे. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून जस पुढे जातो आहे. त्याने बेवारस मृतदेहांवरही अंत्यसंस्कार केले आहेत.



## निराधारांचा आधार...

जस कालरा हा 'अर्थ सॅव्हियर्स फाउंडेशन' संस्थेचा अध्यक्ष आहे. या संस्थेने आजघडीला १२०० बेघरांना निवारा दिला आहे.बेघरांच्या दैनंदिन गरजा भागवण्याचं काम ही संस्था करते. त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करते. घर नसलेल्या अनेकांना आधार देते. जस या कार्याला सेवाकार्य असं म्हणतो. हे कार्य सुरू करण्याचं त्याचं ठराविक असं वय नव्हतं. वयाच्या नवव्या वर्षापासून जस आपल्या वडिलांना रवी कालरा यांना अशा पद्धतीने सेवाभावी वृत्तीने काम करताना बघत आला. रवी यांनी २००८ मध्ये 'अर्थ सॅव्हियर्स फाउंडेशन' या संस्थेची स्थापना केली. रस्त्यावर राहणाऱ्या गरजू लोकांना शोधण्यासाठी रवी कालरा स्वत: जात असत. अशा लोकांना शोधून ते संस्थेत आणत असत आणि त्यांची सेवा करत असत. जसवर हेच संस्कार होत होते. वयाच्या एकवीसाव्या वर्षी जसने वडिलांकडून या सेवाकार्याचे धडे घ्यायला सुरुवात केली. आपणही वडिलांचं हे कार्य पुढे न्यायचं असा निर्धार त्याने केला होता. दुर्दैवाने काही महिन्यांतच जसच्या वडिलांचं निधन झालं. वडील सेवाकार्याची मोठी जबाबदारी जसच्या खांद्यांवर सोडून गेले होते. जसनेही मग या कार्यालाच सर्वस्व मानलं. त्याने आपल्या सगळ्या इच्छा-आकांक्षा बाजूला ठेवल्या आणि कामाला लागला.

जसच्या संस्थेची दारं समाजाने नाकारलेल्यांसाठी कायम खुली असतात. आज लोक आपल्या म्हाताऱ्या आईवडिलांना रस्त्यावर सोडून देतात. कोणाचाही आधार नसलेल्या या ज्येष्ठांना जसची संस्था आधार देते. रस्त्यावरच्या अपंगांना, आजारी लोकांना या संस्थेत आणलं जातं आणि त्यांच्या देखभालीची सगळी जबाबदारी घेतली जाते. आज त्याच्या संस्थेत १२०० लोक आहेत. त्यांची सगळी काळजी जस घेतो. मला या लोकांकडूनच शक्ती मिळते, असं जस सांगतो.

एवढं कौर्य सहन करूनही या लोकांमध्ये असणारी जगण्याची उर्मी आपल्याला आश्चर्यचकीत करत असल्याचं जसचं म्हणणं आहे. या लोकांचा खंबीरपणा मनाला भावतो, असं त्याचं म्हणणं आहे. जसने स्वत: १५०० लोकांची अत्यंत वाईट परिस्थितीतून सुटका केली आहे. त्यांना त्वरित औषधोपचार मिळवून दिले आहेत.

**अचिव्हर**



इतकंच नव्हे तर त्याने ३००० लोकांचं त्यांच्या कुटुंबासोबत पुनर्मिलन घडवून आणलं आहे.

जस फक्त एवढ्यावरच थांबलेला नाही. त्याने ३००० बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कारही केले आहेत. जीवंतपणी मरणयातना सोसणाऱ्यांना मृत्यूनंतर तरी मुक्ती मिळावी, या उद्देशाने तो हे कार्य करतो आहे. जसला गुरुग्राममध्ये पाच हजार लोकांच्या आसऱ्याची सोय करायची आहे. त्यासाठी त्याचे प्रयत्न सुरू आहेत. इथे सगळ्या सुविधा मोफत उपलब्ध करून देण्याची त्याची इच्छा आहे. जसला कोणतीही सरकारी मदत मिळत नाही. त्याचं सगळं काम लोकांनी दिलेल्या देणग्यांवर चालतं. एवढ्या तरुण वयात अशा पद्धतीने सेवाकार्यात स्वत:ला वाहून घेणं ही खरंतर खूप मोठी गोष्ट म्हटली पाहिजे.

**सोशल मिडिया**

### हाईड युवर स्टोरी

तुमची इन्स्टाग्राम स्टोरी कोणी बघायची हे तुम्ही ठरवू शकता. तुमचं इन्स्टा अकाउंट लॉक नसेल तर नॉन फॉलोअर्सही तुमची स्टोरी बघू शकतात. तसंच काही वेळा ठराविक लोकांना स्टोरी दाखवायची नसते. अशा वेळी स्टोरी हाईड करता येते. स्टोरी हाईड करण्यासाठी इन्स्टामध्ये जाऊन खालच्या बाजूला असणाऱ्या प्रोफाईल आयकॉनवर क्लिक करा. यानंतर दिसणाऱ्या तीन रेषांवर क्लिक करा. सर्च बारमध्ये हाइड स्टोरी अँड लाईव्ह सर्च करा. अन्यथा तुम्ही सेटिंग आणि प्रायव्हेसीमध्येही हा पर्याय शोधू शकता. आता हाईड स्टोरी अँड लाईव्हवर टॅप करा. इथे तुम्हाला सगळे फॉलोअर्स आणि तुम्ही फॉलो करत असलेल्या लोकांची यादी दिसेल. स्टोरी किंवा लाईव्ह दाखवायचं नसेल त्यांच्या नावावर क्लिक करा आणि डन म्हणा. अशा पद्धतीने तुम्ही स्टोरी हाईड करू शकता.

**स्मार्ट टिप्स**

### स्क्रीन टाईम कमी करण्यासाठी...



आपला बराचसा वेळ फेसबुक, व्हॉट्स ॲप, इन्स्टाग्रामसारख्या सोशल मीडियावर जातो. हे टाळण्यासाठी तुम्ही ॲपला टायमर लावू शकता. एखादं ॲप अर्धा तास बघायचं असेल तर तसा टायमर लावता येईल. यासाठी सेटिंगमध्ये जाऊन डिजिटल वेलबीइंग आणि पॅरेंटल कंट्रोलमध्ये जा. इथे ॲप लिमिट्सचा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक केल्यानंतर फोनमधली सगळी ॲप्स दिसू लागतील. टायमर लावायच्या ॲपवर क्लिक करा. त्यानंतर ॲप टायमरवर क्लिक करून टायमर सेट करा.

**ॲप वर्ल्ड**

### कोणी बघितला मेसेज


व्हॉट्स ॲप ग्रूपवर पाठवलेला मेसेज कोणी बघितला आहे हे आपण जाणून घेऊ शकतो. यासाठी व्हॉट्स ॲप ओपन करून संबंधित ग्रूपमध्ये जा. त्यानंतर मेसेजवर टॅप करून बराच काळ धरून ठेवा. मग वरच्या बाजूला आय बटणावर टॅप करा. इथे रिड बाय आणि डिलिव्हर्ड टू असे दोन पर्याय दिसतील. रिड बायमध्ये नावं दिसणाऱ्या ग्रूप मेंबर्सनी तुमचा मेसेज वाचला आहे तर डिलिव्हर्ड टू च्या यादीतल्या नावांनी अजून मेसेज वाचलेला नाही. अशा पद्धतीने ग्रूपमध्ये तुम्ही पाठवलेला मेसेज कोणी वाचला आहे हे तुम्ही बघू शकता.



**बी अ‍ॅलर्ट**

### आय फोन खरेदी करताय?

अनेक जण फेस्टिव्हल्समधून आयफोन विकत घेतात. मात्र अनेकदा तुमची फसवणूक होऊ शकते. बनावट आयफोन पदरी पडू शकतो. अशा परिस्थितीत बनावट आयफोन ओळखून फसवणूक टाळणं आवश्यक आहे. आयफोनच्या पॅकेजिंगकडे लक्ष द्या. बनावट आयफोनचा बॉक्स वेगळा असू शकतो. बॉक्सवरील माहितीही वाचायला हवी. अशा बॉक्सवरची माहितीही चुकीची असू शकते. तसंच बनावट आयफोनच्या बॉक्सवर आयएमईआय क्रमांक आणि अन्य माहिती लिहिलेली नसते. फोनमधल्या सॉफ्टवेअरची माहिती घ्या. तसेच तुम्ही ॲपलच्या साईटवर जाऊनही आयएमईआय क्रमांक तपासून बघू शकता. अशा पद्धतीने थोडी सावधगिरी बाळगून फसवणूक टाळता येऊ शकते.



## रोमांच कसा टिकवू?

मी २५ वर्षांचा तरुण असून गेल्या तीन वर्षांपासून एका मुलीच्या प्रेमात आहे. आम्ही दोघं नोकरीनिमित्ताने वेगवेगळ्या शहरात रहातो. आमचं एकमेकांवर खूप प्रेम आहे. पण लांब रहात असल्याने आमची खूप कमी वेळा प्रत्यक्ष भेट होते. आमची बरीच भांडणं होतात. बरेच गैरसमजही निर्माण होतात. आम्ही फोनवरूनच एकमेकांच्या संपर्कात असतो. आमच्या नात्यातला रोमांच टिकवून ठेवण्यासाठी काय करता येईल?

उत्तर : मित्रा, तुमच्या नात्यातली रंजकता, प्रेम टिकवून ठेवण्यासाठी काही वेगळ्या गोष्टी करा. लांब असूनही तुम्हाला काही गोष्टी एकत्रितपणे करता येतील. तुम्ही व्हिडिओ कॉलवर एकमेकांशी बोलू शकता. व्हिडिओ कॉल करून एकत्र स्वयंपाक करू शकता. एखादा चित्रपट, मालिका एकत्र बघू शकता. आपल्या आवडीनिवडी शेअर करा. तू तुझ्या मैत्रिणीला छोट्या भेटवस्तू पाठवू शकतोस. चॉकलेट्स, फुलं, कार्ड असं काहीही पाठवता येईल. सोबत छानसा संदेश पाठव. कधी तरी एखादं पत्र लिहून बघ. तुम्ही व्हिडिओ डिनर डेटचं आयोजन करू शकता. प्रेम टिकवून ठेवण्यासाठी बऱ्याच गोष्टी करता येतील. मात्र सरतेशेवटी भावना आणि एकमेकांबद्दल वाटणारं प्रेम महत्त्वाचं हे कायम लक्षात ठेव.

**मॅच मेकिंग**



## बी.टेकनंतर...

बारावीनंतर अनेक जण कॉम्प्युटर सायन्समध्ये बी.टेक करण्याचा निर्णय घेतात. कॉम्प्युटर सायन्समध्ये बी. टेक केल्यानंतर करिअरच्या अनेक संधी तुमच्यासाठी खुल्या होतात. या क्षेत्रात नोकऱ्यांची कमतरता नाही. कॉम्प्युटर सायन्समध्ये बी.टेक केल्यानंतर नेमकं काय करता येईल याविषयी...

सध्या विविध प्रकारच्या सॉफ्टवेअर्सना, ॲप्सना प्रचंड मागणी आहे. कोडिंगचं जग सतत विस्तारत आहे. त्यामुळे कॉम्प्युटर सायन्समध्ये बी. टेक केल्यानंतर सॉफ्टवेअर, प्रोग्रामिंग, ॲप्स डेव्हलपमेंट आणि मॅनेजमेंटच्या क्षेत्रात तुम्ही काम करू शकता. आज आयटी क्षेत्रात कॉम्प्युटर सायन्स क्षेत्रातल्या तज्ज्ञांना प्रचंड मागणी आहे. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना लाखो रुपयांची पॅकेज दिली जातात.

तुम्हाला वेब डेव्हलपर म्हणूनही काम करता येईल. विविध वेबसाईट्स तयार करून त्यांची देखरेख करण्याची जबाबदारी वेब डेव्हलपरवर असते. वेब डेव्हलपरला सुरुवातीला वार्षिक पाच ते सहा लाख रुपयांचे पॅकेज मिळते. अनुभव आणि संधींनुसार यात वाढ होत जाते. आपल्या देशात आज डाटा सायंटिस्ट्सना खूप मागणी आहे. बँकिंग, हेल्थकेअर, ई कॉमर्स आदी क्षेत्रांमध्ये डाटा सायंटिस्ट्सना प्रचंड मागणी आहे. यासोबतच कॉम्प्युटर नेटवर्क इंजिनिअरिंग, सायबर सिक्युरिटी तज्ज्ञ, कॉम्प्युटर सायन्स ब्लॉगर, ब्लॉकचेन डेव्हलपर, आर्टिफिशियल इंटेलिजन्स तज्ज्ञ, गेम डेव्हलपर, आयटी सल्लागार आदी क्षेत्रांमध्येही काम करू शकतात.

**वेगळ्या वाटा**



## ऑम्लेट विथ ट्विस्ट

दोस्तांनो, झटपट होणारा आणि पोटभरीचा पदार्थ म्हणजे ऑम्लेट. घाईगडबडीत पटकन ऑम्लेट बनवलं जातं. याच ऑम्लेटला तुम्ही ट्विस्ट देऊ शकता. ते अधिक चविष्ट बनवू शकता. यासाठी तुमचं पाककौशल्य वापरता येईल. चला तर मग ऑम्लेटच्या नव्या रेसिपी शिकू या.



ऑम्लेट विथ मशरूम हा प्रकार ट्राय करता येईल. ऑम्लेट बनवताना त्यात थोडे मशरूम घालता येतील. तसंच मशरू फ्राय बनवून ते ऑम्लेटवर पसरवून खाता येईल. ऑम्लेटमध्ये थोडा पालक घालता येईल. ऑम्लेट बनवताना त्यात चिरलेला पालक घाला. पालक ऑम्लेट छान लागेल. चेरी टॉमेटोचा वापर करून वेगळ्या पद्धतीचं ऑम्लेट बनवता येईल. चेरी टॉमेटो विथ चीझ ही रेसिपी बनवून ऑम्लेटवर पसरवता येईल. ऑम्लेटमध्ये सिमला मिरचीचे तुकडे घालता येतील. मेक्सिकोतले लोक ऑम्लेटमध्ये सिमला मिरची आणि कांद्याची पात घालतात. यामुळे तुम्हाला वेगळी चव मिळेल.

**झटपट रेसिपी**



## स्टाईल लेअरिंगची

दोस्तांनो, थंडीत लेअरिंगचे फंडे वापरले जातात. लेअरिंगमुळे ऊब तर मिळतेच शिवाय तुम्ही स्टायलिशही दिसता. लवकरच थंडी पडू लागेल. त्यामुळे गुलाबी थंडी पडण्याआधीच लेअरिंगचं तंत्र जाणून घ्यायला हवं.

* डेनिम जॅकेटला पर्याय नाही. तुम च्याकडे स्ट्राईप्सवाले किंवा प्रिंटेड टी शर्ट असतील तर त्यावर डेनिम जॅकेट घालता येईल. जीन्स आणि टी शर्टवर डेनिम जॅकेट कॅरी करा. डेनिम ऑन डेनिम हा लूकही भाव खाऊन जाईल.

* एखादं लाईटवेट जॅकेट सोबत ठेवा. ऋतूबदलाच्या काळात हे लाईटवेट जॅकेट तुमचं स्टाईल स्टेटमेंट ठरू शकतं. साध्या टी शर्टसोबत हे जॅकेट कॅरी करा. हटके रंगाचं जॅकेट निवडा.

* तुम्हाला फार प्रयोग करायचे नसतील तर लेदर जॅकेटचा पर्याय निवडा. काळ्या रंगाचं जॅकेट टी शर्ट आणि ब्लॅक जीन्स असा पेहराव थंडीत शोभून दिसेल.

* बॉम्बर जॅकेटही खूप सुंदर दिसतं. छानसं बॉम्बर जॅकेट खरेदी करा. टी शर्ट, ब्लॅक जीन्सवर हे जॅकेट घाला.

**फॅशन पॅशन**

## पिंपल्स येतायत?

पिंपल्स किंवा मुरुमं यांचा त्रास मुलांनाही असतो. किशोरवयीत मुलांना हार्मोन्समधील बदलांमुळे हा त्रास होऊ शकतो. मात्र त्यानंतर पिंपल्स येत असतील तर त्यामागे अनेक कारणं असू शकतात. पिंपल्स येण्याची कारणं आणि त्यावर करायचे उपाय याविषयी...

* मुलांना पिंपल्स येण्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे चुकीची स्कीनकेअर उत्पादनं. मुलं आपल्या त्वचेच्या प्रकारानुसार स्कीनकेअर उत्पादनांची निवड करत नाहीत. त्यामुळे त्वचेचा प्रकार जाणून घेऊन मगच अशा उत्पादनांची निवड करा. पिंपल्सचा खूपच त्रास होत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या. तसंच सल्फेट आणि पॅराबेन्सयुक्त उत्पादनांचा वापर टाळा.

* चुकीचा आहार हेही पिंपल्स येण्यामागचं महत्त्वाचं कारण आहे. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात पोषक आहार फारसा घेतला जात नाही. त्यातच बाहेरचे अन्नपदार्थ खाण्याचं प्रमाण बरंच वाढलं आहे. त्वचेचं आरोग्य राखण्यासाठी साखर, मैदा यांचं आहारातलं प्रमाण कमी करा. तेलकट पदार्थ कमी खा. शीतपेयांचा अतिरेक टाळा.

**ग्रुमिंग**



* शरीराच्या स्वच्छतेची काळजी घ्या. दररोज आंघोळ करणं अत्यंत आवश्यक आहे. आता थंडी सुरु होईल. मात्र थंडीतही आंघोळ टाळू नका. साबणाऐवजी शॉवर जेलचा वापर करा.

* आजचे तरुण जीममध्ये जातात. सीक्स पॅक अ‍ॅब्ज बनवण्यासाठी विविध सप्लीमेंट्स घेतात. मात्र या सप्लीमेंट्स सगळ्यांना चालतील असं नाही. सप्लीमेंट्स सुरू केल्यानंतर पिंपल्स येत असतील तर त्या बंद करून बघा.

* केसांसाठी वापरली जाणारी उत्पादने त्वचेसाठी मारक ठरू शकतात. त्यामुळे शक्यतो रसायनमुक्त उत्पादनांचा वापर करा. सौम्य शँपू आणि कंडिशनर वापरा. केसांशी संबंधित अन्य उत्पादनं वापर असाल तर ऑर्गेनिक आणि वेगन उत्पादनं वापरा.




# पूर्व विदर्भातील भारतीय जनता पक्षाच्या १७ जागांची प्रतिक्षा कायमच!

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :** विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने पहिली यादी रविवारी जाहीर केली. मात्र, पूर्व विदर्भातील ३२ पैकी १७ जागा अद्यापही ह्यहोल्डह्णवर आहेत. यात भाजपचे किती उमेदवार असतील, हे अद्यापही स्पष्ट झालेले नाही. विशेष म्हणजे विद्यमान आमदार असलेल्या आर्वी, मध्य नागपूर व गडचिरोलीतील उमेदवारांची पक्षाने घोषणा न केल्याने येथे भाकरी फिरवणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर हे जिल्हे मिळून विधानसभेच्या ३२ जागा आहेत. शिंदे सेनेकडून रामटेकसाठी आशिष जयस्वाल यांचे नाव यापूर्वीच घोषित झाले आहे. रविवारी जाहीर झालेल्या पहिल्या यादीत भाजपने १४ जागांवर उमेदवार जाहीर केले. यात बहुतांश विद्यमान आमदारच आहेत. मात्र, गडचिरोलीत देवराव होळी, मध्य नागपूरचे विकास कुंभारे व आर्वी येथील दादाराव केचे या आमदारांच्या जागांबाबत कुठलीही घोषणा झाली नाही. त्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

या जागांबाबत केंद्रीय पातळीवरून झालेल्या सर्वेक्षणाच्या आधारे दुसऱ्या यादीत निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे भाजपला दुसरी यादी जाहीर करण्यासाठी फारसा वेळ उरलेला नाही.

मध्य नागपूरवरून भाजपात पेच निर्माण झाला आहे विद्यमान आमदार विकास कुंभारे यांच्या विरूद्ध नाराजी आहे. त्यांना तिकीट दिल्यास येथे भाजपा पुरस्कृत बंडखोरी होवू शकते. विधान परिषद सदस्य प्रवीण दटके प्रबळ दावेदार आहे. २००९ पासून कुंभारे निवडून येत आहे. यावेळेस दटके दटून बसले आहेत. अब की बार दटके रहेंगे यार', असा त्यांचा नारा आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पोटातले पाणीही हलु देत नाही. ते बिन टाक्याची शस्त्रक्रिया करतील असे बोलले जाते.

पश्चिम नागपूरात भाजपाचे सुधाकर देशमुख २००९ आणि २०१४ ला निवडून आले. तीन दशकांनंतर काँग्रेसचे विकास ठाकरे यांनी हा मतदारसंघ हिसकावून आणला. येथे माजी महापौर दयाशंकर तिवारी, नरेश बरडे, प्रगती पाटील, नंदा जिचकार, वैशाली चोपडे असे अनेक दावेदार आहे. या वेळेस येथे महिलेला उमेदवारी दिली जाईल अशी माहिती सूत्रांनी दिली.

उत्तर नागपुरात २०१४ चा अपवाद वगळता काँग्रेसचे नितीन राऊत यांचे एकछत्री राज्य आहे. येथे माजी आमदार डॉ. मिलिंद माने, संदीप गवई, धर्मपाल मेश्राम असे अनेक इच्छुक आहे. येथून महिलेला उमेदवारी द्यावी असा मतप्रवाह आहे. कार्यकर्त्यांनी मतदारसंघातील स्थानिक उमेदवारच द्यावा, अशी भूमिका घेतल्याने काही जागांबाबत पेच निर्माण झाल्याचे दिसून येते.

# हे तर शोले चित्रपटातील जेलर...





■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २१ :** महाविकास आघाडीमध्ये उद्धव ठाकरेंची स्थिती वाईट झाली असून त्यांचे हाल पाहावत नाही. त्यांची स्थिती शोले चित्रपटातील जेलरसारखी झाली आहे.. त्यांच्या मागे कोणी शिल्लक राहिलेले नाही. कोई लौटा दे मेरे बिते हुये दिन अशी त्यांची अवस्था झाली असल्याची टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

बावनकुळे नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. उद्धव ठाकरे यांना कोणी मुख्यमंत्री करण्यासाठी तयार नाही, महाविकास आघाडी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री होऊ देणार नाही. हे अडीच वर्षे मुख्यमंत्री झाले पण २०१९ मध्ये केलेली चूक त्यांना भावली आहे त्यामुळे आघाडीतील नेते आता धोका पत्करणार नाही.

जागा वाटपावरुन उद्धव ठाकरे यांना विश्वासात घेतले जात नसल्यामुळे त्यांची स्थिती फारच वाईट झाली आणि ते पाहावत नाही. महाविकास आघाडीमध्ये त्यांना कोणी मुख्यमंत्री करण्यासाठी तयार नाही, सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्यासह काँग्रेसच्या नेत्यासमोर मुख्यमंत्री पदासाठी नाव जाहीर करण्याबाबत लोटांगण घालत आहे. मात्र आघाडीतील नेते उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री होऊ देणार नाही.

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना ही हिंदू विचाराची होती. काँग्रेस, राष्ट्रवादीचे विचार त्यांना कधी न पटणारे आहे. उद्धव ठाकरे आम्हाला सोडून शरद पवार आणि नाना पटोले सोबत गेले, आता महाविकास आघाडीवर दबाव तयार करुन आपले वजन वाढविण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र त्यांना आघाडीतील नेते सहभागी करुन घेत नाही असेही ते म्हणाले.

महायुतीमध्ये बहुतांश जागागबाबत निर्णय झाला असून येत्या दोन दिवसात पहिली यादी जाहीर करणार आहे. आमच्यात कुठलेच वाद नसल्यामुळे आम्ही तातडीची बैठक बोलवण्याच्या मागे पडत नाही. अशा तातडीच्या बैठका उद्धव ठाकरे घेऊ शकतात, अशी टीका बावनकुळे यांनी केली. मतदार यादीतील नावे वगळण्यावरून झालेल्या टीकेला भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिउत्तर दिले.विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभव दिसू लागला आहे त्यामुळे एरवी ईव्हीएमवर बोलणारे महाविकास आघाडीचे नेते मतदार यादीवर बोलू लागले आहे, अशी टीका बावनकुळे यांनी केली.

लोकशाही मजबूत करण्यासाठी आम्ही अधिकाधिक मतदान करण्याबाबत आम्ही जनतेला आवाहन करीत असताना आमच्यावर मतदार यादीतून नावे गायब केल्याचा आरोप केला जात आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा मतदानाचा हक्क काढून घेण्यासाठी काँग्रेसचे नेते न्यायालयात गेले होते. आता उद्धव ठाकरे काँग्रेससोबत राहून ते स्वतःचा नाही काँग्रेसचा अजेंडा राबवत असल्याची टीका बावनकुळे यांनी केली. आमच्यात कुठलेच वाद नसल्यामुळे आम्ही तातडीची बैठक बोलवण्याच्या मागे पडत नाही. अशा तातडीच्या बैठका उद्धव ठाकरे घेऊ शकतात, अशी टीका बावनकुळे यांनी केली.

# सावरकरांना डच्चू?

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :** आमदार टेकचंद सावरकर यांना महिनाभरापूर्वी लाडकी बहीण योजनेबद्दल केलेले वक्तव्य भोवले आहे. लाडकी बहीण योजना मतांसाठी केलेला जुगाड असल्याचे टेकचंद सावरकर म्हणाले होते. त्यांचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. सावरकरांनी केलेल्या वक्तव्यामुळे सरकारविरोधात महाविकास आघाडीच्या हाती आयते कोलीत सापडले. त्यांच्या या वक्तव्यामुळे भाजपने त्यांना यादीतून डावलले, अशी चर्चा आहे.

टेकचंद सावरकर हे कामठी विधानसभा मतदारसंघातून आमदार आहेत. मात्र, यंदा भाजपच्या पहिल्या यादीत कामठी मतदारसंघातून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना संधी देण्यात आली आहे. गेल्या निवडणुकीत भाजपने सलग तीन टर्म आमदार असलेल्या बावनकुळेंचे तिकीट कापून टेकचंद सावरकरांना संधी दिली होती. आता भाजपने त्यांचे तिकीट कापून बावनकुळेंना संधी दिली आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेला जुगाड म्हणणे सावरकर यांना भोवल्याची चर्चा सुरू आहे.

आम्ही इतकी मोठी भानगड कशासाठी केली? हे तुम्ही इमानदारीने सांगा. ज्या दिवशी तुमच्या घरासमोर मतदानाची पेटी येईल, त्यावेळी माझ्या लाडक्या बहिणी भाजपला मतदान करतील, यासाठी आम्ही हा जुगाड केलाय. मी खरे बोलतो. माझे बोलणे खरे आहे की नाही? नाहीतर बोलायचे एक आणि करायचे एक, असे करायला मी रामदेव बाबांचा कार्यकर्ता आहे का? असे सावरकर यांनी म्हटले होते.

# देवेंद्र फडणवीस सहाव्यांदा रिंगणात



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २१ :** भारतीय जनता पक्षाने रविवारी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. नागपूर शहरातील सहापैकी तीन जागांवर पक्षाने विद्यमान आमदारांना पुन्हा संधी दिली. त्यात मोठे नाव आहे ते विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे.

नागपूरमध्ये लोकसभा निवडणुकीत नितीन गडकरी निवडून गेले. हा त्यांचा सलग तिसरा विजय होता. मात्र देवेंद्र फडणवीस हे सलग सहाव्यांदा निवडणूक रिंगणात उतरणार आहेत. ते दोन वेळा पश्चिम नागपर या मतदारसंघातून तर तीन वेळा दक्षिण पश्चिम नागपूर या मतदारसंघातून विजयी झाले आहेत. सलग २५ वर्ष विधानसभेत प्रतिनिधीत्व करीत आहेत. आमदार नंतर थेट मुख्यमंत्री, त्यानंतर विरोधी पक्ष नेते आणि आता उपमुख्यमंत्री अशी त्यांची विधिमंडळातील कारकीर्द आहे.

भाजपचे दुसरे विद्यमान आमदार कृष्णा खोपडे हे सलग चौथ्यांदा पूर्व नागपूर या मतदारसंघातून निवडणूक लढणार आहे. काँग्रेसकडून हा मतदारसंघ हिसकावून घेत खोपडे यांनी त्यावर आपली भक्कम पकड कायम करीत सलग तीन वेळा ते येथून मोठ्या मताधिक्याने विजयी होत आले आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचीही ही चौथी विधानसभेची निवडणूक आहे. २००४ ते २०१४ अशा तीन निवडणुका त्यांनी कामठी मतदारसंघातून जिंकल्या.

२०१९ मध्ये मात्र त्यांना पक्षाने उमेदवारी दिली नाही. नंतर ते विधान परिषदेवर गेले. पाच वर्षानंतर पक्षाने त्यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केला आहे. हिंगण्यातून उमेदवारी मिळालेले समीर मेघे यांची ही तिसरी निवडणूक आहे. यापूर्वी दोन निवडणुका त्यांनी या मतदारसंघातून चढत्या मताधिक्याने जिंकल्या आहेत. दक्षिण नागपूरचे विद्यमान आमदार मोहन मते यांचीही ही तिसरी निवडणूक आहे. एकदा ते आमदार होते. नंतर त्यांचा पराभव झाला होता. २०१९ मध्ये ते पुन्हा निवडून आले.

नागपूरमधील भाजपचे आणखी एक विद्यमान आमदार विकास कुंभारे यांच्या उमेदवारीचा निर्णय प्रलंबित आहे. ते तीन वेळा मध्य नागपूरमधून विजयी झाले आहेत.पक्षाने त्यांच्या नावाचा पुन्हा एकदा विचार केल्यास त्यांची ही चौथी निवडणूक ठरेल. त्यांच्या जागेवर तिकीट मागणारे आ. प्रवीण दटके यांची ही पहिली सार्वत्रिक निवडणूक ठरेल. ते सध्या विधानपरिषदेचे सदस्य आहेत. भाजपने नागपूरमध्ये दिलेल्या पाच उमेदवारांमध्ये सर्व दीर्घ अनुभवी आहेत. एकही नवा चेहरा नाही.

# योगेंद्र यादव यांच्या सभेत वंचितच्या कार्यकर्त्यांचा राडा

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १९ :** स्वराज इंडिया पक्षाचे संस्थापक तथा भारत जोडो अभियानचे राष्ट्रीय संयोजक योगेंद्र यादव यांच्या अकोल्यातील सभेमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी दुपारी गोंधळ घातला. कार्यक्रमात धक्काबुक्की, घोषणाबाजी करून खुर्च्यांची तोडफोड करण्यात आली. या राड्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

भारत जोडो अभियानांतर्गत योगेंद्र यादव यांच्या विचारसभेचे आयोजन सोमवारी दुपारी शहरातील जिल्हा परिषद कर्मचारी भवनाच्या सभागृहात करण्यात आले होते. या विचारसभेमध्ये योगेंद्र यादव यांचे भाषण सुरू असतांना सभागृहात उपस्थित वंचितच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काही प्रश्न उपस्थित केले.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या बाजूने मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानंतर मोठ्या प्रमाणात मते काँग्रेसकडे वळ्ली. काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाने आरक्षण विरोधी भूमिका घेतली आहे. आरक्षण संपवण्याची भाषा काँग्रेस करीत असतांना त्यांना मतदान कसे करावे? असा प्रश्न योगेंद्र यादव यांना वंचितच्या पदाधिकाऱ्यांकडून विचारण्यात आला.

# वंचित बहुजन आघाडीची पाचवी यादी जाहीर : १६ उमेदवारांची घोषणा



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :** महाराष्ट्राच्या आगामी विधानसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीकडून सोमवारी उमेदवारांची पाचवी यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये १६ उमेदवारांचा समावेश करण्यात आला आहे. वंचित बहुजन आघाडीने मागील याद्याप्रमाणे पाचव्या यादीमध्ये देखील विविध समाज घटकांतील उमेदवार दिले आहेत. यापूर्वी चौथ्या यादीत १६ उमेदवारांची घोषणा केली होती.

वंचित बहुजन आघाडीने काही दिवसांपूर्वी ११ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. त्या यादीत वंचितने रावेर मतदारसंघातून शमिभा पाटील या तृतीयपंथीला उमेदवारी दिली.

आता १६ उमेदवारांच्या यादीत जगन देवराम सोनवणे - भुसावळ, डॉ. ऋतुजा चव्हाण - मेहकर, सुगत वाघमारे - मूर्तीजापूर, प्रशांत सुधीर गोळे - रिसोड, लोभसिंग राठोड - ओवळा माजिवडा, विक्रांत चिकणे - ऐरोली, परमेश्वर रणशुर - जोगेश्वरी पूर्व, राजेंद्र ससाणे - दिंडोशी, अजय रोकडे - मालाड, ॲड. संजीवकुमार कलकोरी - अंधेरी पूर्व, सागर गवई - घाटकोपर पश्चिम, सुनीता गायकवाड - घाटकोपर पूर्व, आनंद जाधव - चेंबूर, मंगलदास निकाळजे - बारामती, अण्णासाहेब शेलार - श्रीगोंदा, डॉ. शिवाजीराव देवनाळे - उदगीर यांचा समावेश आहे.

# आबा कटके दादांच्या राष्ट्रवादीत

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २१ :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेचे पुणे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर (माऊली) आबा कटके यांनी सोमवारी अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

बारामतीत राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत त्यांनी आपल्या प्रमुख कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत प्रवेश केला. शिरूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक समन्वयक, बांधकाम विभाग-पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य आणि पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

# विदर्भातील १४ जागांवर ठाकरे गटाचा दावा



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २१ :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपने ९९ जणांची यादी जाहीर केली आहे. त्यातच आता महाविकास आघाडीची देखील यादी लवकरच जाहीर केली जाणार आहे, मात्र महाविकास आघाडीमध्ये अंतर्गत वाद तसेच जागावाटपावरून वाद सुरू असल्याचे समोर आले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी यावर भाष्य केले आहे.

भास्कर जाधव यांनी विदर्भातील १४ जागांवर हक्क असल्याचे म्हणले आहे. मात्र त्या जागा देण्यास काँग्रेस तयार नसल्याने महाविकास आघाडीमध्ये या जागांवरून तिढा सुटत नसल्याचे दिसत आहे. भास्कर जाधव म्हणाले, महाविकास आघाडी तुटावी अशी आमची इच्छा नाही, पण तुटेपर्यंत आणू नका, असा थेट इशाराच जाधव यांनी दिला आहे.

दरम्यान, महाविकास आघाडीच्या सातत्याने बैठका सुरू असून, जागा वाटपाचा तिढा सुटण्याची शक्यता वर्तवली जात असून उमेदवारांची यादी देखील जाहीर केली जाण्याची शक्यता आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीमध्ये २६० जागांवर एकमत झाले आहे, मात्र २८ जागांचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. लोकसभा निवडणुकीत चांगल्या कामगिरीमुळे काँग्रेसला १०० पेक्षा जास्त जागा देण्याची चर्चा सुरू असल्याचे समजते. मात्र १२ जागांवर काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटात वाद सुरू आहे.

# मध्य नागपूरमधून हलबा की मुस्लीम?

## काँग्रेससमोर धर्मसंकट

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २१ :** मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघात कोणत्या समाजाला उमेदवारी द्यावी, असा गंभीर प्रश्न काँग्रेससमोर उभा ठाकला आहे. येथे हलबा आणि मुस्लीम या दोन्ही समाजाकडून आग्रही मागणी केली जात असून, दोघांमधून कुणालाही डावलणे काँग्रेससाठी डोकेदुखी ठरणार आहे.

लोकसभा तसेच विधान परिषदेवर काँग्रेसने मुस्लीम समाजाला प्रतिनिधित्व दिले नाही. मुस्लीम समाज सर्व निवडणुकीत कायमच काँग्रेसच्या बाजूने कौल देत आला आहे. त्यामुळे या समाजाला काँग्रेस पक्ष गृहीत धरत असल्याची भावना मुस्लीम समाजाच्या नेत्यांची आहे.

हलबाबहुल मध्य नागपूरमध्ये हलबा समाजाचा उमेदवार देत नसल्याने काँग्रेसला येथे पराभूत व्हावे लागत आहे. हलबा समाजाची एकगठ्ठा मते समाजाच्या उमेदवाराच्या बाजूने पडतात, असे या समाजातील काही नेते पक्षातील वरिष्ठ नेत्यांना सांगून यावेळी उमेदवारी हलबा व्यक्तीला द्यावी असा आग्रह धरत आहे.

मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघाचा आजवरचा इतिहास बघता येथे बहुतांशवेळा हलबा व मुस्लीम उमेदवाराची सरशी झाली आहे. काँग्रेसकडून अनेकदा मुस्लीम समाजाच्या व्यक्तीने प्रतिनिधित्व केले आहे तर भाजपकडून सलग तीनवेळा हलबा समाजाच्या व्यक्तीने प्रतिनिधित्व केले आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत येथे भाजपने बाजी मारली होती. परंतु, चार हजार मतांनी काँग्रेस उमेदवाराला पराभव पत्करावा लागला होता. एमआयएमच्या उमेदवाराने साडेआठ हजारांहून अधिक मते घेतली होती. आता या मतदारसंघात काँग्रेसकडून ३३ इच्छुकांनी अर्ज केले आहे. पक्षाचे निरीक्षक नसीम खान यांनी त्यांची मुलाखत देखील घेतली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसला हलबा आणि मुस्लीम समाज यापैकी एकाची नाराजी दूर करावी लागणार आहे.

दुसरीकडे, हलबा आणि मुस्लीम समाजाव्यतिरिक्त अन्य समाजही आग्रही आहे. गेल्या वेळी अवघ्या काही मतांनी पराभूत बंटी शेळके यांनी पुन्हा दंड थोपटले असून, मध्य नागपूरची उमेदवारी काँग्रेससमोर धर्मसंकट निर्माण करणारी ठरली आहे.

# विदर्भातील २५ लाख माळी समाज कुणाचे गणित बिघडवणार?

## अ. भा. माळी महासंघाचा युती, आघाडीला इशारा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :** महाराष्ट्रात माळी समाजाची लोकसंख्या सुमारे दीड कोटी आहे. इतर प्रांतात ती ८ ते १० कोटी आहे. पूर्ण भारतात एकूण माळी समाजाची संख्या १० ते १५ कोटी असावी.

आज महाराष्ट्रात माळी समाजाची संख्या तीन नंबरवर आहे. एकेकाळी समाजाचे १९-२० आमदार निवडून यायचे आता ५ ते ७ च्या वर आमदार नसतात. हे लक्षात घेता माळी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी अ. भा. माळी महासंघाचे विश्वस्त गोविंद वैराळे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. राज्यात किमान २० ते २५ आणि विदर्भात ४ ते ५ जागी माळी समाजाला प्रतिनिधित्व द्यावे, असेही त्यांचे म्हणणे आहे.

माळी समाजाला डावलण्यात आले तर गंभीर परिणाम राजकीय पक्षाला भोगावे लागतील असा इशारा गोविंद वैराळे यांच्यासह मधुसुदन देशमुख, माळी महासंघाचे विभागीय अध्यक्ष मुकुंद पोटदुखे जिरे माळी समाजाचे अध्यक्ष राजेंद्र वाठ आदींनी दिला आहे. माळी समाजाचे उमेदवार आणि कार्यकर्ते भाजपत जास्त आहेत. गेल्या दोन दशकांपासून माळी समाजाचे मत भाजपला जात असल्याने त्यांच्याकडून जास्त अपेक्षा आहेत, असेही वैराळे यांचे म्हणणे आहे.

माळी समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, कोकण विभाग आणि मुंबई उपनगरचे ६ जिल्हे ज्यांची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेप्रमाणे २.५ कोटी आहे. यात माळी समाज नगण्य आहे. उर्वरित महाराष्ट्राची लोकसंख्या ८.५ कोटी आहे. यात पश्चिम महाराष्ट्रातील ५, उत्तर महाराष्ट्रातले ५, मराठवाड्यातील ८ आणि विदभार्तील ११ जिल्हे यात दीड कोटी माळी समाज विभागला आहे. यातही नंदुरबार, नांदेड, हिंगोली, गडचिरोली, कोल्हापूर, सांगली, वर्धा, यवतमाळ व लातूर या ९ जिल्ह्यांमध्ये माळी समाज एकूण लोकसंख्येच्या ५ टक्क्यांपेक्षा जास्त नाही.

नागपूर, भंडारा, गोंदिया, वाशिम, सातारा, बीड, जालना, संभाजीनगर, परभणी, धाराशिव व धुळे या ११ जिल्ह्यांमध्ये एकूण लोकसंख्येच्या ८ ते १२ टक्केपर्यंत कमीअधिक प्रमाणात आढळून येतो.

२००९मध्ये मतदारसंघाचे ठरवून विभाजन केले अमरावती, अकोला, बुलडाणा, चंद्रपूर, जळगाव, अहिल्यानगर, नाशिक, सोलापूर, पुणे या ९ जिल्ह्यांमध्ये एकूण लोकसंख्येच्या १५ ते २० टक्के प्रमाणात माळी समाज आहे. १२ टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या निवडणूक जिंकण्यासाठी सोयीची आहे.

परंतु २००९ ला मतदारसंघ पुनर्रचनेत माळी समाजाच्या मतदानाचे विभाजन होईल अशा प्रकारचे मतदारसंघ तयार करण्यात आल्याचे दिसते. या विभाजनामुळेच बहुसंख्य मतदारसंघात माळी समाजाची मतदारसंख्या १५ हजारापेक्षा कमी आढळून येते, असे पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या निवडणुकीत समाजाची मते निर्णायक ठरू शकतात.

# केके म्हणून परिचीत किशोर कन्हेरेंचा काँग्रेस पक्षात प्रवेश



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २१ :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर विदर्भातील माळी समाजाचे नेते किशोर कन्हेरे यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष नाना पाटोले, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विदर्भ काँग्रेसचे नेते आमदार सुनील केदार , मुंबई अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत किशोर कन्हेरे यांनी प्रवेश केला आहे.

किशोर कन्हेरे म्हणाले, महाराष्ट्राच्या राजकारणात माळी समाजाचे मोठे योगदान राहिले आहे. माळी समाजाचे विदर्भात जवळपास पंचवीस लाख मतदार आहेत. माळी समाजाला सत्ताकारणात सर्वच राजकीय पक्षांनी दुर्लक्षित ठेवले. एक छगन भुजबळ वगळता एकही नेता माळी समाजातून राजकारणात स्वीकारला गेला नाही.

छगन भुजबळ यांचे राजकारणही माळी समाजाऐवजी स्वकेंद्रित आणि स्वकुटुंब केंद्रित राहिले. छगन भुजबळ यांची विदर्भातील बाहुबली म्हणून ओळखले जाणारे किशोर कन्हेरे यांनी आपल्या समाजावरील अन्याय दूर करण्यासाठी आज अखेर काँग्रेस पक्षात प्रवेश केला असल्याचे त्यांनी सांगितले.

किशोर कन्हेरे यांनी जवळपास बारा वर्ष शिवसेनेत उद्धव ठाकरे यांचे प्रवक्ते म्हणूनही कार्य केले. शिवसेनेत विदर्भात फार लक्ष दिले जात नसल्याने आणि माळी समाजाचा उत्कर्ष करण्यासाठी राष्ट्रीय पक्ष सोबत असण्याची आवश्यकता लक्षात घेऊन किशोर कन्हेरे यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. माळी समाजासाठी राष्ट्रीय स्तरावर कार्य करण्याची मनोकामना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले आणि आपल्या समाजाला निश्चित न्याय देण्यात येईल याबाबत आश्वस्थ केले.

महाराष्ट्रातील नेत्यांनी किशोर कन्हेरे यांच्या काँग्रेस प्रवेशामुळे काँग्रेसला विदर्भात निश्चित खूप फायदा होईल आणि माळी समाजाला किशोर कन्हेरे यांच्या नेतृत्वात निश्चितपणे न्याय देण्यात येईल याबाबत खात्री व्यक्त करून किशोर कन्हेरे यांच्या काँग्रेस प्रवेशाबाबत आनंद व्यक्त केला. दरम्यान, माजी आमदार कपिल पाटील यांनी देखील यावेळी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

महासागर
नागपूर
वृत्तसागर
■ मंगळवार, दि. २२, ऑक्टोबर २०२४ ■

# मोबाईल, नशा, सोशल मीडियाचा वापर टाळा : डॉ. रविंद्र कुमार सिंगल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

पोलिस हे नागरिकांचे, विद्यार्थ्यांचे मित्र आहेत अशी भावना विद्यार्थ्यांच्या मनात रुजवित नागपूरचे पोलिस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईल, नशा आणि सोशल मीडियाचा वापर टाळावा असे आवाहन केले.

नागपूर महानगरपालिकाद्वारा संचालित हाजी अब्दुल मजीद लीडर उर्दू माध्यमिक शाळा, भानखेडा येथे स्टूडंट पोलिस कॅडेट अंतर्गत विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यासाठी पोलिस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांनी आपल्या सहकारी अधिका-यांसोबत शाळेला भेट दिली.



यावेळी नोडल अधिकारी सतीश फरकाटे, तहसील पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संदीप बुवा, श्री. संजय पांडे, वाहतुक विभागाचे श्री. राऊत, स्टूडंट पोलिस कॅडेट चमूचे श्री. शांताराम ठोंबरे, श्री. राजकुमार कोडापे, शाळा निरिक्षिका श्रीमती सिमा खोब्रागडे, मुख्याध्यापक श्री. सुधिर कोरमकर यांच्यासह विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी पोलिस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सायबर क्राईम घडण्याची कारणे व त्याबाबतची सतर्कता, वाहतूक नियमाबाबत सतर्कता, मोबाईल वापर व त्यापासून घडणारे अपराध, गुड टच बॅड टच, नशाखोरीचे दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन केले.

तसेच डॉ. सिंगल यांनी विद्यार्थ्यांना पोलिस यांना न घाबरता त्यांना मित्र समजून त्याचेशी बोलावे आणि आपल्या पालकांना याबाबत माहिती द्यावी असे आवाहन केले. याशिवाय डॉ. सिंगल यांनी विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात प्रगती करावी करिअर करावे यास्तव विविध दाखले देत हसत खेळत विद्यार्थ्यांशी हितगुज साधले.

विद्यार्थ्यांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांसोबत सेल्फी, हस्तांदोलन, हितगुज साधत त्यांनी पोलिस हे आपले मित्र असतात ही भावना रुजविली व त्यांनी आपल्या वर्तनाने विद्यार्थ्यांची मने जिंकली. यावेळी एस पी सी चमूचे श्री. आगरकर यांनी सोशल मिडियाचा वापर आणि त्यात नागरिकांची होणारी फसवणूक याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचलन श्रीमती नौशिन सुहेल यांनी केले.

# शहीद पोलिसांना वाहिली श्रद्धांजली

**नागपूर :** 21 ऑक्टोबर 1959 रोजी लेहमधील 18,000 फूट उंच टेकडीवर देशाचे रक्षण करताना केंद्रीय राखीव पोलिस दलच्या 10 जवानांनी बलिदान दिले. त्यांच्या हौतात्म्याच्या स्मरणार्थ दरवर्षी 21 ऑक्टोबर रोजी शहीद पोलिस स्मृतीदिन साजरा केला जातो. सोमवारी शहर, ग्रामीण, रेल्वे आणि एसआरपीएफ यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद जवानांना आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी हुतात्मा स्मारकास पुष्पहार अर्पण करताना शहीद जवानांच्या शौयार्चे स्मरण करीत पोलिस शहीद दिनाचे महत्त्व विशद केले. प्रमुख पाहुणे, नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दिलीप भुजबळ, शहराचे सह पोलिस आयुक्त निसार तांबोळी यांनीही पुष्पचक्र अर्पण करून हुतात्म्यांना अभिवादन केले. एसीपी विनायक कोते आणि विशाल क्षीरसागर यांनी या वर्षी देशसेवा करताना प्राणांची आहुती देणाऱ्या 216 पोलिसांची नावे सांगितली.

आरपीआय विनोद तिवारी यांच्या नेतृत्वाखाली एसआरपीएफ, शहर पोलिस, ग्रामीण पोलिस आणि लोहमार्ग पोलिसांनी संयुक्तपणे हुतात्मादिन परेड काढली. कार्यक्रमात डीआयजी संजय पाटील, शिवाजी राठोड, नागपूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, जीआरपीचे पोलिस अधीक्षक अक्षय शिंदे, एसआरपीएफ ग्रूप 4 च्या कमांडंट प्रियंका नारनवरे, कारागृह पोलिस अधीक्षक वैभव आगे, पोलिस उपायुक्त लोहित मतानी, निकेतन कदम, अर्चित चांडक, रश्मिता राव, मेहक स्वामी, राहुल माकणीकर, राहुल मदने, शशिकांत सातव, अश्विनी पाटील, श्वेता खेडकर आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन एसीपी नरेंद्र हिवरे यांनी केले.

21 ऑक्टोबर रोजी सीआरपीएफचे उपनिरीक्षक करणसिंग यांच्या नेतृत्वाखाली धरमसिंग, पूरणसिंग, नारबू लांबा, बेग्राजमल, माखनलाल, इमानसिंग, तेश्रिंग बोखू नारबू, हंगजीत सुब्बा आणि शिवनाथ प्रताप हे हॉटस्प्रिंगच्या या टेकडीवर गस्त घालत होते. दरम्यान त्यांना चिनी सैन्याच्या हालचाली दिसल्या. सीआरपीएफच्या जवानांना पाहताच चिनी सैन्याने गोळीबार सुरू केला. त्यांची संख्याही खूप जास्त होती. सर्वांनी त्यांचा कसून सामना केला. शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहिले पण मागे हटले नाही. दुसरी तुकडी आल्यावर चिनी सैन्य शहीद जवानांचे मृतदेह घेऊन पळून गेले. भारतासह संपूर्ण जगाने या घटनेचा निषेध केला. 13 नोव्हेंबर रोजी चिनी सैन्याने सैनिकांचे मृतदेह छिन्न-विछिन्न अवस्थेत परत केले आणि 14 नोव्हेंबर रोजी हॉट स्प्रिंगमध्येच सर्वांवर पूर्ण आदराने अंत्यसंस्कार करण्यात आले. शहीदांना श्रद्धांजली वाहण्यासाठी, देशभरातील पोलिसांनी स्वेच्छेने पैसे गोळा केले आणि हॉटस्प्रिंग येथे शहीद स्मारक बांधले. स्मारकाच्या व्यासपीठावर 'तुम्ही घरी गेल्यावर त्यांना सांगा की आम्ही आमचा आजचा दिवस तुमच्या उद्यासाठी समर्पित केला आहे' असा संदेश लिहिला.

## लुट, मारहाणीत फरार आरोपीस अटक

**नागपूर :** लुट आणि मारहाण प्रकरणात गत महिनाभरापासून फरार आरोपीस गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा शाखेने अटक केली. शेख सोहेल उर्फ भांजा शेख मुख्तार (20) रा. यासीन प्लॉट, मोठा ताजबाग असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. गत 20 सप्टेंबरच्या रात्री शेख शहबाज शेख बब्बू (30) रा. ठाकूर प्लॉट हा हसनबाग कब्रस्तान गेटजवळील जावेद पान सेंटरमध्ये वाहनाने आला. वाहनातून उतरताना सोहेलला त्याचा धक्का लागला.. सोहेल आणि त्याच्या साथीदार अरमान अली उर्फ पप्पूने शहबाजला जबर मारहाण केली.

# ३ सट्टेबाज गुन्हे शाखेच्या जाळ्यात

**नागपूर :** गुन्हे शाखा युनिट 4 च्या पथकाने रविवारी रात्री सापळा रचून तीन सट्टेबाजांना अटक केली. तिघेही शहरातील चर्चित क्रिकेट बुकी असून महिला टी-20 च्या शेवटच्या सामन्यावर खायवडी करीत होते. त्यांचा साथीदार एक साथीदार फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. सुनील सुखरामदास आमेसर (40), सिद्धार्थ सुरेंद्र जैन (35) आणि परेश नंदलाल सदरानी (40) अशी आरोपींची नावे आहेत.

सुनील आणि सिद्धार्थ दक्षिण आफ्रिका आणि न्यूझिलँड दरम्यान सुरू असलेल्या शेवटच्या सामन्यावर खायवाडी करीत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी त्यांच्यावर पाळत ठेवली. शास्त्रीनगर परिसरात पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेतले. त्यांचे मोबाईल तपासले असता ऑनलाईन आयडीवर खायवाडी करीत असल्याचे स्पष्ट झाले. दोघेही लोटस आणि लाईव्ह बूकच्या आयडीवरून खायवाडी करीत होते.

चौकशीत नेताजीनगरच्या परेश सदरानी आणि क्वेटा कॉलनीच्या विशाल तन्ना यांनी आयडी उपलब्ध केली असून त्यांच्याच बुकवर दोघेही खायवाडी करीत होते, अशी माहिती मिळाली. पोलिसांनी लगेच परेश यालाही ताब्यात घेतले. तिन्ही आरोपींकडून मोबाईलसह 2.49 लाख रुपयांचा माल जप्त करण्यात आला. पुढील कार्यवाहीसाठी आरोपींना मालासह नंदनवन पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले. पोलिस फरार विशाल तन्नाचा शोध घेत आहेत. सुनील आणि परेश यापूर्वीही क्रिकेट सट्ट्याच्या खायवाडी सापडले होते. त्यांच्यावर आधीही जुगार बंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला आहे.

# चित्रपट महोत्सवाचे १२ जानेवारीला आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

नागपूर चालचित्र फाउंडेशनतर्फे आयोजित नागपूर चित्रपट महोत्सवामुळे नागपूर आणि विदभार्तील तरुण चित्रपट निर्मात्यांना व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. 12 जानेवारी 2025 रोजी नागपुरात या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नागपूर चित्रपट महोत्सव प्रादेशिक कलागुणांना वाव देण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देतो. भारतीय मूल्यांशी बांधिलकी असलेल्या चित्रपट निर्मात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी, जागतिक स्तरावर चित्रपटांमध्ये भारतीयत्व वाढवण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करणे, स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चित्रपट महोत्सव आयोजित करणे, ऑडिओ-व्हिडिओ निर्मितीसाठी योग्य तरुण मन विकसित करणे. भारतीय तरुणांना चित्रपट निर्मितीच्या विविध कला, हस्तकला आणि तंत्रांचे प्रशिक्षण देणे, दर्जेदार चित्रपटांबद्दल सर्वसामान्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे.

त्यामध्ये चित्रपटाचे विषयः महिला सक्षमीकरण, रोजगार निर्मिती, सामाजिक समरसता, पर्यावरण, भविष्यातील भारत, आदिवासी समाज, ग्रामीण विकास, वसुधैव कुटुंबकम्, लोकसंस्कृती, हवामान बदल, साहसी कथा, नैतिक कथा, नागरी जबाबदारी, भारतीय कुटुंब व्यवस्था, स्थानिकांसाठी आवाज, विकसित भारत, भारतीय ज्ञान परंपरा आणि इतर कोणतेही सकारात्मक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, सामाजिक विषय चित्रपट श्रेणी :१. विशेष श्रेणीः रील्स/व्हर्टिकल फिल्म 6, प्रोफेशनल शॉर्ट फिल्म 2. कॅम्पस शॉर्ट फिल्म 3. डॉक्युमेंटरी 4. ॲनिमेशन फिल्म 5. चिल्ड्रन्स फिल्म संस्थात्मक समर्थन : 1 न्यू इंग्लिश इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी 2. झी इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह आर्ट्स3. नटराज कला आणि सांस्कृतिक केंद्र4. व्हीएमव्ही कॉलेज 5. स्प्रिंग मीडिया 6. नागपूर स्कूल ऑफ आर्ट्स ,7. फ्रेम बॉक्स 2.0 नागपूर नागपूर फिल्म फेस्टिव्हलला राजकीय मीडिया वेव्हज आणि आरसी प्लास्टो यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

लघुपटांसाठी अंतिम प्रवेश तारीख 15 डिसेंबर 2024 आहे. यामध्ये सामील व्हावे असे आवाहन आयोजन समिति अजय राजकारणे, सई देशपांडे, डॉ. संयुक्ता थौराट, रवींद्र हरिदास, प्रतीक लोनकर, रमेश लखमापुरे, महेंद्र पेंढारकर, डॉ. अभय मुद्गल, डॉ. पराग घोंगे, नितिन बंसोड, अंशुल खंडेलवाल, नरेंद्र सतीजा, प्रथमेश देशपांडे, विष्णु मनोहर, अनुराग कुलकर्णी, सौरभ चौधरी, दीपाली घोंगे, श्वेता पत्की, अश्लेष जामरे, सुयोग खड़ककर इत्यादि पत्रकार परिषदेत उपस्थित होते.

# करिअर मार्गदर्शन आणि व्यक्तिमत्व विकास या विषयावर ऑनलाइन वेबिनार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ फार्मसी लोणारा नागपूर येथे करिअर मार्गदर्शन आणि व्यक्तिमत्व विकासावर ऑनलाइन वेबिनारचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांना विविध करिअर मार्ग, कौशल्य विकास आणि व्यक्तिमत्व वाढीच्या धोरणाविषयी मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. वेबिनारचे स्पीकर श्री. चिराग गांधी (डेप्युटी जनरल मॅनेजर, कॉर्पोरेट एचआर, मेडले फार्मास्युटिकल्स लि.) आणि श्री. प्रशांत खापरकर (असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट, सेल्स अँड मार्केटिंग, मेडले फार्मास्युटिकल्स लि.) यांचे स्वागत डॉ. सय्यद सज्जाउद्दीन गुलाब, सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य यांनी केले

श्री. चिराग गांधी यांनी विविध करिअर पर्याय समजून घेण्याचे महत्त्व आणि आजच्या स्पर्धात्मक वातावरणात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आवश्यक कौशल्य यावर प्रकाश टाकला. करिअरचा विकास ही एक सतत प्रक्रिया आहे यावर जोर देऊन ते विद्यार्थ्यांना सक्रियपणे वेगवेगळे मार्ग शोधण्यासाठी प्रोत्साहित करतात. श्री प्रशांत खापरकर यांनी संशोधन आणि विकास, नियामक घडामोडी, गुणवत्ता नियंत्रण, विपणन आणि विक्री यासह उद्योगातील महत्त्वपूर्ण भूमिकांवर चर्चा केली. या क्षेत्रातील कुशल व्यावसायिकांची वाढती मागणी आणि उद्योगाच्या ट्रेंडसह अपडेट राहण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला. वेबिनारचे संचालन सेंट्रल इंडिया फार्मसीच्या सहाय्यक प्राध्यापिका कु. अंकिता भुजबळ यांनी केले तर आभार प्रदर्शन सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ फार्मसीच्या सहाय्यक प्राध्यापिका श्रीमती गायत्री चिंचुलकर यांनी केले.

## विजेच्या तारांचा करंट लागून गाईचा जागीच मुत्यु



**काटोल :** काटोल तालुक्यातील लाडगाव शिवारात शनिवारी झालेल्या वादळी वाऱ्यासह रात्रीच्या सुमारम जोरदार पाऊस पडल्याने लाडगाव शिवारात विज प्रवाह करणारी विद्युत तार तुटून खाली पडल्याने त्या परिसरातील शेतकरी रामचंद्र बाजीराव उमाठे याच्या गायीला तुटलेल्या तारेच्या स्पर्श झाल्याने गाईचा जागीच मुत्यु झाला शेतकऱ्याचे लाखों रूपयांचे नुकसान झाले असल्याने तसेच विज वितरण कंपनीकडून झालेल्या नुकसानभरपाई भरपाई मागणी करीत आहे.



नागपूर : दिवाळीचा सण तोंडावर आला असुन बाजारात रंगीबेरंगी आकाशदिवे आणि ईतर साहित्यांची दुकाने सजली आहेत. दिवाळी निमित्त खरेदीसाठी ग्राहकांची प्रचंड झुंबड उडत असुन नागपुरच्या बाजारात तोबा गर्दी उसळली आहे. यावर्षी आकाशदिव्यांच्या अनेक व्हेरायटी बाजारात आल्या असुन बच्चे कंपनीसह महिलाही खरेदी करु लागल्या आहेत. पुढील दोन - तीन दिवसात बाजारातील गर्दी अधिकच वाढणार आहे.

# आर्थिक फसवणुकीत जामतारा देशात अव्वल

**नागपूर :** देशभरात सायबर गुन्हेगारांच्या टोळ्या सक्रीय झाल्या असून सर्वाधिक सायबर गुन्हेगार छत्तीसगढ, राजस्थान आणि बिहार राज्यात कार्यरत आहेत. देशातील टॉप-२० सायबर गुन्हेगारांच्या शहरांमध्ये मुंबईचा शेवटचा क्रमांक आहे, अशी माहिती पोलिसांच्या संकेतस्थळावरुन समोर आली आहे. देशभरात सर्वाधिक आर्थिक फसवणूक सायबर गुन्हेगारांनी केली आहे. अन्य फसवणुकींच्या तुलनेत भारतातील नागरिकांना सायबर गुन्हेगारांनी गंडा घालण्याचे प्रमाण मोठे आहे.

देशात एका महिन्यात जवळपास १० हजारांवर सायबर गुन्हे घडत आहेत. देशातील कोणत्याही राज्यातील व्यक्तीची डिजीटल आर्थिक फसवणूक झाल्यास त्यामध्ये छत्तीसगढ, राजस्थान आणि बिहार या राज्यातील सायबर गुन्हेगारांचा सहभाग नक्कीच असल्याचे पोलीस तपासात समोर येते. त्यामुळे देशभरात सर्वाधिक सायबर गुन्हेगारी छत्तीसगढमधील जामतारा, देवघर, दुमका या शहरातील सायबर गुन्हेगारांनी केल्याची सर्वाधिक शक्यता असते.

तसेच राजस्थानमधील अलवर, जयपूर, डीग आणि खेरताल या शहरात सर्वाधिक सायबर गुन्हेगार सक्रीय आहेत. तसेच बिहार राज्यातील नालंदा, पाटणा, नवादा, शेखपुरा या शहरात नव्याने सायबर टोळ्या सक्रीय झाल्या आहेत. देशभरातील ७० टक्के सायबर गुन्हेगारी छत्तीसगढ, राजस्थान आणि बिहार या तीन राज्यातील ११ शहरातून होत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. उर्वरित ३० टक्के सायबर गुन्हेगारी पश्चिम बंगाल (परगना), कर्नाटक (बंगळुरु), उत्तरप्रदेश (मथुरा), हरियाणा (नूह), महाराष्ट्र (मुंबई) आणि दिल्ली या शहरातून होत असल्याची माहिती समोर आली आहे. सायबर गुन्हेगारांच्या मोठ्या टोळ्या झारखंड आणि राजस्थान शहरात असून नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन सायबर गुन्हेगार आर्थिक फसवणूक करीत आहेत.

सर्वाधिक आर्थिक फसवणूक जामतारा शहरातून होत आहे. बँक खात्यातून परस्पर पैसे वळते करण्यासाठी आणि लिंकवर क्लिक केलेल्यांची फसवणूक करण्यात जामतारा शहरातील सायबर गुन्हेगारांचा हातखंडा आहे. क्रेडिट कार्ड, एटीएम कार्ड, पासवर्ड, बँक व्यवस्थापकाच्या नावाचा वापर करुन किंवा खाते गोठविल्याचे सांगून बँकेतील पैसे उडविण्यात जामतारा अजूनही पहिल्या क्रमांकावर आहे तर राजस्थानमधील अलवर शहरातून सर्वाधिक सेक्स्टॉर्शन करुन सायबर गुन्हेगार पैसे उकळतात.

# दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागांतर्गत अमृत भारत स्थानकांवर प्रवासी वाहनांचे पार्किंग आणि अपंग प्रवाशांसाठी विशेष सुविधा

**नागपूर :** दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागांतर्गत असलेल्या स्थानकांवर रेल्वे प्रवासी आणि वृद्ध प्रवासी तसेच दिव्यांग प्रवाशांना जास्तीत जास्त सुविधा देण्यासाठी विभाग नेहमीच प्रयत्नशील असतो. रेल्वे मंत्रालयाच्या अमृत भारत स्टेशन योजनेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत, या प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सुविधा, स्थानकांवर प्रगत आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत तसेच विशेष दिव्यांग प्रवाशांसाठी पार्किंगसाठी स्वतंत्र जागा निश्चित करण्यात आल्या आहेत.



सध्या, दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर विभागांतर्गत अमृत भारत स्थानक योजनेंतर्गत 15 स्थानकांच्या पुनरुज्जीवनाची तयारी सुरू असून, तेथे दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था आहे. स्थानकात येणा?्या लोकांच्या आणि प्रवाशांच्या सोयीनुसार पार्किंगची व्यवस्था आणि विकास करण्यात येत आहे.

या सुविधेमुळे प्रवाशांना त्यांची वाहने सुरक्षितपणे आणि सोयीस्करपणे पार्क करता येतील. मुबलक जागा असलेल्या प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन ही पार्किंग सुविधा निर्माण करण्यात आली आहे.

पार्किंगच्या ठिकाणी स्वच्छता आणि सुव्यवस्थित प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या व्यवस्थेकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी खास पार्किंगची जागा उपलब्ध आहे ज्यामुळे त्यांना विशेष सोय होईल.

पार्किंग परिसरात 24 तास सीसीटीव्ही पाळत ठेवणे, सुरक्षा रक्षक आणि योग्य प्रकाश व्यवस्था असावी आणि वाहनांच्या सुरक्षेकडे पूर्ण लक्ष द्यावे.

रेल्वे स्थानकांवर दिव्यांग प्रवाशांना पुरविल्या जाणा?्या सुविधांचा विस्तार करून, स्थानकांच्या पार्किंग स्टँडवर दिव्यांग प्रवाशांसाठी स्वतंत्र पार्किंगची जागा निश्चित केली जात आहे.

जेणेकरून ते कोणत्याही अडचणीशिवाय त्यांची वाहने सहज पार्क करू शकतील. अनेकवेळा अपंग प्रवाशांना त्यांची वाहने उभी करताना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याने स्थानक परिसरात उपलब्ध असलेल्या पार्किंग स्टँडमध्ये त्यांना विशेष पार्किंग सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत करण्यात येत आहे.

# खैरगाव येथील कोल्हापुरी बंधाऱ्याचे वाजले तीनतेरा



■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. २१ :

तालुक्यातील खैरगाव ग्रामपंचायत अंतर्गत प्रशासनाने काही दिवसा अगोदर लाखो रुपये खर्च करून खैरगाव वासीयासाठी पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी खैरगाव येथे कोल्हापुरी बंधारा बनविण्यात आला या बंधाऱ्याला एकूण २१२ लोखंडी दरवाजे लावण्यात आले होते परंतु आता काही दिवसा पूर्वी या बंधाऱ्याचे लोखंडी दरवाजे २१२ पैकी १०७ लोखंडी दरवाजे चोरीला गेले त्यापैकी दोन महिन्यापूर्वी ४८ लोखंडी दरवाजे चोरीला गेल्या आहे.

त्यानंतर आठ ते दहा दिवसाच्या अंतराने ५९ लोखंडी दरवाजे चोरीला गेले असे १०७ लोखंडी दरवाजे चोरीला गेल्याने खैरगाव परिसरात एकच खळबळ उडाली आहे कोणी चोरून नेले यांचा थाकपपत्ता अजून पर्यंत लागला नाही गेट खुले असल्याने आता पाणी बंधाऱ्यात थांबत नसल्याचे चित्र दिसत आहे आणि त्यामुळे खैरगाव येथे पाणी समस्या भेडसावणार असल्याचे नागरिकांनी बोलून दाखविले आता याला जवाबदार कोण समोर विधानसभेची निवडणूक रंगाला आली असल्याने याला वाली कोण असा खैरगाव वासीयानी प्रश्न उपस्थित केला आहे लाखो रुपये खर्च केलेला निधी व्यर्थ जाणार का, पाणी न थांबल्याने समस्या जैसे ते राहणार का, पाण्याची समस्या खैरगाव नागरिकांना भेडसावनार का? असे अनेक प्रश्न खैरगाव येथील सामाजिक कार्यकर्ते करीम शेख यांनी उपस्थित करून चोरीला गेलेल्या १०७ लोखंडी दरवाजे उघडकीस आणून माहिती पाटबंधारे पाणीपुरवठा विभाग नरखेड व पोलीस स्टेशन नरखेड येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. ग्रामपंचायत प्रशासनाचे याकडे अस्मभ्य दुर्लक्ष असल्याचे चित्र असून याची रितसर चौकशी करण्याची मागणी खैरगाव येथील सामाजिक कार्यकर्ते करीम शेख आणि समस्त नागरिकांनी प्रशासनाला केली आहे.

# रामटेक विधानसभा क्षेत्रातील एकही सुशिक्षित बेरोजगार राहणार नाही : चंद्रपाल चौकसे

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २१ :

चंद्रपाल चौकसे लोकसेवा प्रतिष्ठान च्या वतीने दिनांक २० ऑक्टोंबर २०२४ ला शांती मंगल कार्यालय रामटेक येथे रोजगार महोत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले. या महोत्सव मध्ये पारशिवनी, रामटेक व मौदा तालुक्यातील बेरोजगार ४ ते ५ हजार युवक -युवतींनी आपले नाव नोंदविले. रामटेक येथे पहिल्यांदा भव्य दिव्य असा रोजगार महोत्सव पर्यटक मित्र चंद्रपाल चौकसे यांचा पुढाकारणे घेण्यात आला.

चंद्रपाल चौकसे हे नेहमीच सामाजिक कामात अग्रेसर असतात. रामटेक, पारशिवनी व मौदा तालुक्यातील प्रत्येक युवक युवतीला रोजगार देण्याचे ध्येय चौकसेंनी हाती घेतले आहे 'ऐ तो सुरुवात है, आंधी अभी बाकी है' त्यांनी सामूहिक विवाह सोहळा, बेटा बेटी बचाव नशा हटाव, महिला बचत गटाला गृहउदयोग चे प्रशिक्षण असे विविध प्रकारचे सामाजिक कामे करीत असतात चंद्रपाल चौकसे रोजगार महोत्सव मध्ये हजारो युवक व युवतीनी सहभाग घेतला यामध्ये ६० (साठ) नामांकित कंपनी चा सहभाग होता मुलाखत होत असताना ताबडतोब नियुक्तीपत्र देण्यात आले.

यामध्ये १८४५ युवक युवतींना नियुक्ती पत्र देण्यात आले,या शिबीरात बेरोजगार ४ ते ५ हजार युवक युवतींनी आपले नाव नोंदविले त्यापैकी १८४५ बेरोजगार युवक युवतींना नामांकीत कंपनीत रोजगार मिळाला,या शिबिरात आलेल्या सगळ्यांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली.

यावेळी युवक युवतींसोबत आलेल्या पालकांनी चंद्रपाल चौकसे यांचे आभार मानून आनंद व्यक्त केला " चंद्रपाल चौकसे आयेंगे रोजगार दिलायेंगे " या वाक्यानुसार त्यांनी रोजगार देण्याचे काम केले यावेळी कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलन करून करण्यात आली.

यावेळी रामधाम च्या संस्थापीका संध्या चंद्रपाल चौकसे, आलीव रिसोर्टचे संचालक गौरव चौकसे,फ्लेमिंगो रिसोर्ट चे संचालक नविन चौकसे,जिनींग मिलचे संचालक महिपाल चौकसे, पी. टी. रघुवंशी, हेमंत जैन, राजेश जैस्वाल, रमेश ठाकरे, कौस्तुभ हुलके, माजी नगराध्यक्षा शोभा राऊत, बळवंत पडोळे, योगेश बर्वे, अनिल वाघमारे, जगदीश सांगोडे, नत्थुजी घरजाळे, प्रशांत येडके, डॉ.रामसिंग सहारे, अजय खेडकर, बबलु दुधबर्वे,मोहन कोठेकर ,विजय पांडे,सचिन सोमकुवर सह आदी प्रामुख्याने उपस्थीत होते.




रोजगार मेळाव्यात युवक युवतींना मिळाले नियुक्ती पत्र

# हुंडालोभी मायलेकाला १० वर्षांचा कारावास

**नागपूर :** हुंड्यासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या आणि तिला विष देऊन मारणाऱ्या हुंडालोभी मायलेकाला न्यायालयाने दोषी ठरवून 10 वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणाची सुनावणी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश शिल्पा एम. बैस यांच्या न्यायालयात झाली. अमोल पांडुरंग बोरकर (30) आणि रेखा पांडुरंग बोरकर (61) रा. क्वेटा कॉलनी अशी दोषी मायलेकांची नावे आहेत. लकडगंज पोलिसांनी 10 सप्टेंबर 2014 रोजी शंकर टिपले रा. भांडे प्लॉट यांच्या तक्रारीवरून दोन्ही आरोपींवर हुंड्यासाठी छळ, हुंडाबळीसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला होता.

शंकर यांची मुलगी सोनालीचे 17 जून 2014 रोजी अमोलशी लग्न झाले होते. सोनाली शिक्षिका होती आणि घरी शिकवणीवर्ग सुद्धा घेत होती. अमोल आणि रेखाने लग्न झाल्यापासूनच सोनालीचा हुंड्यासाठी छळ करण्यास सुरुवात केली होती. तिला माहेराहून दोन लाख रुपये आणण्यासाठी मानसिक आणि शारीरिक त्रास दिला जात होता. 8 सप्टेंबर 2014 रोजी सोनालीला जबरीने विष पाजण्यात आले.

खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान सोनालीचा मृत्यू झाला. शंकर यांनी पोलिसात तक्रार केली. तक्रारीनुसार, सोनालीचे शरीर निळे पडलेले होते आणि विषयुक्त पदार्थाची तीव्र दुर्गंध येत होती. पोलिसांनी दोन्ही आरोपींवर गुन्हा नोंदविला. तत्कालीन सपोनि निळे यांनी प्रकरणाचा तपास करून न्यायालयात आरोप पत्र दाखल केले. सरकारी वकील रश्मी खापर्डे आरोप सिद्ध करण्यात यशस्वी झाल्या. न्यायालयाने अमोल आणि रेखाला कलम 304 (ब) अंतर्गत दोषी ठरवून 10 वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

# पौर्णिमा दिवस निमित्त मंगलमूर्ती चौकात जनजागृती

**नागपूरः** नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पौर्णिमा दिवस अभियानांतर्गत शुक्रवारी (ता.१८) रात्री मंगलमूर्ती चौक परिसरात जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी ग्रीन व्हिजिल फाऊंडेशनचे श्री. कौस्तव चॅटर्जी, सुरभी जयस्वाल, मेहुल कोसुरकर, शीतल चौधरी, बिष्णुदेव यादव, श्रीया जोगे, प्रिया यादव, तुषार देशमुख, पार्थ जुमडे, पिनाकी बनिक आदींनी परिसरात जनजागृती केली. यावेळी मनपाचे विप्लव भगत उपस्थित होते. या अभियानाला मंगलमूर्ती चौक परिसरातील व्यावसायिक, दुकानदार, नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला. जनजागृती दरम्यान स्वयंसेवकांनी दुकानदार तसेच नागरिकांना एक तास विद्युत दिवे बंद ठेवण्याचे आवाहन केले व नागरिकांनी देखील त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला. या अभियानात स्थानिक नागरिकांनी देखील उत्साहाने सहभाग नोंदवून मनपाला सहकार्य केले.

# मांडव- घोराड परिसरात वाघ आला रे आला....

## * वनविभागाची सर्च मोहिम * शेतकऱ्यांमध्ये दहशत

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २१ :

मांडव -घोराड मांगली परिसरातील शेतशिवारात (ता.१९) सायंकाळी ७ वाजताच्या वाघाचे दर्शन झाले. यामुळे शेत शिवारात असलेल्या शेतकऱ्यांमध्ये दहशत पसरली आहे. वनविभागाने तत्परतेने सर्च मोहिम सुरू केली आहे. हिंगणा वनपरीक्षेत्रातील मांडवघोराड व मांगली शेतशिवारालगत शनिवारी दुचाकीने अतुल चांदणे जात असताना वाघ दिसला.



दुचाकीस्वार खाली कोसळला. यानंतर भोले यांच्या शेतशिवारात चांदणे भयभीत होऊन गेले. वनविभाग व पोलीस ठाण्यात माहिती दिली. वनपरिक्षेत्र अधिकारी रिना राठोड यांनी परिसरात सर्च मोहिम सुरू केली असून क्षेत्र सहायक जि. एम गायकवाड, वनरक्षक सचिन इंगोले, कोमल डावकोरे, वनमजुर रघुनाथ वडमे, संजय कावळेयांची टीम सर्च करण्यासाठी नेमली आहे. वनकर्मचाऱ्याने शेत शिवारात अडकलेल्या लोकांना सुरक्षित घरी पाठवीले. वाघाच्या पायाचे ठसे शोधले असता आढळले नाही.यामुळे परिसरात आलेला वाघ आहे की वाघीण याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. बोर अभयारण्य असल्याने वाघ त्या दिशेने गेला असावा,असा अंदाज वर्तविला जात आहे.

वाघाची दहशत असल्याने वनविभागाने काही दिवस बंदोबस्त ठेवण्यात यावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# ॲड.संदिप गोस्वामी यांना आचार्य पदवी (पी.एच.डी) प्रदान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :



जिल्हा सत्र न्यायालय व दिवाणी फौजदारी न्यायालय नागपूर येथील अँड. संदिप गोस्वामी यांना नुकतीच गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत राज्यशास्त्र विषयात आचार्य पदवी प्रदान करण्यात आली. त्यांच्या संशोधनाचा विषय "नव्वदोत्तर काळात भारतीय संविधानांतर्गत जीवन जगण्याचा अधिकारासंदर्भात जनतेतील जागृती आणि शासनाचा दृष्टिकोन - एक चिकित्सक विश्लेषण" (भंडारा जिल्ह्याच्या विशेष संदर्भात) हा होता. सरदार पटेल महाविद्यालय. चंद्रपुर येथील उच्च शिक्षण व संशोधन केंद्रात त्यांचे संशोधन कार्य सहयोगी प्राध्यापक मार्गदर्शक डॉ. एन.आर. चिमुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करून आचार्य पदवी करिता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे प्रबंध सादर केला होता. २ आक्टों. २०२४ गोंडवाना विद्यापीठाच्या १३ वा वर्धापन दिन व अकरा आणि बारावा दीक्षांत समारंभात विद्यापीठाच्या परिसरातील सभागृहात महाराष्ट्र राज्यपाल तथा माननीय कुलपती महामहिम सी.पी. राधाकृष्णन तसेच नितीनजी गडकरी, केंद्रीय मंत्री (महामार्ग व रस्ते वाहतूक),भारत सरकार, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, कुलगुरू डॉ. प्रशांत बोखारे, तसेच प्र-कुलगुरू मा.श्रीराम कावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. यापूर्वी अँड. संदिप गोस्वामी यांचे अनेक संशोधनपर शोधनिबंध यू.जी.सी. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शोधपत्रिकेत प्रकाशित झाले असून अनेक परिसंवाद, चर्चासत्र व परिषदांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

या संशोधनाचा उपयोग मानवाधिकार कार्यकर्ते, संशोधक, विद्यार्थी, प्रशासकीय अधिकारी यांना करता येणार आहे. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय मातृतुल्य डॉ.अलका देशमुख, डॉ.रेखा वानखेडे, डॉ. नंदाजी सातपुते, मार्गदर्शक डॉ. एन.आर. चिमूरकर, डॉ. हर्षवर्धन वानखेडे , डॉ.संदिप तुंडुलवार यांना दिले असून त्यांच्या या घवघवीत यशाबद्दल त्यांचे प्राध्यापक वर्गामधून तसेच अधिवक्ता वगार्तून सर्वत्र अभिनंदन केला जात असून त्यांच्या पुढील वाटचालीकरिता शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# परिट समाजाचा मेळावा व कोजागिरी कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २१ :

येथील कोहळे ले- आऊट मधील श्री संत गाडगे महाराज स्मारक परिसरात श्री संत गाडगे महाराज परिट समाज बहुउद्देशिय मंडळातर्फे कोजागीरी कार्यक्रम व समाज मेळावा रविवार २० ऑक्टोबर रोजी घेण्यात आला.

यावेळी महीलांसाठी संगीत खुर्ची, तंबोला, लहान मुलांचे नृत्य, महीलाचे ग्रुप नृत्य, वर्ग दहावी बारावीमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व पारितोषीक बक्षीस वितरण कार्यक्रम घेण्यात आला. कोजागरी पौर्णिमेच्या रात्री चंद्र आपल्या संपूर्ण १६ कलांमध्ये असतो.

चंद्राची किरणं विशेष अमृतमयी गुणांनी युक्त असतात, असे मानले जाते. म्हणूनच कोजागिरीला हिंदू धर्मात एक आगळेवेगळे महत्व प्राप्त झाले आहे. असे प्रतिपादन श्री संत गाडगे महाराज परिट समाज बहुउद्देशिय मंडळाचे अध्यक्ष भीमराव भोरकर यांनी केले.

आयोजनासाठी अध्यक्ष भीमराव भोरकर, उपाध्यक्ष तुकाराम क्षिरसागर, सचिव विजय क्षिरसागर, महीला मंडळ अध्यक्षा ज्योतीताई भोरकर, इंदिरा क्षिरसागर, वंदना केळझरकर , शिक्षिका प्रज्ञा चौधरी, वंदना केळझरकर, चित्रा खंताळे, शोभा क्षिरसागर,अलका बोधनकर, अश्विनी भाजीपाले, नेहा सावरकर, राजु गवळी, मोरेश्वर केळझरकर, भोलाशंकर क्षिरसागर, गौरव क्षिरसागर , प्रमोद शिरपुरकर, अतूल खंताळे , दिपक सावरकर , प्रफुल सावरकर, नितिन क्षिरसागर आदींनी सहकार्य केले.

# शिल्पा ढोमणे लिखित 'ऋणानुबंध' व 'अभिलाषा" या दोन कादंबऱ्यांचे प्रकाशन

## विदर्भ साहित्य संघ शाखा, रामटेकतर्फे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २१ :

रामटेक, ता.२०: विदर्भ साहित्य संघाच्या रामटेक शाखेतर्फे आयोजित पुस्तक प्रकाशन सोहळ्यात शिल्पा ढोमणे लिखित 'ऋणानुबंध' व 'अभिलाषा" या दोन कादंबऱ्यांचे प्रकाशन प्रसिद्ध साहित्यिक विजया मारोतकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यानिमित्त प्रसिद्ध कादंबरीकर विजया ब्राह्मणकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी वि.सा. संघ रामटेक शाखेचे अध्यक्ष दीपक गिरधर होते. प्रकाशन सोहळा रविवारी (ता.२०) ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रामटेकच्या सभागृहात पार पडला. यावेळी मंचावर राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य राजू बर्वे, लेखिका शिल्पा ढोमणे, कादंबऱ्यांवर भाष्य करणारे भाष्यकार डॉ. जगदीश गुजरकर व जयश्री पांगारकर, डॉ. अंशुजा किंमतकर, प्रा.डॉ.गिरीश सपाटे, प्रा.डॉ. सावन धर्मपूरीवार हे मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रा. विजया मारोतकर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते कादंबऱ्यांचे प्रकाशन करण्यात आले. वि.सा. संघाच्या वतीने लेखिका शिल्पा ढोमणे आणि त्यांचे पती प्रवीण ढोमणे यांचा शाल, श्रीफळ, गुलाबाचे रोपटे आणि स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. जयश्री पांगारकर व डॉ. जगदीश गुजरकर यांनी अनुक्रमे "ऋणानुबंध' व "अभिलाषा" या कादंबऱ्यांवर समिक्षणात्मक भाष्य केले.

दोन्ही कादंबऱ्या या विज्ञानवादाव्दारे मानवतावादी मुल्ये जोपासणाऱ्या तसेच व्यक्ति स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या असल्याचा अभिप्राय भाष्यकारांनी दिला. प्रा.विजया मारोतकर यांनी बोलताना, कादंबऱ्यांमध्ये वैद्यकीय, कायदेविषयक अभ्यासपूर्ण विषय हाताळणीसाठी लेखिका शिल्पा ढोमणे यांचे कौतुक केले. डॉ. सावन धर्मपुरीवार यांनी प्रास्ताविक केले. सचिव, डॉ. पवन कामडी यांनी संचालन केले तसेच उपाध्यक्ष प्रा.डॉ. गिरीश सपाटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# रामधाम येथे नाभिक संताची मूर्ती स्थापन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २१ :

मनसर येथील प्रसिध्द रामधाम येथे पर्यटक मित्र चंद्रपाल चौकसे यांच्या उपस्थीतीत नाभिक समाजाचे आराध्य दैवत संत सेना महाराज व नगाजी महाराज यांच्या मूतीर्ची स्थापना करण्यात आली. विधीवत पूजा करून संताची स्थापना मनसर येथील रामधाम मध्ये करण्यात आली.तसेच लवकरच रामटेक अंबाला परिसरात समाज भवनाचे बांधकाम सुरू करण्याचे आश्वासन कार्यक्रमाला आवर्जून हजेरी लावणारे रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार श्यामकुमार बर्वे यांनी दिले.



नाभिक समाजाच्या आराध्य दैवत संताचे पहिल्यांदाच प्राणप्रतिष्ठा करून रामधामचे संचालक व सामाजिक कार्यकर्ते चंद्रपाल चौकसे यांचा हस्ते ज्येष्ठ समाज बांधवांना शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले. समाजातील तरुणांनी आपल्या सलून व्यवसायावर आधुनिक पद्धतीने काम करून जास्त उत्पन्न मिळू शकते आणि सलून व्यवसायिकानी आपल्या अंगी कोणतेही व्यसन लाऊन घेऊ नये असे सामजिक सेवक व रामधमचे संचालक तथा पर्यटक मित्र चंद्रपाल चौकसे यांनी आपल्या भाषणात सांगितले.

उमरेड येथील प्रसिद्ध कीर्तनकार , नाभिक प्रवचनकार श्री. कावळे महाराज यांनी सेना महाराज व नगाजी महाराज यांचा जीवन चरितत्रावर प्रकाश टाकत परिसर दुमदुमवलविला.

यावेळी कार्यक्रमाला सामाज सेवक नरेश बर्वे, नाभिक नेते शरद वाटकर , रवी पारधी, नरेश लक्षणे, संतोष दाहिफळकर, जितु वलोकर, दत्तू खडसे, शेषराज येऊतकर, किशोर गाडगे, घुमेजी, प्रशांत चन्ने चौधरी, राहुल गणोरकर, गणेश वाटकर, तेजस पारधी, शुभम क्षीरसागर, संदीप सुर्यवंशी, प्रशांत लक्षणे, सुनील लाडेकर, समीर लक्षणे, नंदकिशोर पापडकर सह आदी नागपूर जिल्ह्यातील नाभिक समाज बांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहिरनामा

**कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, रामटेक**

यांच्या न्यायालयातील एम.जे.सी. नं. ४१/२०२४
पेशी ता.२५/११/२०२४
प्रोसेस नं.२६३७ दि.२१/१०/२४

अर्जदार १.आशा श्रीपाद धनकर वय ६२ २.प्रणव श्रीपया धनकर वय ४० दोघे राह-वार्ड नं.०१ अंबाला रामटेक ह.मु. फ्लॅट नं. ४ एफ भावीका अपार्टमेंट, गोधनी रोड, पदमावती नगर गोधनी, तह व जि. नागपूर ३.मानसी मंगेश जोशी वय ४४ राह-प्लॉट न.२९२. दक्षीणमुर्ती चौक महल नागपूर ४. सविता नयन सोनटक्के वय ४३ राह-प्लॉट न ३०१, आनंद सागर अपार्टमेंट मानेवाडा रोड, पार्वती नगर, नागपूर

विरुध्द

प्रतिवादी - कोणीही नाही

मयतदार : श्रीपाद मनोहर धनकर मृत्यू दिनांक ०२.०१.२०२४ रा वार्ड न ०१. अंबाळा वार्ड तह-रामटेक, जि. नागपूर

सदरहू अर्जदाराने नियम २ प्रकरण १ मुंबई विनीमयम अधिनियम १८२७ अंतर्गत या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने मयतदार श्रीपाद मनोहर धनकर मृत्यू दिनांक ०२.०१.२०२४ रा. वार्ड न. ०१. अंबाळा वार्ड तह-रामटेक जि नागपूर यांचे वरील नमूद वारस क्र. १ ते ४ यांच्या कायदेशीर वारस असल्याबाबत वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारीख **२५.११.२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर मयतदाराच्या **कायदेशीर वारसान प्रमाणपत्र** बाबत जर कोणाचा उत्तर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा, जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. १८/१०/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, रामटेक**

## जाहिरनामा

**कोर्ट विद्यमान श्री भोजराज बडवाईक नायब तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय**

प्र.क्र.एम आर सी-८१/२०२४
मौजा चारगाव ता. रामटेक
जिल्हा नागपूर

ज्याअर्थी मालाबाई नरेंद्र जांभूळकर रा. समतानगर नागपूर ता. जि. नागपूर यांनी स्वतः नामे मालू रामाजी कोचे यांचा जन्म दिनांक १२.०२.१९७० रोजी मौजा चारगाव ता. रामटेक येथे राहत्या घरी येथे झाला असुन जन्माची नोंद ग्रामपंचायत खैरी बिजेवाडा येथे केली नाही. त्याबाबत ग्रामपंचायत खैरी बिजेवाडा यांनी दिनांक १२.०८.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे मालू रामाजी कोचे यांचा जन्म दिनांक १२.०२.१९७० बाबत ग्रामपंचायत खैरी बिजेवाडा येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद मालू रामाजी कोचे यांचा जन्म दिनांक १२.०२.१९७० बाबत ग्रामपंचायत खैरी बिजेवाडा येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे लाक्षेप अथवा उजर/तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहुन या न्यायालयात सक्षम सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक २१/११/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ- रामटेक
दिनांकः २१/११/२०२४

**(भोजराज बडवाईक)**
**नायब तहसीलदार, रामटेक**

# कोजागिरीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

## पंचवटी वासीयांचा स्तुत्य उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २१ :

परिसरात उभारण्यात आलेला रंगबिरंगी शामियाना, त्यात बच्चे कंपनीसाठी आयोजीत केलेल्या एकापेक्षा एक सरस स्पर्धा, स्पर्धेतील त्यांचा अलोट उत्साह, दिमतीला चिमुकल्यांचा नृत्याविष्कार, स्पर्धेत विजयी ठरल्यावर चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद त्यानंतर विजेत्यांवर होणारी बक्षिसांची लूट, बाजूलाच स्वयंपाकाची लगबग आणि खमंग जेवणा सोबतच बासुंदीच्या दूधाचा गोडवा...हे सर्व दृश्य होते पंचवटीतील कोजागिरी कार्यक्रमाचे, पंचवटी वसाहतीतील नागरीकांनी लोक सहभागातून कोजागिरी कार्यक्रम उभा केला, या कार्यक्रमाला अबालवृद्धांसह परिसरातील ज्येष्ठांनीही उत्साहाने सहभागी होवून एक प्रकारे सामाजिक सलोख्याचे दर्शन घडविले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी याच वसाहतीत राहणारे सेवानिवृत्त प्रा. रमेश पोतदार तर प्रमुख पाहुणे म्हणून परिसरातील सर्व ज्येष्ठ नागरीक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. याप्रसंगी मान्यवरांचे मार्गदर्शन झाले.

कार्यक्रमात वसाहतीतील लहान मुले, महिला भगिनी तसेच कपल करीता विविध मनोरंजनात्मक स्पर्धा घेण्यात आल्या ज्यामध्ये सर्वांनी हिरीरीने सहभागी होवून यथेच्छ आनंद लुटला, विजेत्यांवर भरघोस बक्षिसांची लयलूट करण्यात आली. त्यानंतर सर्वांनी खमंग जेवणावर ताव मारीत बासुंदीच्या दूधाचा देखील मनमुराद आनंद लुटला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश निंबाळकर, प्रास्ताविक महेंद्र साव तर आभार प्रशांत मोरे यांनी मानलेत.

कार्यक्रमाच्या यशश्वीतेसाठी विजय गुडधे, महेश वाघ, महेश दळवी, संदीप पांडव, अनुपकुमार कळसकर, राजेश धपके, दीपक ढोरे, गणपतराव पाचपोर, प्रभाकर मांगुळकर, गजानन ढोरे, मंगेश कुंभारे, राजेश रहाटे, मोरेश्वर नागमोते, राजेश ठाकरे, गोपाळ चौधरी, मनोहर कोंडे, जयप्रकाश राऊत, अशोक बोंदरे, हिरालाल पाटील, सोनू ढोरे, शेखर पाटील आदींनी अथक परिश्रम घेतलेत.

# वाचन प्रेरणा दिनानिमित्त 'शिवाजी कोण होता' पुस्तकाचे वितरण



■ महासागर प्रतिनिधी
कन्हान , दि. २१ :

डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती (दि.१५) ऑक्टोबर ला 'वाचन प्रेरणा दिन' म्हणुन साजरी केल्या जाते. कन्हान येथे स्वयंप्रकाशीत प्रति ष्ठान आणि अखिल भारतीय दलित साहित्य अकादमी दिल्ली तर्फे गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता या पुस्तकाच्या २०० प्रति वितरित करून वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

शालेय विद्यार्थ्यामधे वाचनाची गोडी निर्माण व्हावी आणि वाचन संस्कृती वाढावी हा मुख्य उद्धेश असुन स्वयंप्रकाशीत प्रतिष्ठान दरवर्षी वाचन प्रेरणा दिनी असे उपक्रम राबवित असते. विठु माऊली क्रेडिट को ओप्राटीव्ह पतसंस्था जिल्हा नागपूर शाखा कांद्रीचे सीईओ निलेश शालिकरामजी गाढवे यांचा सौजन्या ने पुस्तकाचे वितरण करणात आले.

याप्रसंगी संस्थेचा अध्यक्षा सुनीता डांगरे मॅडम, सी ई ओ निलेश गाढवे, मुख्य सालगार धर्मेंद्र ठाकरे, प्रबोधनकार प्रविणदादा सोनेकर, अखिल भारतीय दलित साहित्य अकादमीचे अध्यक्ष दीपचंद शेंडे, स्वयंप्रकाशीतचे रविंद्र कोचे उपस्थित होते. निलेश गाढवे यांनी शिवाजी कोण होता पुस्तकाच्या २०० प्रति वितरित करण्यासाठी उपलब्ध करून दिल्या.

उपरोक्त उपक्रमास ओम होंडा पॉईंट चे महेश काकडे, भारत बर्तन चे प्रदीप गायकवाड, केटी असोसिएट चे सिद्धार्थ टेम्भुर्णे, अखिलेश मेश्राम, प्रा. मंगेश सिलेवार, प्रा.आशिष सायरे, नितीन उके, हर्षल बेले, अमित वासाडे आदीनी मोलाचे योगदान दिले.

## मध्य रेल्वेने केली विशेष गाड्यांच्या फेऱ्यांमध्ये वाढ

**नागपूर :** उत्सवाच्या काळात प्रवाशांच्या वाढलेल्या गर्दीला सामावून घेण्यासाठी, मध्य रेल्वेने नागपूर-पुणे उत्सव विशेष गाड्यांच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर आणि पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अधिक सोय उपलब्ध करून देण्यासाठी हा विस्तार करण्यात आला आहे.

गाडी क्र. 01201 नागपूर-पुणे विशेषः ही गाडी मूळतः 28.10.2024 ते 07.11.2024 दरम्यान (4 फेऱ्या) चालविण्यात येणार होती, आता ही गाडी 21.10.2024 ते 11.11.2024 या कालावधीत 3 अतिरिक्त फेऱ्यांसह चालविली जाणार आहे, ज्यामुळे एकूण फेऱ्यांची संख्या 7 होईल. गाडी क्र. 01202 पुणे-नागपूर विशेषः ही गाडी मूळतः 29.10.2024 ते 08.11.2024 दरम्यान (4 फेऱ्या) चालविण्यात येणार होती, आता ही गाडी 22.10.2024 ते 12.11.2024 या कालावधीत 3 अतिरिक्त फेऱ्यांसह चालविली जाणार आहे.

# मतदार राजा जागा हो...लोकशाहीचा धागा हो'
## कोंढाळी येथे निघाली मतदार जनजागृती रॅली

■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी, दि. २१ :

मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो... अशा गगनात भेंदी घोषणा देत चमुकल्यासह शाळकरी विद्यार्थी शिक्षकांची मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन सोमवार दि 21ऑक्टोबरला यशस्वी पार पडले.

स्थानिक लाखोटीया भुतडा विद्यालयात व कनिष्ठ महाविद्यालयात भारत निवडणूक आयोग भारत सरकार अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर अंतर्गत काटोल उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी पियुष चिवंडे, तहसीलदार राजू रणवीर, ना. तहसीलदार संजय भुजाडे, गट शिक्षणाधिकारी जनबंधू यांचे सूचनेनुसार तालुक्यात दि 17 ते 23 ऑक्टोबर दरम्यान विविध मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षण विभाग प स काटोल अंतर्गत स्थानिक विद्यालयात पालक मेळावा व मतदार प्रतिज्ञा कार्यक्रम ई लर्निंग हॉल येथे सोमवारला सकाळी पार पडला.




कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य सुधीर चं.बुटे, पालक समिती उपाध्यक्ष हरीशचंद्र देशमुख, उपमुख्याध्यापक कैलास थुल, ज्येष्ठ पर्यवेक्षक मनोज ढाले, परीक्षाविभाग प्रमुख सुनील सोलव, प्रिया धारपुरे शिक्षक, पालक तसेच नवं मतदार नोंदणी (18 वर्षा वरील) विद्यार्थी उपस्थित होते. सभेत प्राचार्य यांनी मतदार जनजागृती विषयक विचार व्यक्त केले. उपस्थित सर्वांनी मतदार प्रतिज्ञा शपथ घेतली. संचलन अनंत बुरान तर आभार सुनील सोलव यांनी मानले.

**शेकडो विद्यार्थ्यांचा मतदार जनजागृती फेरीत सहभाग...**

विद्यालयातून राष्ट्रीय महामार्ग, बँक ऑफ इंडिया मार्ग विकास नगर येथून शाळेत मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.यात वर्ग 5ते 7मधील 714 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.सध्या प्रथम सत्र परीक्षा सुरु आहे. तरी पण विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रॅली आयोजनास उपमुख्याध्यापक कैलास थुल, परीक्षा विभाग प्रमुख संजय आगरकर, शिवाजी जामदार, श्यामसुंदर धीरण,नितीन भैसारे, चंदन चौक,हर्षल वानखेडे, अमोल काळे, महेश मलवे हर्षवर्धन ढोके, विनय ढोले, ओमिका राठी,कल्पना हेडाऊ, सोनाली ठवळे, दर्शना फुले, मोहिनी भक्ते, भारती पिसे,यादव पंधराम प्रकाश मलवे शुभम राऊत, बबिता उईके आदींचे सहकार्य लाभले.

# किशोर कन्हेरे यांचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

दिल्ली येथे नुकताच पार पडलेल्या बैठकीत किशोर कन्हेरे यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश केला. कांग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.ह्या प्रसंगी कांग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला, अध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री सुनील केदार, खासदार श्यामकुमार बर्वे, मोठ्या संख्येने काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

किशोर कन्हेरे यांचे श्याम चौधरी, रुषि कारुंडे, ईश्वर बरडे, राजेश रंगारी, रजत देशमुख, राजेश आझाद, रमेश गिरडकर, नाना लोखंडे, मनोज गावंडे, नरेंद्र आगलावे, प्रभाकर आंजनकर, विजय नाडेकर, किशोर चरपे, समीर वानखेडे, किशोर गायधने, हंशुल गुप्ता, देवेंद्र काटे, यांनी कांग्रेस पक्षात प्रवेश घेतल्या बद्दल अभिनंदन केले.

## निधन
### इंदूबाई टेकाडे

**वाडी :** येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांची आई इंदूबाई साहेबराव टेकाडे यांचे निधन झाले.



त्या ८३ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, दोन मुली ,नातवंड व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थीवावर मेंढेपठार (बाजार) ता. काटोल येथील स्मशान भुमीत सोमवारी अंत्यसंस्कार करण्यात आला.

# संजीवनी सखी संघ कन्हान शाखेचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान , दि. २१ :

महिलांच्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी व महिलांनी समाजाप्रती आपली बांधिलकी जपावी तिचे सामाजिकरण व्हावे यासाठी गत 17 वर्षापासून नागपूर परिक्षेत्रात काम करणारी संस्था म्हणून संजीवनी सखी संघ ही कार्यरत आहे. संस्थांच्या माध्यमातून महिलांसाठी वर्षभर आरोग्य शिबीर, महिला मेळावा, पालकत्व कसे असावे डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारधारा कार्यशाळा, सौंदर्य व आहार व्यक्तिमत्व विकासावर कार्यक्रम उद्योजकता मार्गदर्शन प्रभावी संभाषण कौशल्य प्रशिक्षण सांस्कृतिक कार्यक्रम आणि सहल इत्यादी उपक्रम घेण्यात येतात. या माध्यमातुन महिला सक्षमीकरण होण्यास महत्त्वाच्या हातभार लागतो. या संजीवनी सखी संघाच्या कन्हान शाखेचे उद्घाटन व कार्यकारणीची पदग्रहण सोहळा दि.20 ऑक्टोंबरला दुपारी 12 वाजता वैष्णवी मंगल कार्यालय गणेश नगर कन्हान येथे महिलाच्या भरगच्च उपस्थितीत संपन्न झाला.



कार्यक्रमाची शूरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता जिजाऊ, सावित्री माता, माता रमाई यांच्या प्रतिमेला माल्यार्पन करून व द्वीप प्रज्वलित करून स्वागत गीत व बुद्ध गीतावर आधारित नृत्याने शूरूवात करण्यात आले. यावेळी संजीवनी सखी संघ कन्हानच्या कार्यकारणीचे पदग्रहण उपस्थित अतिथीच्या हस्ते स्वागत करून झाले.अध्यक्ष म्हणून दुर्गा निकोसे,उपाध्यक्ष अनिता दुपारे,सचिव प्रतिभा चौरे,सहसचिव कल्पना फुलझेले, कोषाध्यक्ष लता मंडपे, सहकोषाध्यक्ष सुजाता नारनवरे, तसेच सदस्य म्हणून सिंधु वाघमारे, प्रमिला घोडेश्वर, ज्योती मोटघरे, दुर्गा गजभिये, नमिता फुलझेले, वैजयंती पाटील,अनिता देशभ्रतार यांनी पदग्रहण केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष नगरपरिषद नगराध्यक्ष करुणा आष्टनकर, प्रमुख पाहुणे संजीवनी सखी संघाचे माजी अध्यक्ष कल्पना मेश्राम नागपूर यांनी संस्थेचे नियम व उपक्रम यावर विस्तृत मार्गदर्शन केले. विशाखा ठमके व नगरसेविका कल्पना नितनवरे तसेच संजीवनी सखी संघाचे अध्यक्ष विभा गजभिये नागपूर यांनी सुद्धा उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

# १८,४४१ महिलांच्या हातावर रंगली मेहंदी

**नागपूर :** शहरातील नामांकित मेहंदी कलाकारांसह हौशी कलाकार देखील आदिशक्तीच्या जागराचा, गौरवाचा उत्सव असणाऱ्या शारदोत्सवामध्ये महिलांच्या हातावर मेहंदी रेखाटण्यात गुंतलेले आहेत.आतापर्यंत 340 ठिकाणी मेहंदीचे कार्यक्रम आयोजित केले गेले असून दर्शनासाठी येणा-या 18,441 महिलांच्या हातावर मेहंदी काढण्यात आली आहे.



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्यावतीने यंदादेखील शारदोत्सवात मेहंदी रेखाटनाचा उपक्रम घेण्यात येत आहे. कला, साहित्य, संस्कृती, परंपरांचा प्रचार व प्रसार व्हावा, या उद्देशाने आयोजित या उपक्रमात शहराच्या सहा विधानसभा क्षेत्रांमधील मंडळे सहभागी झालेली आहेत.

संयोजिका मनिषा काशीकर यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम सुरू असून हातावर मेहंदी रेखाटून घेणा-या महिलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे शारदोत्सव मंडळांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

मंडळांनी अधिक माहितीसाठी व नावे नोंदणीसाठी पश्चिम मंडळ - प्रगती पाटील, कविता सरदार, मनोरमा ताई, सिमरन कौर दक्षिण पश्चिम - वर्षा चौधरी, अश्विनी डबली, पूर्व मंडळ - संतोष लड्ढा, मनिषा कोठे, निशा भोयर, वैशाली फुलझेले, दक्षिण मंडळ - ज्योती देवघरे, प्रिती राजदेरकर, दिपाली ढोमणे, मध्य मंडळ - सारिका नांदूरकर, अनिता काशीकर रेखा निमजे व उत्तर मंडळ - डॉ. सरिता माने, आशा गुप्ता यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन खासदार सांस्कृतिक समतीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले व कार्यकारी मंडळाने केले आहे.

# 'सोबत'च्या बहिणींचे प्रश्न सोडवून सक्षम करू : संदीप जोशी
## श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्टद्वारे दिवाळी स्नेहमिलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

कोरोनामुळे उद्भवलेल्या संकटात बहिणींना मदत करण्यासाठी 'सोबत' पालकत्व प्रकल्प पुढे आला. पुढे मुलांचे शिक्षण, आरोग्य, स्वयंरोजगार या क्षेत्रात सहकार्य करून परिवाराला सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले. 'सोबत'ची मुठ अशीच घट्ट ठेऊन २७३ परिवारातील बहिणींचे प्रश्न सोडवून त्यांना अधिक सक्षम करू, असा विश्वास श्री. सिद्धिविनायक सेवा ट्रस्टचे अध्यक्ष माजी महापौर संदीप जोशी यांनी व्यक्त केला.

श्री. सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट द्वारे संचालित सोबत पालकत्व प्रकल्पाने जबाबदारी स्वीकारलेल्या २७३ भगिनींच्या परिवाराकरिता सुरेंद्रनगर आरपीटीएस रोड येथील जेरिल लॉनमध्ये दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून दैनिक महाराष्ट्र टाइम्सचे संपादक श्री. श्रीपाद अपराजीत आणि दैनिक नवभारतचे संपादक श्री. संजय तिवारी उपस्थित होते. यावेळी प्रणय मोहबंशी, प्रकाश रथकंठीवार, आनंद टोळ यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना श्री. संदीप जोशी म्हणाले, लॉकडाऊनच्या काळात एका बहिणीने मदतीसाठी फोन केला. त्यावेळी त्या बहिणीच्या परिवाराची विदारक परिस्थिती पाहून या संकटाचे बळी ठरलेल्या इतरही बहिणींना मदत करण्याची संकल्पना पुढे आली व त्यातून 'सोबत' पालकत्व प्रकल्पाची निर्मिती झाल्याचे त्यांनी सांगितले. 'सोबत'ला समाजातील अनेक सेवाभावी नागरिकांनी मदतीचा हात दिला आहे. 'सोबत' परिवारातील एका भगिनीची डॉ. साधना देशमुख यांनी निःशुल्क प्रसूती केली. 'सोबत' परिवारातील एका सदस्याची हृदयाची शस्त्रक्रिया करण्यात आली.



परिवारातील पाल्यांच्या शिक्षणासाठी दरवर्षी दहा हजार रुपयांची मदत करण्यात येते. अनेक भगिनींना स्वतःच्या पायावर उभे राहण्याच्या हेतूने विविध प्रशिक्षण देण्यात आले. हे कार्य पुढेही असेच सुरु राहील, असा विश्वास श्री. सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट चे अध्यक्ष माजी महापौर श्री. संदीप जोशी यांनी व्यक्त केला. यावेळी श्री. संदीप जोशी यांनी भगिनींचा उल्लेख 'पर्मनंट बहिणी' असा केला.

दैनिक महाराष्ट्र टाइम्सचे संपादक श्री. श्रीपाद अपराजीत यांनी संदीप जोशी यांच्या कायार्चा यावेळी गौरव केला. आध्यात्म आणि सेवा या दोन्हीचा मिलाप संदीप जोशी यांच्या स्वभावात आहे. त्यांच्या कार्यात अभिनव कल्पना असतात. जिथे चांगुलपणा दिसतो तिथे संदीप जोशी उभे असतात असेही ते म्हणाले. भगिनीसोबतच्या 'दिवाळी मिलन' ने सामाजिक कायार्तून खरी दिवाळीची सुरुवात झाल्याचेही श्री. श्रीपाद अपराजीत म्हणाले. संदीप जोशी यांनी सेवेची नौका उभी केली असून ती वल्हवण्यासाठी आपण सर्व प्रयत्न करू व नागपूरकर म्हणून या सेवेत नेहमी सोबत राहू, असा विश्वासही त्यांनी दिला.

दैनिक नवभारतचे संपादक श्री. संजय तिवारी यांनी 'सोबत' प्रकल्पाची स्तुती करताना अशा प्रकल्पाच्या माध्यमातून समाजातून अनेक संदीप जोशी पुढे यावेत ही अपेक्षा व्यक्त केली. श्री. जोशी यांनी 'सोबत'च्या माध्यमातून २७३ कुटुंबांना जोडले नसून २७३ विचार जोपासले आहेत, असेही ते म्हणाले. कोरोनामुळे बाधित झालेल्या कुटुंबातील सदस्यांना स्थायी स्वरूपात सक्षम करावे यासाठी पुढील काळात प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करताना श्री. तिवारी यांनी यासाठी शुभेच्छा दिल्या.

दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पी.एस. म्यूझिकल कराओके ग्रुपद्वारे प्रमोद संतापे यांच्यासह चमूने बहारदार गीतांचे सादरीकरण करण्यात आले. चंद्रकांत रेड्डी यांनी मनोगत व्यक्त करताना उमेदीच्या काळात मुलाचा मृत्यू झाल्यानंतर संदीप जोशी यांनी 'सोबत'च्या माध्यमातून मोलाची साथ दिल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त करून आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन ज्योत्स्ना कुऱ्हेकर यांनी केले. आभार आनंद टोळ यांनी मानले.

# विदर्भ तेली समाज महासंघातर्फे कोजागिरी मेळावा संपन्न



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :

विदर्भ तेली समाज महासंघ शाखा नागपूर तर्फे सेवादल महिला महाविद्यालय नागपूर येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त कोजागिरी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी कोजागिरी कार्यक्रमाचे निमित्ताने संगीत मैफिल आयोजन करण्यात आलं होतं. यात अनेक सदस्याने सहभागी झाले होते.

त्यावेळी कार्यक्रमाला उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विदर्भ तेली समाज महासंघाचे केंद्रीय कार्याध्यक्ष संजय शेंन्डे, सचिव संजय सोनटक्के, सुरेश वंजारी नागपूर शहर अध्यक्ष,उपाध्यक्ष वि.ते.स महासंघ संजय नरखेडकर,धनराज तळवेकर, प्रेमानंद हटवार, संजय वाडीभस्मे,अनिल घुसे, शंकर ढबाले, इंजिनिअर शेखर गुल्हाने, राजकुमार चकोले वंदनाताई वनकर, प्रशांत मदनकर, राजेंद्र डकरे, रमेश उमाटे कृष्णा बेले, कमलाकर राजूरकर, सतीश पाटील, पुरुषोत्तम कांबळे ज्ञानेश्वर लांजेवार रवी मेहर मनोहर बेलखेडे शंकर गंधारे, राशेकर येळणे, विद्या समरित, शुभांगी मेश्राम, संगीता आकरे आणि इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# नागपूरकर साजरी करणार 'स्वच्छ दिवाळी-शुभ दिवाळी'

## २१ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

केंद्र शासनाच्या निदेर्शानुसार आणि नागपूर महानगरपालिकेच्या पुढाकाराने यंदा नागपूरकर नागरिक स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी साजरी करणार आहेत. केंद्र शासनाच्या 'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' या मोहिमे अंतर्गत नागपूर महानगरपालिकेद्वारे २१ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांमध्ये नागपूरकर जनतेने उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी पत्रकार परिषदेतून केले आहे.

स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी अभियानाची माहिती देण्यासाठी मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील आयुक्त सभाकक्षामध्ये पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्यासह अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल, घनकचरा व्यवस्थापन संचालक तथा उपायुक्त डॉ. गजेंद्र महल्ले उपस्थित होते.

अभियानाबद्दल माहिती देताना मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले की, 'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' मोहिमेअंतर्गत मनपाच्या दहाही झोनमध्ये प्रभाग स्तरावर उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमामध्ये नागरिक, नागरिक समुह, अशासकीय संस्था (एनजीओ), स्वयं सहायता समूह, शाळांचे विद्यार्थी, युथ ग्रुप यांना सहभागी करून घेण्यात येणार आहे.

'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' मोहिमे अंतर्गत २१ ते २४ ऑक्टोबर दरम्यान दररोज दहाही झोनमधील वेगवेगळ्या प्रभागांमध्ये 'स्वच्छ दिवाळी सखोल स्वच्छता' उपक्रम राबविण्यात येणार आहे. २५ ऑक्टोबर रोजी दहाही झोनमधील १९ दहनघाटांची स्वच्छता अभियान राबविण्यात येईल. २६ ते २८ ऑक्टोबर या कालावधीमध्ये मनपाच्या सर्व आरआरआर सेंटरवर दिवाळीतील सफाई मध्ये निघणारा पुनर्वापरायोग्य तसेच अन्य कचरा संकलीत करण्यात येईल.

, २७ ऑक्टोबर रोजी शहरातील घराघरातून कचरा संकलीत करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. २८ ऑक्टोबर रोजी शहरातील महापुरूष, स्वातंत्र्य सेनानींच्या एकूण ५९ पुतळ्यांची स्वच्छता करण्यात येईल. २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी 'हर घर स्वच्छता के साथ दिवाली' या थीमसह घरोघरी दिव्यांची सजावट तसेच स्वच्छता संदेश देणारी रांगोळी काढण्यात येईल. या उपक्रमामध्ये मोठ्या प्रमाणात शहरातील जनतेचा सहभाग असणार आहे. २५ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीमध्ये मनपाच्या आयईसी चमूद्वारे बाजारपेठ आणि व्यापारी संकुलाच्या परिसरात 'व्होकल फॉर लोकल' आणि पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे, असेही डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले.

**मनपा लावणार थँक यू स्टिकर्स**

स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी अभियानाच्या अंतर्गत नागरिकांना त्यांच्या घरातील निरुपयोगी, पुनर्वापर करण्यायोग्य वस्तू, जुने कपडे, गादी, ई-कचरा, प्लास्टिकच्या वस्तू, जुनी पुस्तके, वर्तमानत्रांची रद्दी, काचेच्या वस्तू आदी साहित्य मनपाच्या स्वीकार केंद्रावर जमा करण्याची सोय आहे. संपूर्ण शहरात मनपाद्वारे प्रभाग स्तरावर १३० कचरा स्वीकार केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रांवर आपल्याकडील कचऱ्याचे वेगवेगळे असे स्वतंत्र वर्गीकरण करून स्वीकार केंद्रावर जमा करावे. वगीर्कृत स्वरूपात उपरोक्त कचरा स्वीकार केंद्रावर जमा करून अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शविणाऱ्याच्या नागरिकांचे घर, सोसायटीच्या दारावर नागपूर महानगरपालिकेद्वारे थँक यू चे स्टिकर्स लावण्यात येतील, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी दिली.

कचरा स्वीकार केंद्रामध्ये जमा होणाऱ्या कचऱ्यापासून नवीन साहित्याची निर्मिती करून त्याचा पुनर्वापर करण्यासाठी मनपाद्वारे शहरातील स्वयंसेवी संस्थांची मदत घेण्यात आली आहे. स्वीकार केंद्रावर जमा वेगवेगळ्या स्वरूपात वर्गीकृत कचरा विशिष्ट कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेला दान करण्यात येणार आहे. यापासून संबंधित संस्थेद्वारे उपयोगी साहित्याची निर्मिती केली जाईल, असेही आंचल गोयल यांनी सांगितले.

# पैशासाठी देहविक्रीचा मार्ग

## छाप्यात फुटले तिचे बिंग

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

भारी कपडे, महागडा मेकअप आणि फिरायची सवय असलेल्या तरुणीचे कंपनीत मजूर असलेल्या युवकाशी लग्न झाले. घरात जेमतेम पैसे येत असल्यामुळे आर्थिक अडचण येत होती. तरीही पत्नी नेहमी पैशाची मागणी करुन आपली हौस पूर्ण करण्याचा हट्ट करीत होती. पतीच्या तुटपुंज्या पगारात काहीही होणार नाही, असे लक्षात आल्यानंतर पत्नीने थेट शरीरविक्री करण्याचा निर्णय घेतला. पती कामावर जाताच ती थेट लॉजवर जाऊन पैशासाठी आंबटशौकीन ग्राहकांच्या स्वाधीन होत होती. मात्र, तिचे बींग तब्बल दोन वर्षानंतर फुटले. सावनेरमधील विश्रांती लॉजवर छापा घालून पोलिसांनी तिला ताब्यात घेतले.

सावनेरमध्ये नागमंदिरजवळ आरोपी रुपेश ऊर्फ गोलू राधेशाम छिपारुषीया याचे विश्रांती लॉज आहे. तेथे आकाश मोतीराम खोब्रागडे हा व्यवस्थापक म्हणून काम करतो. शहराच्या एका कोपऱ्यात असलेल्या लॉजवर व्यवसाय होत नव्हता. त्यामुळे लॉज बंद करण्याची वेळ गोलूवर आली. त्यामुळे त्याने लॉजवर वेश्याव्यवसाय सुरु करण्याचा निर्णय घेतला.

त्यासाठी त्याने देहव्यापारातील दलाल यश व्यवहारे याला हाताशी धरले. यश याने नागपुरात एका ब्युटीपार्लरमध्ये देहव्यवसायासाठी तरुणी आणि महिलांचा पुरवठा केला होता. त्यामुळे दलाल यशने काही तरुणींना सावनेरमधील लॉजवर देहव्यापार करण्यासाठी तरुणींना तयार केले.

त्याच्या संपर्कात नागपुरातील नयना (वय २२, काल्पनिक नाव) ही संपर्कात आली. तिने आर्थिक अडचण असल्याचे सांगून देहव्यापार करण्याची तयारी दर्शविली. यशने तिला विश्रांती लॉजवर नेले आणि तेथे व्यवस्थापक आकाश याच्याशी भेट घालून दिली. आकाशने तिला जाळ्यात ओढले. तो ग्राहकांना नयनाची ओळख ही प्रेयसी असल्याचे सांगत होता. नयनाचा पती सकाळी ८.३० वाजता कामाला जात होता आणि रात्री ९ वाजता परत येत होता. त्यामुळे नयनाने सकाळी १० वाजतापासून ते सायंकाळपर्यंत देहव्यापार करण्याचा निर्णय घेतला. तिला घेण्यासाठी रोज कार तिच्या घरासमोर येत होती. पतीच्या कमाईत तिची हौस पूर्ण होत नसल्यामुळे नयना लॉजवर रोज देहव्यापार करीत होती.

सावनेरचे ठाणेदार पाटील यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक मंगला मोकासे यांनी एका बनावट ग्राहकाला लॉजवर पाठवले. आकाशकडे तरुणीची मागणी केली. त्याने नयनाला बोलावले आणि प्रेयसी असल्याची ओळख करुन दिली. त्या ग्राहकाने ५ हजार रुपयांत सौदा पक्का केला. नयना आणि त्या ग्राहकाला आकाशने लॉजमधील खोली उपलब्ध करुन दिली. त्यानंतर काही वेळातच पोलिसांनी छापा घालून नयनासह आंबटशौकीन ग्राहकांना ताब्यात घेतले.

# महाराष्ट्र, गोव्यातील ५५०० धार्मिक स्थळांची स्वच्छता



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर अर्चक पुरोहित आयामाने केलेल्या मंदिर स्वच्छता अभियानाच्या आवाहनाला प्रतिसाद देवून संपूर्ण महाराष्ट्र आणि गोवा मिळून विश्व हिंदू परिषदेसह विविध संस्था संघटना, उपासना मंडळ, धार्मिक सामाजिक संस्था, मंडळ सर्व मंदिरे यांच्या ६० हजारावर भाविकांनी, महिला व पुरुषांनी मंदिरे, बौद्ध विहार, जैन स्थानक, गुरुद्वारे तसेच हिंदू धमार्तील सर्व धार्मिक स्थानांच्या स्वच्छतेसाठी उस्फूर्त सहभाग नोंदवला. अभियानाचे हे दुसरे वर्ष आहे.

यापैकी देवगिरी प्रांतात १८५०, कोकणमध्ये १५००, विदर्भात १२१०, पश्चिम महाराष्ट्र प्रांतात ८५० व गोवा राज्यात १५० या संख्येने ही मंदिर स्वच्छता सेवा देण्यात आली. २० ऑक्टोबरला सकाळी सात ते अकरा या चार तासात हे अभियान सर्वदूर राबवले गेले. मागील वषार्पासून मंदिर आयामाच्या वतीने उपक्रम राबवणे सुरू झाले आहे. मागच्या वर्षी ५५० मंदिरांमध्ये स्वच्छता सेवा दिली होती.

मंदिर स्वच्छता अभियानासाठी मागील एक महिन्यापासून तयारी सुरु होती. यासाठी विविध संस्था संघटनांबरोबर बैठका संपन्न झाल्या. मंदिरांसह सर्व धार्मिक स्थानांच्या याद्या तयार करण्यात आल्या. मंदिर स्वच्छतेसाठी आवश्यक ते साहित्य झाडू, खराटे, पोछा, इलेक्ट्रिक ब्लोअर इत्यादीची उपलब्धता स्थानिक स्तरावर करण्यात आली.

मंदिर स्वच्छता अभियानात नागरिकांनी सहभाग नोंदवावा अशा आशयाचे ३५०० बॅनर मंदिरांवर लावण्यात आले होते. ते वाचून अनेक भाविक महिला पुरुष अभियानात सहभागी झाले. अनेक मंदिरांनी आपल्या मंदिरांसोबत दुसऱ्या मंदिराची जबाबदारी घेत तिथे पण स्वच्छता असे सेवा केली.

सौगंध राम की खाते है हम मंदिर स्वच्छ बनायेंगे, माझे मंदिर माझी जबाबदारी, माझे मंदिर, स्वच्छ सुंदर मंदिर आणि मंदिर स्वच्छता ते राष्ट्र स्वच्छता, अशी घोषवाक्ये भाविकांनी या निमित्ताने तयार केली. पुढील वर्षी अधिक उत्साहाने अधिक प्रमाणात आणि किमान १५-२० हजारावर मंदिरामध्ये हे स्वच्छता सेवा अभियान राबविण्यात येईल.

सर्व मंदिरांशी संपर्क करून त्यांनी दिवाळीच्या आधी मंदिरावर नवीन ध्वज लावावा आणि दीपावलीच्या काळात चार दिवस रोषणाई करावी आणि समाजाच्या विविध जातींच्या तरुण जोडप्यांच्या हस्ते ध्वज पूजन करावे आणि हे मंदिर प्रत्येक हिंदू समाजाची आहे प्रत्येकाला त्यात स्थान आहे संधी आहे समरसतेचा भाव कृतीतून जागृत करावा, अशी विनंती सर्व मंदिर विश्वस्तांना करण्यात आली.

# राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सव अर्थात "मानवता दिन" सोहळा संपन्न

**नागपूर :** वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज उत्सव समिती व श्री गुरुदेव सेवाश्रम, नागपूरचे वतीने मानवतेचे महान पुजारी वं. राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज यांचा ५६ वा स्मृतिदिन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटल, तुकडोजी महाराज चौक नागपूर येथे संपन्न झाला. सकाळच्या सत्रात सामुदायिक ध्यानाने कार्यक्रमाची सुरुवात झाली या प्रसंगी आदरणीय श्री. राधेश्यामजी निमजे (ग्रामगीताचार्य) यांनी ध्यानावर समयोचित मार्गदर्शन केले. त्यानंतर राष्ट्रसंत तुकडोजी नगर व रघुजी परिसरातील ठळक मार्गावरून रामधुन काढण्यात आली. या कार्यक्रमाचे शिस्तबद्ध संचालन श्री. बाळकृष्ण पाचभाई दादा व श्री. माणिक मुळेकरदादा यांनी केले. त्यानंतर चौकातील राष्ट्रसंत पुतळ्याचे पूजन व माल्यार्पण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. त्यानंतर परिसरातील शिक्षण संस्थांतील १००० विद्यार्थ्यांकडून राष्ट्रसंत रचित राष्ट्रीय भजनांचे समुहगान करण्यात आले. या कार्यक्रमात भन्ते हर्षदीप, रेव्ह. नितीन सरदार, मौलाना इर्शाद, प्रमोद काळबांडे व सतिश होले प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन ज्ञानेश्वर रक्षक दादा यांनी केले. सायंकाळचे सत्र महात्मा फुले सांस्कृतिक सभागृह, रेशीमबाग येथे घेण्यात आले.

सामुदायिक प्रार्थनेमधे सौ. प्रियंकाताई मगर्दे, ग्रामगीताचार्य यांचे बौधिक झाले व त्यानंतर सर्व धर्मीय प्रार्थनांचे पठन बाळकृष्ण पाचभाई दादा, ग्रामगीतारत्न यांनी केले व वंदनीय राष्ट्रसंतांना सामुहिक मौन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर घेण्यात आलेल्या मानवता दिन समारोह प्रसंगी अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. शरयुताई बबनराव तायवाडे, प्राचार्या तायवाडे महाविद्यालय, कोराडी, नागपूर आणि प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ.सौ. विजयालक्ष्मीताई थोटे, अध्यासन प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर लाभल्या होत्या.

दोघींनीही आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून वं. राष्ट्रसंतांच्या कायार्ची महती सोदाहरण सांगून त्याची आजच्या घडीला गरज आहे हे पटवून दिले. कार्यक्रमाचे संचालन सौ. प्रियंकाताई मगर्दे यांनी केले. त्यानंतर ह.भ.प. शिवदास महाराज श्रृंगारे, नेर, जि. यवतमाळ यांचे राष्ट्रीय कीर्तन झाले त्यांनीही वं. राष्ट्रसंतांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

# रस्ते अपघातात फोटोग्राफरचा मृत्यू

**नागपूरः** वाहनावरून नियंत्रण सुटल्याने एका तरुण फोटोग्राफरचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना वर्धा मार्गावर सोमलवाडा चौकाजवळ घडली. अर्जुन नरेंद्र केडिया (29) रा. साईकृपा अपार्टमेंट, मनिषनगर, असे मृताचे नाव आहे. अर्जुन हा वेडिंग फोटोग्राफर होता. रविवारी सायंकाळी 4 वाजताच्या सुमारास तो काम आटोपून एमएच-32/डब्ल्यू-3666 क्रमांकाच्या दुचाकी वाहनाने घरी जात होता. सोमलवाडा चौकात अनेक्स हॉटेलसमोर त्याचे वाहनावरून नियंत्रण सुटले. त्याच दरम्यान त्याचे दुचाकी मागून येत असलेल्या एमएच-31/जीए-0407 क्रमांकाच्या एसयूव्हीवर जाऊन धडकली. यात अर्जुन गंभीर जखमी झाला. डोक्याला मार लागल्याने स्थानिक नागरिकांनी त्याला उपचारार्थ खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासताच मृत घोषित केले. सोनेगाव पोलिसांनी अर्जुनचा लहान भाऊ नकुलच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत तपास सुरू केला आहे.

# रोटरी क्लब ऑफ नागपूर साऊथने पाठवला सीमेवरील जवानांना दिवाळीचा फराळ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

रोटरी क्लब ऑफ नागपूर साउथने 700 किलो दिवाळीचे फराळ सीमेवर विविध 33 ठिकाणी पाठवले. रोटरी क्लब नागपूर साउथच्या सदस्यांनी तयार करून पॅक करून केम्पटी कॅन्टोन्मेंट येथील आर्मी पोस्टल सेवांदवारे पाठवले. त्यात 400 किलो चिवडा, 200 किलो शेव, 200 किलो शंकरपाळे आणि 200 किलो रवा बेसन बर्फी. दिवाळी फराळ पाठवण्याचे हे तिसरे वर्ष आहे.



रोटरी क्लब ऑफ नागपूर साउथचे अध्यक्ष आरटीएन प्रसन्न दाणी यांनी सांगितले की, प्रत्येक सीमा चौकीला जोडलेल्या पत्रात असे नमूद केले आहे की, "जसे सीमेवरील सैन्य आपली सुरक्षा सुनिश्चित करते. त्याचप्रमाणे जवानांनाही सीमेवर दिवाळीच आनंद मिळावा याची खात्री करणे आपले कर्तव्य होते. हा प्रकल्प दिवंगत आरटीएन रवींद्र गंधे यांनी 2022 मध्ये पहिल्यांदा सुरु केला होता. 25 हून अधिक क्लब सदस्यांनी या प्रकल्पात प्रत्यक्ष सहभाग घेतला आणि तेवढ्याच सदस्यांनी अप्रत्यक्ष सहभाग घेऊन हा प्रकल्प यशस्वी केला.

जी ओ सी मेजर जनरल एस के विद्यार्थी ए व्हि एस एम, व्हि एस एम यांनी त्यांच्या कार्यालयाद्वारे या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. 18 ऑक्टोबर 2024 रोजी हे बॉक्स लेफ्टनंट कर्नल चेतन आनंद, अति. विंग क्याडर आणि त्यांच्या टीमच्या नेतृत्वाखालील आर्मी पोस्टल सर्व्हिसेस द्वारे पाठवण्यात आले. जवानांसाठी ही फराळ बनवण्यासाठी रात्रंदिवस मेहनत करणाऱ्या क्लब सदस्य आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले.

क्लबचे अध्यक्ष प्रसन्न दाणी, माननीय सेरेटरी अमोल साखरवाडे, संचालक प्रसेनजीत राजूरकर, तपन पटेल, पुरुषोतम गायधने, डॉ. निवेदिता खेर, उपाध्यक्ष दीपक सोनवणे, माजी अध्यक्ष संजय ततवावादी, अमित कुकडे, अमित गोखले, प्रकाश कापरे, समीर सोहोनी, विजय सोनटके, डॉ. विवेक देशपांडे, डॉ. उदय गुप्ते, हेमंत शाह, सदस्य राहुल झवर, महेंद्र गिरिधर, राधाकिशन अग्रवाल, एन्स मृणाल दाणी यशोधरा सोहोनी, वैशाली सोनावणे, राजसौ राजुरकर और अनुपम खेर यांनी प्रकल्प यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

रोटरी क्लब ऑफ नागपूर साउथ गेल्या 33 वषार्पासून मेळघाट आदिवासींसाठी वैद्यकीय आणि शस्त्रक्रिया प्रकल्पांसाठी प्रसिद्ध आहे. यावर्षीही क्लबने सीमेवरील जवानांना 500 राख्या पाठवल्या आणि छावणीत उपस्थित जवानांना राख्या बांधल्या. रोटरी क्लब ऑफ नागपूर साउथने त्यांच्या सामुदायिक प्रकल्पांमध्ये देशभक्तीचा आयाम जोडला आहे.

# अतिक्रमण काढण्यासह स्वच्छतेला प्राधान्य द्याः आयुक्त डॉ.चौधरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

सेमिनरी हिल्स परिसरात सुरू असलेल्या अतिक्रमण निर्मूलन कारवाईत अतिक्रमण काढण्यासह परिसरातील स्वच्छतेला प्राधान्य द्यावे असे सक्त निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.



नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सोमवारी (ता : २१) स्व. दिलीप चौधरी मार्गावरील वायुसेना नगर चौक ते सेमिनरी हिल्स परिसरातील रस्त्याच्या कामाची पाहणी केली.पाहणी दरम्यान मनपाचे उपायुक्त प्रकाश वराडे, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता विजय गुरुबक्षानी, झोनल स्वच्छता अधिकारी दीनदयाल टेंभेकर, यांच्यासह मॅथ्यु व मनपाचे अधिकारी व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

पाहणी दरम्यान आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी रस्त्याच्या कडेला पसरलेल्या कचऱ्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करीत अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करताना परिसरात अस्वच्छता होणार नाही याची दक्षता घ्यावी, परिसरातील स्वच्छतेला प्राधान्य देत स्वच्छता कर्मचाऱ्यांमार्फत नियमित स्वच्छता ठेवावी, असे सक्त निर्देश त्यांनी स्वच्छता अधिकाऱ्यांना दिले. तसेच यावेळी आयुक्त डॉ. चौधरी यांनी फुटाळा तलाव परिसर ते अंबाझरी टी-पॉईंट दरम्यान मागार्ची पाहणी केली. आयुक्तांनी यावेळी मार्गावरील अस्वच्छतेबाबत झोनल स्वच्छता अधिकारी दीनदयाल टेंभेकर यांना रस्त्याच्याकडेला असणारा कचरा त्वरित उचलून त्याची योग्य विल्हेवाट लावावी व परिसर स्वच्छ करावा अन्यथा कारवाईला सामोरे जावे,असे सक्त निर्देश डॉ. चौधरी यांनी दिले.

## कर्मचाऱ्यानेच गोदामात केली चोरी

**नागपूर :** कर्मचाऱ्यानेच मालकाचा विश्वासघात करीत गोदामात चोरी केली. ही घटना तहसील ठाण्यांतर्गत उघडकीस आली. पोलिसांनी भारत जेठालाल खुशलानी (44) रा. मेकोसाबागच्या तक्रारीवरून आरोपी कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. किरण दादा निमजे (38) रा. शिवाजीनगर असे आरोपीचे नाव आहे. खुशलानी यांचे गांजाखेत चौकात लक्ष्मी पेपर मार्ट नावाने दुकान आणि गोदाम आहे. गोदामाची देखरेख करण्याची जबाबदारी किरणकडे होती. 1 ऑगस्ट ते 18 ऑक्टोबर दरम्यान किरणने वेगवेगळ्या आकाराचे 26 बंडल रजिस्टर चोरी केले. गोदामात माल कमी दिसून आल्याने खुशलानी यांना संशय आला. त्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता किरण चोरी करताना दिसला. खुशलानी यांनी पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून किरणला अटक केली.

# पद्मविभूषण डॉ. भैरप्पा यांच्यासह मान्यवरांची नाशिकराव तिरपुडे भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रास सदिच्छा भेट



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २१ :

रामटेकच्या हिवरा बाजार येथील रेड स्वस्तिक सोसायटीद्वारा संचलित नाशिकराव तिरपुडे भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राला म्हैसूर येथील सुप्रसिद्ध साहित्यिक पद्मभूषण डॉ. एस एल भैरप्पा यांच्यासह बेंगलोरच्या सुप्रसिद्ध साहित्यिका सौ सुहाना, सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रकाश गवळी, चैतन्य देशपांडे यांनी सदिच्छा भेट दिली.



नागपूर येथील कवी कुलगुरू कालिदास सभागृहमध्ये रिसर्च फाउंडेशनतर्फे डॉ भैरप्पा यांना सप्त ऋषीं पुरस्कार श्रुंखलेतून महर्षी वाल्मिकी पुरस्कार देण्यात आला. यावेळी रेड स्वस्तिक सोसायटीचे एनटीपीएस केंद्र संचालक जगन्नाथ गराट, संचालक कृष्णा भाल, रेड स्वस्तिक सोसायटीचे चेअरमन सुरेश कोते तसेच या सोसायटीचे मुंबई मुख्यालयातील व्यवस्थापक योगेश गावडे उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांनी केंद्रातील युवक युवतींना करिअरसंबंधी उपयुक्त मार्गदर्शन केले.

हिवरा बाजार येथील निसर्गरम्य वातावरणात सर्व सोयीनी युक्त निवासी असलेली आणि अत्यंत कमी शुल्कामध्ये निवासी प्रशिक्षण केंद्राची निर्मिती डॉ. टी एस. भाल यांच्या संकल्पनेतून झाली आहे. या केंद्रातील अनेक विद्यार्थी सैन्य दलात आणि पोलीस दलात भरती झाले आहेत.